

# प्रिय पूज्य साने गुरुजी

राजा मंगळवेढेकर

BVBK-0403516
BVBK-0403516

रजि नं. ८७३००/वाचनालय

पू. साने गुरुजी जन्मशताब्दिनिमित्त प्रकाशित

# प्रिय पूज्य साने गुरुजी

बा.वा.
३५९६
२३।२।९९

बा. क्र. ३५९६ २३।२।९९
बा.वा

BVBK-0403516
BVBK-0403516

राजा मंगळवेढेकर

मंजुल प्रकाशन

ISBN : 81-86178-67-8 प्रकाशन क्रमांक : ९८

प्रकाशिका :
सौ. मेघा अंबिके
मंजुल प्रकाशन
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११००१.

मुद्रक :
सुनील अंबिके
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११००१.

सर्वहक्क :
राजा मंगळवेढेकर,
९, अशोकबन,
मॉडेल कॉलनी, पुणे १६.

प्रथमावृत्ती :
११ जून १९७६
पू. साने गुरुजी निर्वाण दिन
द्वितीयावृत्ती :
२४ डिसेंबर १९९८
पू. साने गुरुजी जन्मशताब्दी
प्रारंभ दिन

मुखपृष्ठ
सचिन रास्ते

मूल्य : रुपये पंचावन्न फक्त.

'साने गुरुजींची जीवनगाथा' लिहीत होतो, त्यावेळची गोष्ट. महाराष्ट्रभर, गुरुजींचा जिथे जिथे संबंध आला होता, त्या स्थळांना, व्यक्तींना भेटत होतो. बोलत होतो. ऐकत होतो. माहिती गोळा करीत होतो.

एकदा श्री. यदुनाथजी थत्ते म्हणाले, हिंडतोस-फिरतोस त्याची माहिती 'साधने'तून देत जा, म्हणजे वाचकांनाही कळेल.

त्या वेळी नित्य वेगवेगळे हृद्य अनुभव मी घेतच होतो. गुरुजींच्या विविध आठवणी हाताशी येत होत्या. चिंतन-मननातून काही विचारही स्फुरत होते. त्यात काही गमतीचेही असत..... हे सारेच काही जीवनगाथेत समाविष्ट होणारे नव्हते. म्हणून वाटले, थत्तेजी म्हणतात तसे काही तरी लिहावे.

आणि मग गुरुजी गेल्यानंतरच्या पंचवीस वर्षांतली त्यांच्या परिवारासंबंधीची खबरबात त्यांना पत्रानेच कळवावी असे ठरवले, आणि ही पत्रं अवतरली.

'साधने'तून ही पत्रं प्रसिद्ध होत असताना अनेकांनी पत्रं पाठवून व प्रत्यक्ष भेटीतही पसंतीची पावती दिली. त्यातली काही पत्रे त्यावेळी 'साधने'तूनही आली होती. एकाने लिहिले होते: 'खरोखरच, कुठे तरी, एखाद्या गावी साने गुरुजी असावेत आणि ते ही पत्रं वाचत असावेत असा भास होतो.....'

बऱ्याच मित्रांनी सुचवले, ही सगळी पत्रं पुस्तकरूपाने द्यावीत. जीवनगाथेच्या वाचनाला हे पत्रवाचन अनुरूप ठरेल. गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाची अधिक जवळून ओळख होईल.

आणि म्हणूनच हा प्रपंच.

■

पू. साने गुरुजींच्या जन्मशताब्दी प्रारंभ दिनी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे, हा आनंद योग होय!

**– राजा मंगळवेढेकर**

■ □ ■

## १.

दिनांक २३।१।९९
विषय बा.बा.
४५७६

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

दोन तपे होऊन गेली, आपला पत्रव्यवहार नाही. तसा कुणाचाच नसणार. कारण इथल्या पोस्टात टाकलेले पत्र, ते केव्हा तरी उशीरा का होईना, पण मिळू शकेल अशा गावचे रहिवासी आता तुम्ही राहिला नाहीत! त्यामुळे तुमच्याशी पत्रद्वारे किंवा कधी प्रत्यक्ष भेटीगाठीतही संवाद साधणे शक्य राहिले नाही. नाही म्हणायला, माझ्या आठवणीप्रमाणे तुम्ही गेल्यावर श्री. नानासाहेब गोरे यांनी मुंबईच्या मेघाभुवनमध्ये तुमच्या माघारी राहिलेल्या भिंतीवरच्या तुमच्या छायाचित्राशी एक 'स्वप्न-भाषण' केलेले आहे. त्या वेळी बंडू गोरे, अण्णा साने, मधू लिमये इत्यादी तुमची धडपडणारी मुले 'रचना' नावाचे एक सुरेख द्वैमासिक काढीत असत. त्या 'रचने'त नानासाहेबांचे तुमच्याशी केलेले 'स्वप्नभाषण' प्रथम प्रसिद्ध झाल्याचे नि वाचल्याचे आठवते. किती सुंदर आहे ते! नानासाहेबांच्या लेखणीचे सारे ललित विभ्रम आणि विलास तर त्यात उमटलेले आहेतच, पण मनाचे पापुद्रे उलगडत जाण्याचे त्यांचे न्यारे कसबही तिथे प्रकट झालेले दिसते. पुढे त्यांच्या 'डाली'त हा लेख सुमतीबाईंनी समाविष्ट केलेला आहे.

त्यानंतर आठवते ते कवी वसंत बापट यांनी तुम्हाला लिहिलेले पत्र. 'श्यामची आई' रुपेरी पडद्यावर आणण्याचा संकल्प आचार्य अत्र्यांनी केला आणि त्या निमित्ताने वसंत बापट आणि आचार्य अत्रे तुमच्या पालगडला जाऊन आले. ज्या निसर्गाने तुम्हाला तुमच्या आईप्रमाणेच घडवले, तो निसर्गरमणीय परिसर ते पाहून आले. परतल्यावर वसंत बापटांनी 'पत्र लिहिण्यास कारण की, आम्ही तुमची जन्मभूमी पाहून आलो' या मथळ्याखाली ते पत्र लिहिले आहे. ते पत्रही अतीव सुंदर आहे. वसंत बापटांची रसरशीत काव्यात्मता त्यात उतरलेली आहे. मला ते आठवत होते. म्हणून परवा साधनेची फाईल काढून ते मुद्दाम परत वाचले. दि. २६ एप्रिल १९५२ च्या साधनेच्या अंकात ते आहे.

त्यानंतर मात्र तुमच्याशी असा कुणी संवाद साधल्याचे, निदान मला

तरी ठाऊक नाही.

तुम्ही हा लोक सोडण्याआधी किती तरी लोकांशी तुमचा पत्रव्यवहार होता. शेवटीसुद्धा तुम्ही तुमच्या लाडक्या सुधाला सुंदर पत्रच लिहून दिलेत आणि ती तुमची अखेरची निरवानिरवीची पत्रेच....

तर त्या वेळेस इतरांप्रमाणेच माझा तुमचाही काही दिवस पत्रव्यवहार होता. मी त्या वेळी पंढरपुरात राहात होतो.

१९५० चीच गोष्ट. आम्ही काही मित्रांनी त्या वेळी पंढरीत एक 'नवभारत व्याख्यानमाला' काढली होती. त्या निमित्ताने मी तुम्हाला व्याख्यानासाठी या म्हणून पत्र लिहिले होते, आणि त्याच पत्री असेही लिहिले होते की, ज्या विठ्ठलाच्या मंदिराची कवाडे हरिजन बांधवांना दर्शनासाठी खुली व्हावीत, म्हणून तुम्ही महाराष्ट्राच्या झंझावाती दौऱ्यानंतर पंढरीतच, तनपुरेमहाराजांच्या मठात, प्राणांतिक उपोषणाचे दिव्य आरंभिले होते, त्या विठ्ठल मंदिराची कवाडे हरिजनांना खुली झालेली आहेत. पण तेव्हापासून तुमचे येणे काही घडले नाही; - तरी विठ्ठलाच्या दर्शनासाठीही या.

याला तुमचे उत्तर आले होते. त्यात तुम्ही कामाच्या व्यापामुळे व्याख्यानाला येण्यास नकार दिला होता; आणि विठ्ठलाची कवाडे अखेरीस कायद्यानेच उघडली म्हणून खंतही व्यक्त केली होती. असो.

परवा किती तरी दिवसांनी मी पंढरपूरला गेलो होतो. त्या वेळी अनेक जुने मित्र भेटले. गप्पागोष्टी झाल्या. वाळवंटात भटकलो. उपोषणापूर्वी तुम्ही चंद्रभागेचे स्नान करून याच वाळवंटात हजारोंच्या जमावापुढे ते तेजस्वी भाषण केले होते मला ते सारे आठवते. सनातन्यांनी सभेत गडबड केली तेव्हा जमाव खवळला. पण वृद्ध सेनापतींनी जाऊन त्यांना संरक्षण दिले आणि व्यासपीठावर आणले. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली. लोकांनाही ते ऐकून घ्यायला लावले. विरोधकांच्या मताबद्दल केवढी ही आदराची भावना! केवढी ही सहिष्णुता!

नंतर तुमचे उत्तर! त्या दिवशी तुमचे ओजस्वी वक्तृत्व सर्वांगांनी प्रकट झाले होते. तुमचे वक्तृत्व, तुमचे भाषण हे एक वेगळे दर्शनच होते! ते आम्हाला, आमच्या पिढीला घडले. पण गुरुजी, आता जेव्हा मी माझ्या मुलांना तुमच्या भाषणाबद्दल सांगतो, तेव्हा निव्वळ शब्दांशी झटापट करून कसा तरी तो अनुभव त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचा खटाटोप करतो. त्यात माझेही समाधान

होत नाही, आणि मुलांचे तर नाहीच नाही. त्यांचे डोळेच मला हे सांगून जातात. खरेच गुरुजी, इतकी भाषणे तुम्ही महाराष्ट्रभर दिली, पण एकाचेही ध्वनिमुद्रण झालेले नाही. तुमच्या साहित्याचे सामर्थ्य उमगून घ्यायला तुमचे ग्रंथ सिद्ध आहेत, पण तुमच्या भाषणातले ते रसाळ दाहकत्व, ती विद्युत्‌गती, ती चमक कशी दाखवणार? आजच्यासारखी छोट्या-मोठ्या टेप-रेकॉर्डस्‌ची उपलब्धता त्या वेळी झालेली नव्हती.

आता गंमत वाटते; परवा जुने जुने काही अंक चाळत होतो, तर त्या काळाच्या सभेच्या जाहिरातींत छापलेले असे, 'लाऊडस्पीकर्सची व्यवस्था केलेली आहे!' आता सत्यनारायणाची घरगुती पूजादेखील लाऊडस्पीकरशिवाय होत नाही गुरुजी!

तेव्हा, तुमचा आवाज काही आज आमच्याजवळ नव्या पिढीला ऐकवण्यासाठी नाही. आमच्या कानांत मात्र अजून तो आहे.

तर वाळवंटात ज्या ठिकाणी ते उंच व्यासपीठ उभारलेले होते तेथे गेलो, तेव्हा तुमची गंगौघासारखी सावेश वाणी पुनश्च मनाच्या घुमटात घुमू लागली. त्याआधी चारएक महिने तुमच्याबरोबर 'महाराष्ट्र शाहीर' म्हणून आम्ही गाणी, पोवाडे गात महाराष्ट्रभर फिरलो होतो ना, त्यामुळे तुमचे सारे भाषणच आम्हाला पाठ झाले होते!

'महाराष्ट्र शाहीर' या फिरत्या कलापथकाची कल्पना वसंत बापटांचीच. गुरुजी, अजूनही बापट मोठ्या निष्ठेने राष्ट्र सेवा दलाचे कलापथक चालवीत आहेत. लीलाधर आणि सुधा वर्दे ह्यांची साथ आहेच. कलापथकाचेदेखील हे रौप्यमहोत्सवी वर्ष! या पंचवीस वर्षांत तुमच्या प्राणप्रिय सेवा दलाच्या कलापथकाने फार मोठे कार्य केले आहे. गुरुजी, तुम्ही पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेला नि आपल्या कलापथकाने बसवलेला 'पुढारी पाहिजे' हा वग पाहायलाच हवा होता! तुम्हाला नंब्री वाटला असता. कलापथकाने 'महाराष्ट्रदर्शन', 'भारतदर्शन', 'आझादीकी जंग', 'शिवदर्शन' असे एकाहून एक सरस भव्य कार्यक्रम सादर करून कलाक्षेत्रात एक आगळी प्रतिष्ठा मिळविलेली आहे. 'भारतदर्शन' पाहून तर तुम्ही बेहद्द खूष झाला असता! तुमचे आंतरभारतीचे महन्मंगल स्वप्न वसंत बापटांनी नृत्यांमधून साकार केले आहे. किती परिश्रम करतात हे लोक! तुमचा मायेचा हात त्यांच्या पाठीवरून फिरला असता तर आणखीन काही दिव्य-भव्य घडले असते.

तुम्हाला हे इतके सांगायचे कारण असे की, त्या वेळी दौऱ्यात तुम्ही खुषीत असलात म्हणजे आमच्याबरोबर खंजिरीचा ठेका धरायला आणि हलक्या आवाजात झील ओढायलाही येत असा. मग कधी कधी बापट गंमतीने 'शाहीर साने' असा तुमचा उल्लेखही भर सभेत करत असत. मज्जा!

मी पंढरीतील उपोषणकालाबद्दल लिहीत होतो. तर ते तनपुरेमहाराजांच्या मठातील उपवासाचे दहा दिवस! दर दिवशी वाढत जाणारी काळजी आणि वातावरणातला तंगपणा! उलट सुलट बातम्यांचा सुळसुळाट. भाषणे, घोषणा, मिरवणुकी -सारे आठवणींच्या तळातून वर आले. सनातनी मंडळींनी केलेली त्या वेळची एक घोषणा आठवते, 'जाव साने भीमापार, नहीं खुलेगा विठ्ठलद्वार!'.....

आणि अखेरीस १० मेचा दिवस उजाडला. सकाळपासूनच घडामोडींना एक विलक्षण गती आलेली होती. दहा दिवसांच्या उपोषणाने तुमचे शरीर कृश झाले होते, मुद्रा म्लान दिसत होती.

दुपारी तर घटनाचक्र आणखीनच वेगाने फिरू लागले. लोकसभेचे पहिले सभापती श्री. दादासाहेब मावळंकर आलेले होते. रावसाहेब पटवर्धन, एस्. एम्. जोशी, अप्पासाहेब पंत, काकासाहेब बरवे इत्यादी मंडळी पंढरीतच होती.

आणि सायंकाळी परिस्थिती पालटली! बडव्यांनी अनुकूल कौल दिला आणि तुमचे उपोषण सुटले. अवघ्या मराठी माणसाचा जीव भांड्यात पडला. सुटकेचा सुस्कारा त्याने टाकला. त्यांच्या प्रिय पूज्य गुरुजींचे प्राण वाचले होते!

पंढरीत तर त्या रात्री नळे चंद्रज्योती लावूनच आनंदप्रदर्शन झाले!

ही सारी हकीकत पंढरीत परवा गेलो ना, तेव्हा पुन्हा श्री. बाबूराव जोशी, पांडुरंग डिंगरे, पांडुरंग उत्पात इत्यादी मंडळींच्या तोंडून ऐकली.

बबनराव बडवे नि तात्यासाहेब गुर्जर तर गेलेच!

पांडुरंग डिंगरे यांनी त्या वेळची साप्ताहिक 'गोफण'ची फाईल दिली. ती वाचत असतानाही त्या वेळची सारी परिस्थिती डोळ्यांपुढे आली आणि गुरुजी, गंमत सांगू का! १० मे ची आनंदवार्ता देताना गोफणकारांनी लिहिले आहे,... 'नंतर गुरुजींनी मेहुणीच्या हातचा मोसंब्याचा रस घेऊन आपले उपोषण रात्री ८ वाजून ३५ मिनिटांनी सोडले!'

... हे वाचून मला हसू आले. कारण तुम्ही अविवाहित होता, हे आम्हाला ठाऊक आहे. पण समजा, आणखी शे-दीडशे-तीनशे वर्षांनंतर जर कोणी

हे वाचले तर ही मेहुणी त्याला त्रास दिल्याशिवाय राहील का? मग तो तर्क करायला लागेल की, 'ज्या अर्थी गुरुजींनी मेहुणीच्या हातून मोसंब्याचा रस घेतला होता. त्या अर्थी.....' अशी ही गंमत!

गुरुजी, १९४७ सालच्या मे महिन्यात ज्या वास्तूच्या दालनात तुम्ही हरिजनांना विठूची कवाडे उघडी व्हावीत म्हणून उपोषण केले होते ना, अगदी तिथेच १९५८ च्या मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पू. विनोबाजींचा पडाव होता. आणि 'सर्वधर्मीय बंधुभगिनींना विठ्ठलाची दारे उघडी करत आहोत. आपण त्यांच्यासह दर्शनास या.' असे निमंत्रण कोळी, उत्पात आणि बडवे मंडळींनी विनोबाजींना २९ मे रोजी दिले. विनोबा आपल्या सर्वधर्मी सहकाऱ्यांसह विठ्ठलाला त्याच्या मंदिरात जाऊन भेटले! १९४७ ते १९५८ -एका दशकाची ही वाटचाल! आणि स्थळ तेच, विषय आणि पात्रे यांच्यात फरक असलाच तर तो तसा बाह्यात्कारीच. नाही तरी तुमच्या उपोषणाला विनोबाजीच नव्हते का कारण बनले? तुमचे नि त्यांचे नातेही तसेच अपरंपार जिव्हाळ्याचे, आदराचे.

गुरुजी, पंढरपूरच्या उपोषणकाळात एक टपोऱ्या डोळ्यांची मुलगी तुमच्याजवळ येत असे, ती आठवते! सुमती तिचे नाव. सुधाला पत्र लिहिताना तिच्या हट्टावरून तुम्ही तिलाही एक 'सुंदर पत्र' लिहिले होते साधनेत. तर ती सुमती, अहो आता डॉक्टरीण झाली आहे, व तुमचे अमळनेरचे ब. ग. कुलकर्णी, मृगाजिनकार त्यांची ही सूनबाई झाली आहे! शिरपूरला असते हल्ली. आपल्या पथकातला कुतुबही भेटला, शिक्षक आहे तो.

या चोवीस वर्षांत पुष्कळच घडामोडी झालेल्या आहेत. अधूनमधून लिहीत जाईन.

तुमचा,

१४ सप्टेंबर १९७४ — *राजा*

■ □ ■

# २.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

परवा सातारला गेलो होतो. बरेच दिवसांनी जिल्ह्यातली सेवा दलाची, समाजवादी पक्षाची आणि तुमच्याविषयी आदर बाळगणारी मंडळी गोळा झाली होती. संख्या बरी हाती. आश्चर्य वाटले. कारण अहो, अलीकडे सभा, चर्चा अशा कार्यक्रमांना लोक गर्दी करत नाहीत. आता गर्दीची ठिकाणे आणि माणसेही वेगळी झाली आहेत! पण तरीसुद्धा परवा सातारला काय, किंवा त्याआधी मुंबईला प्रकाशभाई मोहाडीकरांनी बोलावलेल्या १० जुलैच्या सभेला काय, चांगली माणसे जमली होती. एप्रिलमध्ये पुण्यालाही अशीच एक सभा झाली होती. त्या वेळीही बरेच लोक आले होते. तुम्ही विचाराल कशासाठी? काय प्रयोजन?

... आता आमचा हेतू सांगितला तर तुम्हाला तुमच्या स्वभावानुसार आवडणार नाही, हे आम्हाला ठाऊक का नाही? असल्याविषयी तुम्हाला तिटकारा. सत्कार समारंभात रमणारे तुमचे मन नव्हे. स्वतःची स्तुतीस्तोत्रे किंवा पवाडे ऐकणाऱ्यांपैकी तुम्ही नव्हे. अशा वेळी तुम्ही किती संकोचून जात असा, हे काय आम्ही पाहिलेले नाही! पण तरीसुद्धा आम्ही, तुमच्या धडपडणाऱ्या मुलांनी, ठरवलेय की, तुमचा अमृत महोत्सव साजरा करायचा! या २४ डिसेंबर १९७४ ला तुम्ही अवघे पाऊणशे वयमानाचे होणार ना! उन्हाळ्या - पावसाळ्याच्या पलीकडे तुम्ही गेलात, आम्ही तीच मोजमापे घेऊन बसलो आहोत. तर या लौकिक मापाने तुम्ही ७५ वर्षांचे होणार! म्हणून हीदेखील एक संधीच. तुम्ही होता, तेव्हाची गोष्ट वेगळी होती. तरी त्या वेळीही आम्ही काही कमी चुकारपणा केला नाही. आणि आता तर पक्केच बनचुके बनलो आहोत! पण कधी तरी दुरून, ओझरता तुमचा स्पर्श घडला होता. त्याने अजूनही मनाला मोहोर फुटतो... असेच काही थोडे अधिक प्रमाणात या वर्षी घडावे आणि घडवावे अशी इच्छा!

सातारला नवेजुने मित्र भेटले. त्यांत तुमचेही एक वर्ष, दोन वर्षांचे वर्गबंधूही भेटले. तुम्ही पुण्याला न्यू पूना कॉलेजमध्ये शिकत असताना १९१९-२०

साली ते तुमच्याबरोबर होते. साताराचे भाऊसाहेब मोडक आणि हे रायगावचे अनंतराव देशपांडे. हेही आता पाऊणशेच्या घरातलेच. त्यांच्याशी बोललो तुमच्याबद्दलच. म्हणाले, ''दोनच वर्षे आम्ही बरोबर होतो. पुढे गांधीजींनी असहकाराची चळवळ सुरू केली आणि मी त्या चळवळीत उडी घेतली. सुटून आल्यावर टिळक विद्यापीठात गेलो.'' वगैरे.

पण इंटरमध्ये असताना तुम्ही आजारी झालात आणि वैद्याने तुम्हाला हवापालट करायला सांगितले. तेव्हा तुम्ही रायगावला याच अनंतराव देशपांड्यांच्या घरी सुमारे महिनाभर जाऊन राहिला होतात. हुरडा आणि ताक असा आहार घेऊन प्रकृती सुधारली होती. त्याच मुक्कामात तुम्ही अनंतरावांच्या आईवडिलांना दासबोध वाचून दाखवत होता... अशा आठवणी अनंतरावांनी सांगितल्या. पंचाहत्तरीच्या घरात असूनही अनंतराव खुटखुटीत वाटले. स्मरण चांगले दिसले.

सातारला सध्या डॉ. पुरुषोत्तम खुटाळे जीव ओतून काम करतात. एक-दोन महिन्यांपूर्वीच त्यांनी तिथे मुलांसाठी 'आनंदमेळा' भरवला होता. तुमच्याशी त्यांचा परिचय होता. त्यांच्या विवाहाच्या वेळी तुम्ही आशीर्वादाचे पत्रही त्यांना धाडले होते. ते त्यांनी किती जपून ठेवले आहे!

सातारला जायचे तेव्हा तसेच पुढे औंधलाही जाऊन यायचे असे मी मनाशी योजले होते. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी उठून बसने औंधला गेलो. अवघ्या दीड तासात पोचलोदेखील. मला नवल वाटले, कारण तुम्ही औंधला आलात ते किती कष्ट घेऊन, त्रास सोसून. १९१६ सालातील ती गोष्ट. आजच्यासारखी वाहतुकीची साधने त्या वेळी नव्हती. तुम्ही दापोलीहून हर्णे, मग तिथून बोटीने मुंबई, मुंबईहून रेल्वेने पुणे, पुण्याहून सदर्न मराठा रेल्वेने रहिमतपूर आणि मग तिथून बैलगाडीने औंध! हा तुमचा प्रवास आठवला आणि आजची सोय अनुभवली, त्यामुळे नवल वाटले!

औंध यापूर्वी कधी मी पाहिले नव्हते. पहिल्यांदाच येत होतो. पण तुमच्या वेळेस जसे असेल तसेच हे गाव आजही आहे, असे आपले मला वाटले. काही चार-सहा बऱ्यापैकी इमारती दिसल्या. पण गावाचा चेहरामोहरा बदलून जाईल, असा फार मोठा फरक झालेला नसावा.

मी उतरलो तुमच्या 'श्रीयमाई श्रीनिवास हायस्कूल'च्या मुख्याध्यापकांच्याकडे. हल्ली श्री. बापट हे मुख्याध्यापक आहेत. माझी-त्यांची प्रथमच गाठभेट होत होती. पण पंधरा-वीस मिनिटांतच आम्ही मित्र बनल्यासारखे झालो. बोलता

बोलता कळले की, आटपाडीच्या बापट डॉक्टरांचेच हे बंधू. मग आटपाडी म्हटले की, माडगूळकर आलेच. माझा आणि ग. दि. माडगूळकरांचा स्नेहसंबंध घनिष्ट. तुमची नि ग. दि. मा. यांची कधी गाठभेट झाली नव्हती. पण त्यांचा धाकटा भाऊ भालू मास्तर दौऱ्यात आपल्या बरोबर होता. घोड्याच्या पिकाची फक्कड गोष्ट सांगायचा! लोकांची हसता हसता पुरेवाट व्हायची. आठवले ना? तर गदिमा औंध संस्थानातलेच. त्यामुळे तेही तुमच्याच शाळेचे विद्यार्थी. त्यांनी 'औंधाचा राजा' या नावाने महाराजांवर फार सुंदर लेख लिहिलेला आहे.

बापट सरांबरोबर तुमच्या शाळेत गेलो. गुरुजी, तुमची शाळासुद्धा आहे तशीच आहे. काही थोडीफार रंगरंगोटी झालेली असेल तेवढीच. बाकी या लहानशा शाळेने केवढे तरी मोठे लोक दिले महाराष्ट्राला! आता तुमच्या शाळेत एक फलक लावलेला आहे. त्यावर लिहिलेले आहे, 'शाळेतील नामांकित विद्यार्थी' आणि खाली अशा सात विद्यार्थ्यांची नावे दिलेली आहेत. पहिले नाव आहे. श्री. के. ना. वाटवे यांचे आणि दुसरे नाव आहे श्री. पां. स. साने ऊर्फ साने गुरुजी असे तुमचे. मग शंतनुराव किर्लोस्कर, ग. दि. माडगूळकर, अप्पासाहेब पंत, शंकरराव खरात आणि माधव सातवळेकर अशी नावे आहेत.

शाळेत गेल्यावर मी १९१६ सालचे तुमचे नाव दाखल केले ते रजिस्टर पाहिले. जीर्ण झाले आहे, पण तुमची नोंद सापडली. ता. ८-७-१९१६ रोजी तुमचे नाव या शाळेत घातले आहे. आणि ता. १-२-१९१७ रोजी काढलेलेही आहे. म्हणजे जेमतेम ६-७ महिनेच तुम्ही औंधला होता. इंग्रजी सहावीत (सध्याची दहावी) प्लेगमुळे तुम्हाला येथून परतावे लागले. पण एवढा अल्पकाळ राहूनही शाळेला तुमचा अभिमान वाटतो! गावातल्या मंडळींशी बोलतानाही हाच अनुभव आला.

एक मात्र गंमतीदार घोटाळा झालेला दिसला. या शाळेत नाव घालताना तुमची जन्मतारीख २१-१२-१९०० अशी लिहिलेली आहे! त्यामुळे हीच पुढे पुण्यास गेल्यावर नू. म. विद्यालयात आणि नंतर न्यू पूना कॉलेजात गेल्यावरही तशीच राहिलेली आहे. पालगडच्या आणि दापोलीच्या शाळेत मात्र ती २४-१२-१९०० आहे. तेव्हा दापोलीच्या शाळेतून नाव काढताना किंवा औंधच्या शाळेत नाव घालताना, कुठे कोण जाणे, पण नजरचुकीने २४ ची २१ तारीख झालेली आहे. १९०० साल हे पालगडच्या शाळेपासूनच चुकीचे नोंदलेले आहे. तुमचा जन्म १८९९ सालातला. पण नाव घालताना काही तरी वयासंबंधीचा नियम

आडवा आला आणि त्याला बगल देण्यासाठी १८९९ चे १९०० झाले.

श्री. बापट सरांच्याबरोबर त्या लहानशा गावातून हिंडलो. अंबाबाईचे देऊळ, वस्तुसंग्रहालय, टेकडीवरील मूळपीठस्थान इत्यादी स्थळे पाहिली.

तुम्ही राहात होता ती पवारांच्या वाड्यातली खोली शोधून काढून पाहिली. तशीच काळोखी अजून आहे. कारण संस्थान १९४८ मध्ये विलीन झाल्यावर औंधात काही उरलेच नाही. सध्या औंध हे खटाव तालुक्यातले एक साधे गाव आहे, बस!

पवारवाड्यात तुम्हाला कधीमधी भाकरी करून दिलेल्या द्रुपदाच्या आईची चौकशी केली. पण तिथे भेटलेल्या तिशी-पंचविशीतल्या बायांना काहीच ठाऊक नसल्याचे दिसले.

तीच गत तुम्हाला गिरणीतले पीठ देणाऱ्या तुकारामाची. त्या वेळी नजरकैदेत असलेल्या त्या तुकारामाबद्दलही आता कुणाला काही सांगता आले नाही. त्याची ती गिरणी राजवाड्याच्या मागे होती, असे कळले. तिथे आता केवळ पडीक जागा आहे.

तुमच्या शाळेच्या पलीकडेच तळे आहे. तळे मात्र चांगले बांधीव आहे. पावसाळाच असल्यामुळे पाणीही भरपूर होते. दोन वर्षांपूर्वी दुष्काळ पडला. त्या वेळी याही तळ्याचे पाणी आटले होते म्हणे. मग पलीकडच्या याहून मोठ्या असलेल्या तळ्यातला गाळ काढला आणि झऱ्याची तोंडे मोकळी केली. तळ्याला पाणी आले. यावर्षी पाऊस जरा उशीराच पडला तरी बरा पडलेला आहे. दुष्काळाची चिन्हे सध्या तरी हटलेली आहेत, असे तिथले लोकच म्हणत होते.

याच तळ्यात अंघोळीला गेला असता, तुम्ही पाय घसरून पडलात आणि कसेबसे वाचलात, होय ना? नंतर तुम्ही झऱ्यावर अंघोळीला जाऊ लागलात. गावापासून जरा दूरच आहे तो, पण मुद्दाम पाहून आलो. कारण एकदा कविता करून तुम्ही ती या झऱ्यालाच ऐकवली होती आणि नंतर त्यालाच अर्पण केली होती. पू. विनोबाही असेच करायचे. घरी गागोद्याला असताना चुलीत अग्नीच्या स्वाधीन कविता करायचे नि काशीला गेल्यावर गंगार्पण करून टाकायचे!

पण गुरुजी, भर पावसाळ्यातही तुमचा हा झरा कोरडा ठणठणीत दिसला. असा हा कोरडा का म्हणून मी विचारले, तेव्हा बरोबर आलेल्या दुसऱ्या

एका शिक्षकांनी सांगितले की, वरती धरण झाले आहे. बांध पडला आहे. खाली पाणी येत नाही!

गावकऱ्यांजवळ एकनाथ, मुजावर, हमजखान, गोविंदा, बंडू, मोदी या तुमच्या शाळा सोबत्यांची चौकशी केली, पण कुणाचाच पत्ता कळला नाही. नाही म्हणायला बाबूशा मोदीचे धाकटे बंधू मात्र भेटले. ते आता सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आहेत. त्यांच्या घरी जाऊन आलो. मध्यंतरी बरेच आजारी होते. आता बरे आहेत त्यांनी तुमच्या संस्कृत पाठांतराची आठवण सांगितली.

पाठांतरावरून आठवण झाली. तुम्हाला काळे नावाचे शिक्षक त्या वेळी होते. ते आता पुण्यालाच मुलाकडे असतात. पाच-सहा महिन्यांपूर्वी त्यांच्याकडे गेलो होतो. त्या वेळी त्यांनीही तुमच्या स्मरणशक्तीची, अभ्यासू वृत्तीची वाखाणणी केली होती. म्हणाले, ''त्या वेळी सगळे नवनीत त्याला पाठ होते. अत्यंत हुशार होता साने.''

गुरुजी, हे काळे सर किंवा म. म. दत्तो वामन पोतदार हे तुमचे शिक्षक व प्रोफेसर जेव्हा जेव्हा तुमचा एकेरी 'साने' असा उल्लेख करतात ना, तेव्हा ऐकताना गंमत वाटते! त्यांचा अधिकारच तो.

औंधच्या अरुंद गल्लीतून जाताना मनात येऊन गेले, याच रस्त्याने गुरुजी माधुकरी मागायला गेले असतील!....

दुपारी तुमच्या शाळेतल्या मुलामुलींना गोष्ट सांगितली आणि सर्वांचा निरोप घेऊन निघालो.

येताना दोन-तीन तास रहिमतपूरला डॉ. देशपांडे अण्णा आणि सौ. आशाताई यांच्याकडे थांबलो. १९४६ साली तुम्ही निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने इकडे आला होता, त्या वेळी त्यांच्याकडेच उतरला होता. गप्पाटप्पा झाल्या. जेवण करून रात्रीची एस. टी. गाठली आणि पुण्यास परत आलो.

तुमचा,

२१ सप्टेंबर १९७४ — *राजा*

■ □ ■

# ३.

## *प्रिय पूज्य साने गुरुजी,*

एकदा मी अप्पांना म्हणजे तुमच्या 'पीं'ना विचारले, तुम्ही साने कुठले? काय? इत्यादी. अप्पांनी सांगितले. पण म्हणाले, ''एकदा आपण आमच्या काकांच्याकडे जाऊ.'' काका म्हणजे तुमचे रामकृष्णकाका! हल्ली आपल्या मुलाजवळ कुलाबा जिल्ह्यातील पेण येथे असतात. याच पेण गावी तुम्हाला चांदवड युवक परिषदेत, इंग्रजांच्या दृष्टीने आक्षेपार्ह भाषण केल्यामुळे १९४१ सालच्या २ जानेवारीला अटक झाली होती; तिथून प्रथम तुम्हाला नाशिकला आणले आणि शिक्षा झाल्यावर तुम्हाला धुळ्याच्या तुरुंगात नेण्यात आले होते. आणि तेथेच तुमची नि ब्लेक नावाच्या जेलरची गाठ पडली. परवा मी ब्लेक यांनाही भेटलो.

तर मुंबईहून अप्पा आले, मी पुण्याहून गेलो. पेणच्या एस. टी. स्टँडवरच आमची गाठ पडली. रामकृष्णकाकांचे चिरंजीवही त्यांच्याबरोबर होते. मग आम्ही त्यांच्या घरी गेलो. काका आता ८५ च्या घरात असतील. शरीर सुरकुतले आहे. डोळ्यांना तर दिसतच नाही. पण वाणी मात्र खणखणीत आहे. वृद्धापकाळामुळे अधूनमधून शब्द थोडे निसरडे उमटतात. पण त्याहून काकांचे स्मरण अजब वाटले! किती तरी गोष्टींच्या तिथी, तारखा, साले तोंडपाठ! काकांनी पुष्कळ जुन्या जुन्या आठवणी सांगितल्या. सांगता सांगताच म्हणायचे, 'हा शिंच्याऽ' आणि एकदा जेव्हा त्यांच्या हे लक्षात आले तेव्हा वरच्या पट्टीतले बोलणे थांबवून एकदम खालच्या पट्टीत येऊन मला म्हणाले, ''बोलता बोलता, हा शिंच्याऽऽ, रांडीच्याऽऽ! असे म्हणायची मला सवय आहे हो, ती आता जायची नाही. माझ्या बरोबरच जाईल. तर तुम्ही राग नका मानू!'' ''ते काही नाही, काका तुम्ही बोला.'' मी म्हणालो. आणि पुन्हा काकांची रसवंती सुरू झाली. आपण बीना, इंदूर इकडे कसे गेलो होतो, गावच्या गणपती उत्सवात नाटके कशी बसवीत होतो. याच्या रसाळ आठवणी ते सांगत होते. सांगताना ते इतके रंगून गेले होते की, ती ती आठवण ते जणू पुनश्च जगत आहेत

असेच वाटत होते. त्यांचे नाटकाचे वेड मात्र और हां!

एकदा विषयाचा संदर्भ सुटला आणि म्हणाले, ''त्या वेळी महाराष्ट्र नाटक मंडळी इंदुरास होती. मोडकळीस आली होती रे. तर त्याच सुमारास काकासाहेब खाडिलकरांनी कीचकवध लिहून दिलंन्! १९०७ साल! पुढे तिकडून मी पालगडास आलो. गणपती उत्सव आला. म्हटले कीचकवधच करायचे. मी बनलो बल्लव! अरे, आता असा चिपाडासारखा दिसतोय रे, पण त्या वेळी होतो माजलेल्या रेड्यासारखा. (त्या वेळी काकांनी आपले कृश दंड थोपटले.) तर मी बल्लव बनलो. नाटक बसवणारा मीच रे.''

आणि पुढे एकेक प्रसंग सांगून काकांनी कीचक, सैरंध्री, कंकमहाराज, बल्लव यांची संभाषणे धडाधड साभिनय म्हणायला सुरुवात केली. सैरंध्रीचे भाषण करताना ते तेवढ्यातही बायकी आवाज काढायचा प्रयत्न करायचे! हावभाव बदलायचे. मला त्यांची गंमत वाटली आणि त्यांचे ते जबर पाठांतर पाहून मी थक्कही झालो! आपला मुद्दा पटवताना काका चटकन् आर्या, साकी, श्लोक म्हणायचे.

सांगता सांगता म्हणाले, ''ह्या जिभेने असत्य भाषण कधी केलेले नाही हो! काय, आले का लक्षात? ह्या जिभेने असत्य भाषण कधी केलेले नाही. अरे, रामशास्त्री म्हणायचे मला. का?'' काकांना 'काय', 'आले का लक्षात?', किंवा 'का?', 'काय समजले?' असे सांगता सांगता मध्येच विचारण्याची सवय दिसली. काही काही लोकांना अशा गंमतीदार सवयी असतात. आमचे एक कविमित्र दोन-चार वाक्ये सांगून झाली की, विचारत असतात, 'कळलं?' 'कळलं?' ऐकणाऱ्याला काही कळतच नाही अशीच जणू समजूत! दुसरे असेच एक स्नेही आहेत. त्यांना अशी सवय की, काही तरी विधान करायचे आणि त्यावर तुम्ही हसला तर ते लगेच विचारणार, 'का? हसला का?' मग आपल्याला हसलो का याचे स्पष्टीकरण देणे भाग पडते. बरे न हसता गप्प बसलो तरी ते विचारणारच, ''का, गप्प का? बोलत नाही?'' मग गप्प का, याचेही स्पष्टीकरण द्यावे लागते! अशी ही एकेकाची तऱ्हा!

तर काकांनी ''मला रामशास्त्री म्हणतात. का?'' असा प्रश्न विचारून आपणच त्याचे उत्तर दिले की, ''अरे १९१४ साली 'भाऊबंदकी' नाटक केले होते, आले का लक्षात? त्यात रामशास्त्री मीच!''

आणि एवढे सांगून काकांनी रामशास्त्र्याचा एक परिच्छेद चक्क म्हणून

दाखवला! साभिनय!

गुरुजी, खरेच! तुमचे हे रामकृष्णकाका अभिनयकुशल आहेत. ऐन तारुण्यात तर किती नाट्यगुण त्यांच्याजवळ असतील! तुम्ही एके ठिकाणी म्हटलेलेच आहे. त्यांच्यासंबंधी की, 'माझे चुलते तर एक उत्कृष्ट नट होते. ते जर गाव सोडून बाहेर पुण्या-मुंबईस जाते तर त्यांनी आपल्या गावाचे नाव केले असते!'

परवा काकांच्या भेटीत तुमच्या म्हणण्याचा प्रत्ययच आला! आणखी एक सांगू तुम्हाला, गुरुजी. मागे १९५२ च्या सुमारास 'श्यामची आई' चित्रपट काढण्याच्या निमित्ताने आचार्य अत्रे पालगडला गेले होते. त्यांनी काकांची भेट घेतली होती. त्या वेळी काकांनी 'श्यामची आई' मध्ये भूमिका करण्याची आपली तयारीही आचार्यांच्याजवळ दाखवली होती.

काकांना गावकीतल्या अनेक गोष्टींची माहिती दिसली. तसे ते पुरोगामी विचारांचेही वाटले. एक प्रकरण त्यांनी सांगितले. म्हणाले, "गावच्या समारंभाच्या वेळी मी जेवायला कधी जायचा नाही; कारण तिथे दक्षिणा असायची. तर एकदा आमच्या गावचा शंकर भागवत (मुंबईला असायचा तो) तर आला होता घरी. समारंभाची पंगत होती. तर हा दाढी करून गेला. पण त्याचे हे दाढी करणे गावातल्या काही मंडळींना आवडले नाही; आणि त्याला भर पंक्तीतून उठवून लावला! निव्वळ दाढी केली म्हणून! आले का लक्षात! निव्वळ दाढी केली म्हणून!

"मला हे संध्याकाळी कळले गणपतीच्या देवळात. मी रोज गणपतीला जायचो दर्शनाला. दुपारचा प्रकार कळल्यावर मला आला राग. माझ्या एका गावकऱ्याचा भर पंक्तीत इतर गावच्या लोकांसमक्ष असा अपमान झालेला मी कसा सहन करणार? मीही ठरवले, उद्याच्या पंक्तीला आपणही दाढी करूनच जायचे. आणि तसा दाढी करून गेलो की रे. मला पाहताच एकाने हाक मारली,

"रामकृष्णा!"

"काय?"

"तू हे करून आलायस, तर हे काही बरे नाही."

मी म्हणालो, "चुकले काय यात? अहो, काही वाचत चला. परिस्थिती बदलली आहे. आपणही बदलले पाहिजे; न बदलून कसे चालेल?"

पण त्यांना हे पटले नाही. म्हणाले, ''गावचे आम्ही कोणी आहोत की नाही?''

मीही म्हणालो, ''मीदेखील गावातलाच आहे. होऊन जाऊ द्या!''

असे हे तुमचे काका. त्यांनी त्यांच्या लग्नात तुम्हाला कोट शिवला होता. तुम्हाला थालिपीठ आवडायचे म्हणून आपली बायको तुमच्यासाठी थालिपीठ कशी करायची, पंढरपूरच्या उपोषणाच्या वेळी तुम्ही त्यांना पत्र लिहून घरचा आशीर्वाद मागितला होता, आणि काकांनी तार करून तुम्हाला यश चिंतले होते..... इत्यादी तुमच्यासंबंधीच्या आठवणी काकांनी सांगितल्या.

तसा त्यांचा तुमच्यावर रागही दिसला. पण बोलता बोलता एकदा म्हणाले, ''आर्थिकदृष्ट्या बाबूने आणि लौकिकदृष्ट्या पंढरीने साने घराण्याचे नाव केले आहे!''

काकांची ती अजब स्मरणशक्ती आणि विलक्षण पाठांतर पाहून माझ्या असे लक्षात आले की, तुमच्या साने घराण्यातच हा गुण असावा. अप्पांचेदेखील किती जबर पाठांतर आहे! आणि तुमचे तरी काय! बोलायला उभे राहिलात म्हणजे कुठले कुठले संदर्भ तुम्ही देत असा. गीता, वेद, उपनिषदे, कुराण, बायबल, पुराणे, इतिहास..... इतके कसे काय तुम्हाला चटकन आठवायचे कुणास ठाऊक! तुमचे भाषण ऐकताना, तुम्ही दिलेले संदर्भ पाहून त्या वेळी मी असाच चकित होत असे. अजूनही मला ते फार विलक्षण वाटते! तुमची ती कमाई आहे हे खरेच, पण काकांच्या भेटीनंतर तुम्हाला तुमच्या घरातूनही हे लेणे लाभलेले आहे असे दिसले. तुमचे आजोबा रुद्र म्हणायचे, तो ऐकून तुमच्या पणजीलाही तो पाठ झाला होता, असे तुम्ही लिहिलेच आहे.

गतवर्षी २४ डिसेंबरला साधनेच्या कुमार अंकाचे प्रकाशन अप्पांच्या हस्तेच झाले. त्या वेळीदेखील अप्पांनी तुमच्या पुष्कळ पुष्कळ आठवणी सांगितल्या. त्यात या पाठांतराच्याही होत्या. औंधहून तुम्ही सुट्टीत पालगडला घरी गेलात, त्या वेळी 'नलदमयंती आख्यान', 'गंगालहरी' आणि इतर किती तरी श्लोक तुम्ही त्यांना शिकवले, असे त्यांनी सांगितले. औंधला गेलो तेव्हा बाबूशा मोदीचे बंधू भेटले, तर तेही म्हणाले, ''वर्गात शिकवलेला संस्कृतचा लेसन रात्री ते आमच्या ब्रदरला आणि इतर विद्यार्थ्यांना जसाच्या तसा म्हणून दाखवत असत.''

अप्पांनी त्या दिवशीसुद्धा पुष्कळ जुने जुने श्लोक, कविता भाषणाच्या

ओघात सहजपणाने उद्धृत केल्या. मी नंतर त्यांना म्हणालोही, ''अप्पा, तुमचेही पाठांतर भलतेच आहे की!'' यावर जवळच बसलेले श्री. विठ्ठलराव घाटे म्हणाले, ''ज्याची मनापासून आवड असते ते सहज पाठ होते.''

कवितेच्या अथवा शब्दांच्या भेंड्यांमध्ये तुम्ही कसे कुणाला हार जात नसत, हे मी ऐकलं आहे आणि एकदा तर पाहिलंही आहे. मंदिर प्रवेशाच्या वेळच्या प्रचार दौऱ्यात एकदा आपल्या त्या वैशिष्ट्यपूर्ण मोटारीत शब्दांच्या भेंड्यांचा खेळ सुरू झाला होता. सेनापती, वसंत बापट यांसह आम्ही सर्व एकीकडे व तुम्ही एकटे एकीकडे! होता होता 'ड' अक्षरावर आमची गाडी अडायला लागली. आणि तुम्ही 'ड' पासून सुरू होणारे अक्षरच नेमके देऊ लागलात. अखेरीस सेनापतींसारखे शब्दांच्या व्युत्पत्तीचे जाणकार, वसंत बापटांसारखे संस्कृत भाषेचे अभ्यासी कवी आणि आम्ही इतरेजन डोके खाजवीत बसलो आणि अखेरीस हरलो. पण त्या दिवशी तुम्ही खूपच मजेच्या मूडमध्ये होता. चटकन शब्द सांगितला नाही.

विचारलेत, ''हरलात ना?''

आम्ही म्हणालो, ''हो.''

मग तुम्ही सांगितलेत, ''तर मग हात जोडा. म्हणा, साने गुरुजी! आम्हाला 'ड' अक्षरापासून सुरू होणारा शब्द येत नाही. आम्ही हरलोत.''

आमच्याकडून हे वदवून घेतल्यावर तुम्ही पटकन शब्द सांगितलात, ''डालडा!''

आणि मग सगळ्यांचीच हसता हसता पुरेवाट झाली! अशा किती तरी गंमती.

अप्पा एकदा मला म्हणाले, ''बोर्डीला अण्णा आला म्हणजे समुद्रावर तासन्तास जाऊन बसायचा. म्हणायचा, चल पी, आपण लाटांवर बसून आफ्रिकेला जाऊ या! कधी म्हणायचा, काय रे पी! आज टी-वेदर आहे नाही का? म्हणजे मी ओळखायचा की ह्याला चहा हवा आहे. जेवायला बसलो म्हणजे सगळ्यांचे होईपर्यंत बसायचा. भाताची खालची खरपुडी अण्णाला फार आवडायची...''

गुरुजी, आता घरोघरी गॅस नि कुकर झाले आहेत. भाताची खरपुडी दुर्मिळ झाली आहे. अधुनमधून 'टी-वेदर' मात्र झकास असते!

तुमचा,

२८ सप्टेंबर १९७४ — **राजा**

■ □ ■

# ४.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

मागच्या पत्रात मी मि. ब्लेक यांचा उल्लेख केला होता. १९४१-४२ साली तुम्ही धुळ्याच्या जेलमध्ये असताना ते तिथे जेलर होते. खरे तर बंदी आणि तुरुंगाधिकारी यांचे सूत तसे कधी नसते. नाशिकच्या तुरुंगात १९३३ साली तुम्हाला याचा अनुभव आला. पण सगळेच काही रोच नसतात, एखादा ब्लेकही त्यात असतोच.

ब्लेक परवा सात-आठ महिन्यांपूर्वीच इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स पदावरून सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर पुणे-हडपसरच्या दरम्यान एका कॉलनीत त्यांनी स्वत:ची टुमदार बंगली बांधलेली आहे. तिथे मी त्यांना भेटून आलो.

तुमच्या संदर्भात मी आलो, तुमच्या आठवणींत काही वेळ चांगला जाणार याचा केवढा आनंद त्यांना झाला होता! ब्लेक यांच्या मनी तुमच्याविषयी केवढी आदरभावना आहे! त्यांच्या बोलण्यात आणि त्यांच्या डोळ्यांत ती ओतप्रोत भरलेली होती. 'ही वॉज ए सेंटिमेंटल मॅन' असे ते तुमच्याविषयी अधुनमधून सारखे म्हणायचे!

त्यांनी सांगितले, ''धुळ्याच्या जेलमध्ये दीड वर्षांची शिक्षा होऊन गुरुजी आले, तेव्हा त्यांना 'अ' वर्ग दिलेला होता पण त्यांनी आपणहून 'क' वर्ग मागून घेतला.'' 'अ' वर्ग मिळावा म्हणून खटपटी नि लटपटी करणारे कित्येक महाभाग तुरुंगाधिकारी म्हणून ब्लेक यांना ठाऊक होते. त्यामुळे 'अ' वर्ग मिळाला असतानाही 'क' वर्ग मागून घेणारा हा बंदी त्यांना काही वेगळाच वाटला!

गुन्हेगार कैद्यांना जो एक धाकदपटशा दाखवता येतो, जी एक जरब बसवता येते, तशी राजकीय कैद्यांच्या बाबतीत येत नाही. त्यांना हक्काची भाषा कळत असते, अन्यायाची जाण असते. शिवाय परकीय सत्तेशी लढूनच ते तुरुंगात आलेले असतात. त्यामुळे परकीय सत्तेप्रमाणेच, परकीय सत्तेचे रक्षण करणारे किंवा ती राबवणारे अधिकारी यांच्याविषयी एक प्रकारची तुच्छतेची

भावना राजबंद्यांत असते. त्यामुळे धाकदपटशाने त्यांना काबूत ठेवणे अधिकाऱ्यांना अशक्यच असते. पण विनोबांसारखा किंवा तुमच्यासारखा प्रेमळ पुरुष राजबंद्यांनाच काय, जेलरलाही मोठ्या आधारवडासारखा वाटतो! १९३२-३३ साली धुळ्याच्याच तुरुंगात दळणावरून जेलर आणि राजबंदी यांच्यात अशीच तेढ निर्माण झालेली होती. पण विनोबांनी मध्यस्थी करून ती मिटवली. अमुक एक पौंड दळणाचा ठेकाच राजबंद्यांच्या वतीने त्यांनी घेतला आणि राजबंद्यांनीही त्यांना साथ दिली. निर्बंधापेक्षा नीतीचे आणि दंडुक्यापेक्षा दिलाचे कायदे नेहमीच श्रेष्ठ ठरतात! धुळ्याच्या तुरुंगातील संघर्ष त्या वेळी टळला. तुम्ही त्या वेळी तिथेच होतात. नंतरच्या शिक्षेच्या वेळीदेखील तुमच्या तेथील अस्तित्वाने जेलची शिस्त राखण्यास आणि शांतता ठेवण्यास तुमची फार मदत झाली, असे ब्लेक यांनी कृतज्ञतापूर्वक सांगितले. ते म्हणाले,

"त्या काळात हिंदुस्थानातल्या सर्व प्रांतांतल्या सर्व तुरुंगांमधून दंगली झाल्या. पण धुळे तुरुंगात तसे काही घडले नाही. शांतता आणि शिस्त राहिली ती केवळ गुरुजींमुळे."

ब्लेक यांनी आणखीन एक गंमत सांगितली. खिसेकापू लोकांच्या कसबाविषयी तुम्हाला फार कुतूहल वाटत असे, खरे ना? तर तुम्ही एकदा 'कसे काय हे लोक खिसे कापत असतील?' असे ब्लेक यांच्याजवळ सहज म्हणालात. मग ब्लेकनी तुम्हाला प्रात्यक्षिकच दाखवायचे ठरवले व एक पॉकेट वॉच तुमच्याजवळ दिले. तुम्ही ते खिशात बंदोबस्तात ठेवले. पण एका कैद्याने ते तुम्हाला न कळताच मारले!.... ब्लेक हसून हसून ही गंमत सांगत होते.

ही गंमत झाली त्या वेळी, पण पुढे मुंबईला साधनेचा संसार मांडल्यावर लोकलमधून जाताना तुमच्या खिशातून हजार रुपये गायब झाले होते, हे आठवते का?

तुमची फुलांची आवड ब्लेकच्याही लक्षात आलेली होती. आणि तुमचे फुलासारखेच मनही ब्लेकनी जाणले होते. म्हणूनच ते बोलता बोलता म्हणाले, "फायनेस्ट मॅन आय मेट इन माय लाइफ!"

तुरुंगवास कठीणच. माणसांच्या काही गरजा असतात. काही सवयी असतात. तुरुंगात आल्याबरोबर त्या थोड्याच जाणार? तुरुंगात तुरुंगासारखे वागणारे, राहणारे तुमच्यासारखे फारच क्वचित. बाकीचे तिथेही सोयी करून घेणारे; त्यासाठी खटपटी लटपटी करणारेच अधिक. ब्लेक म्हणाले, "गुरुजींनी कधीही

कसली तक्रार केली नाही की कसली सवलत मागितली नाही... नेव्हर नेव्हर आस्क्ड् फॉर एनी फेव्हर...''

पण हे तुरुंगातच कशाला, बाहेर तरी तुमच्या काय गरजा होत्या नि कसल्या तक्रारी होत्या? स्वत:साठी म्हणून कधी कसली फेव्हर तुम्ही अपेक्षिली होती?

*एक मात्र चिंतन आता एकचि विचार*
*भाग्यपूर्ण होईल कैसी हिंदभूमि थोर।*
*दुःख, दैन्य जाउन विलया होउ दे स्वतंत्र*
*जन्मभूमी माझी, ध्यानि मनी हाच मंत्र॥*

*देश, देव सेवेसाठी सर्वही करीन*
*चित्त वित्त जीवन माझे सर्व हारवीन।*
*प्राणपुष्प माझे माझ्या मातृभूमीकामी*
*जरी येई उपयोगाला कितिक होई नामी॥*

अशी इच्छा तुम्ही उराशी सतत बाळगत होता. तुमच्या अशा काही गरजा वा सवयी नव्हत्या; तरी त्या असणाऱ्यांचा कधी तुम्ही तिटकारा केला नाही, किंवा त्यांना तुच्छही लेखले नाही. नाहीतर व्रतनिष्ठांना आपल्या व्रतांचाच अहंकार एवढा चढलेला असतो की सांगता सोय नाही! तुमच्या काळात व्रतपालनाची एक प्रचंड लाटच गांधीजींच्यामुळे या देशात आलेली होती. गांधीजींनी एकादश व्रतांचा पुरस्कार केला आणि अनेकांनी ती व्रते स्वत:वर लादून घेतली. मी मुद्दामच 'लादून घेतली' असे म्हणतोय; कारण पुढे त्यांचे जनलोकात किती हसे झाले हे आम्ही पाहिले आहे. यांची खाणी-पिणी सांभाळता सांभाळता नाकी नऊ यायचे यजमानांच्या. वर यांचा तोरा! साधे चहा-कॉफीसारखे पेय घेणारा यांच्या दृष्टीने पार अध:पतित!

खुद्द गांधीजींनीही अशी दृष्टी कधी ठेवली नव्हती. व्रतस्वीकार हा त्यांना स्वेच्छेने हवा होता आणि स्वत:च्या सर्वशुद्धीसाठी हवा होता. त्यांच्याही दृष्टीने चहा बहिष्कृत होताच. पण प्रयत्न करूनही महादेवभाईंना तो सोडता आला नाही, म्हणून बापूंनी त्यांच्यावरची आपली माया कमी केली नव्हती.

१९४२ च्या ऑगस्टमधलाच प्रसंग. दिवसभर वर्किंग कमिटीची मिटिंग चालली होती. 'छोडो भारत'च्या ठरावावर चर्चा सुरू होती. वातावरण तंग, गंभीर होते. महादेवभाई टिपणे घेत होते. सायंकाळ व्हायला आली. महादेवभाई

आपल्या कामात गढलेले! गांधीजींच्या लक्षात आले. चटकन ते उठले आणि पटकन त्यांनी रसोड्यात जाऊन चहा करून आणला. महादेवभाईंना दिला! असा हा व्रती महात्मा आणि माणूस.

परवा धुळ्याला गेलो त्या वेळी तुमचे एके काळचे गिरणी कामगार संघटनेतले सहकारी कॉम्रेड शंकरराव सापे भेटले. ते सांगत होते, ''जेलमध्ये मी गुरुजींच्याबरोबर होतो. मला आणि नथूभाऊ पारोळेकरांना विडी ओढण्याचे व्यसन होते. तर गुरुजींनी काय केले, सगळ्या विड्या आपल्या ताब्यात घेतल्या, जवळ ठेवल्या; आणि जेवण झाले की, आम्हा दोघांना हाक मारून एकेक विडी द्यायचे न चुकता रोज!''

धुळ्याच्याच काय, नासिक, येरवडा आणि त्रिचनापल्लीच्या तुरुंगात असतानादेखील तुमच्याभोवती तरुण सत्याग्रहींचे कडे असायचे. मग तुम्ही त्यांना नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगायचे. कुणाला काही शिकवायचे. चाळीसगावला कोणी एक पाटील भेटले. 'जेलमध्ये मला गुरुजी इंग्रजी शिकवित होते,' म्हणाले. तुम्हीच म्हणत होतात, 'ज्याच्याभोवती पोरे पिंगा घालतात तो मास्तर चांगला.'

ब्लेक यांच्या नजरेतून हेही सुटलेले नव्हते. तेहेतीस-एक वर्षांपूर्वीचे धुळ्याच्या तुरुंगातले ते दृश्य अद्यापही त्यांच्या डोळ्यांपुढे तरळत असावे. म्हणाले, ''ही वॉज अ ग्रेट एज्युकेशनिस्ट... ग्रेट ग्रेट. ते एक महान शिक्षक होते. खरोखर महान! मला मराठी त्यांनीच शिकवले.'' मला नवल वाटले. मी विचारले, ''तुम्ही गुरुजींची पुस्तके वाचलीत का काही?''

''फार नाही, एकच वाचलेय.''

''कोणते?''

''श्यामची आई!''

आणि ब्लेक यांचे डोळे पाणावले.

गदगदलेल्या स्वरात म्हणाले, ''ही वॉज अ व्हेरी टेंडर-हार्टेड मॅन. व्हेरी व्हेरी सेंटिमेंटल मॅन... ही वॉज नॉट अ मॅन ऑफ धिस वर्ल्ड... (ते अतिशय सहृदय होते. भावनाप्रधान होते. जणू या आपल्या जगाचे रहिवासीच नव्हते.)

गुरुजी, तुमचा परिचय, सहवास आणि लोभ ब्लेक यांना फार मोलाचा वाटतो. तुमचा त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबियांवर तसाच लोभ होता. पंढरपूर मंदिर-प्रवेश प्रचाराचा दौरा त्या वेळी अहमदनगर जिल्ह्यात सुरू होता. १९४७ साल. विसापूर जेलजवळच्या रस्त्याने आपली मोटर चालली होती. कुणी तरी

म्हणाले, ''सध्या इथे ब्लेक जेलर आहे!''

तुम्ही हे ऐकले आणि गाडी उभी करायला लावलीत. जेलजवळच असलेल्या ब्लेक यांच्या घरी जाऊन त्या सर्वांना भेटून आलात.

पुढे तुमचा दौरा संपला आणि पुढे पंढरपुरी तुम्ही १ मे १९४७ पासून उपोषणास बसणार हे जाहीर झाले. ती वार्ता ऐकताच अवघ्या महाराष्ट्रालाच काळजी वाटू लागली. ब्लेकही चिंतेने व्याकुळले. तुम्ही या दिव्यातून सुखरूप पार पडावे म्हणून ते प्रभूजवळ प्रार्थना करीत राहिले. आणि जेव्हा तुमचे उपोषण सुटल्याची वार्ता त्यांनी वृत्तपत्रात वाचली, तेव्हा आनंदाने १३ मे ४७ रोजी त्यांनी तुम्हाला पत्र लिहून आपल्या भावना कळवल्या होत्या....

''.... व्हेन आय रेड इन दि पेपर्स दॅट यू हॅड स्टार्टेड युवर फास्ट ऑन फर्स्ट ऑफ मे, आय फॉलोड वुइथ ग्रेव्ह. अ‍ॅंझायटी दि कंडिशन ऑफ युवर हेल्थ. आय वॉज, हाऊएव्हर, ओव्हरजॉइड टु रीड इन यस्टरडेज पेपर्स दॅट यू हॅव वन् युवर कॉज अँड हॅव ब्रोकन युवर फास्ट. दि लॉरेल्स आर ऑल युवर्स. माय हार्टिएस्ट काँग्रॅच्युलेशन्स! मे गॉड ब्लेस यू!''

(तुमच्या उपवासाबद्दल वर्तमानपत्रात वाचले आणि किती म्हणून काळजी वाटली. कालच तुमच्या उपवासाची यशस्वी परिसमाप्ती झाल्याचे वाचले, आणि किती आनंद झाला म्हणून सांगू! तुमचे हार्दिक अभिनंदन! देवाचे छत्र तुमच्यावर सदैव असो!)

तुम्हीही नंतर त्यांना पत्र पाठवले होते. त्यालाही ब्लेकनी २८ मे रोजी उत्तर धाडले होते. ''...आय होप यू आर ऑन दि रोड टू कंप्लीट रिकव्हरी बाय नाऊ अँड वुईल सून बी युवर ओन सेल्फ अगेन....'' (तुमची तब्येत आता पूर्ववत झाली असेल अशी आशा आहे.) याच पत्री ब्लेक यांनी, तुम्ही त्यांच्या मुलाला कधीतरी दिलेल्या एका भेटीबद्दल लिहिले आहे,

''... वुई आर ऑल वेल हिअर बाय दि ग्रेस ऑफ गॉड. माय सन बॅरी थिंक्स ऑफ यू अँड हॅज प्रिझर्व्हड युवर गारलँड ऑफ कॉटन वुइच ही ट्रेझर्स व्हेरी मच.''

(परमेश्वरकृपेने आम्ही सर्व खुशाल आहोत. माझा मुलगा बॅरी तुमची आठवण काढतो. तुम्ही त्याला सुताचा जो हार दिला तो एखाद्या रत्नासारखा तो जपतो.)

धुळ्याला गेलो त्या वेळी तिथली ती बंदिशाळा पाहून आलो. पू. विनोबाजी

ज्या कोठडीत राहात होते, तिथे आता त्यांचा फोटो लावला आहे आणि त्यांचे बरेचसे वाङ्मयही ठेवलेले आहे. तुम्ही राहात होतात त्या कोठडीत तुमचाही फोटो लावलेला असून 'खरा तो एकचि धर्म' या तुमच्या गीतातले चरण सुभाषितासारखे सर्वत्र भिंतीवर लावलेले आहेत. तुमच्या कोठडीत कैद्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या शाळेचा एक वर्गही आता भरवण्यात येतो.

नंतर जिथे ती गीताप्रवचने झाली ती मोठी, लांबलचक चिंचोळ्या हॉलसारखी जागाही पाहिली. पू. विनोबांचा एक वेगळाच, बिनदाढीचा आणि थोडा तरुण असा फोटो तिथे पाहिला. सध्या त्या जागेत कैद्यांचे उद्योगमंदिर आहे.

गुरुजी, तुम्ही त्या वेळी तिथे होता म्हणून विनोबांची ती प्रवचने शब्दबद्ध झाली, आणि आज सर्वांना उपलब्ध बनली. तुम्ही ती कशी भरभर लिहून घेत होतात, आणि नंतर त्याच रात्री ती कशी फेअर करून हातावेगळी करत होतात, यांच्या आठवणी त्या वेळी तुमच्याबरोबर 'कडी बरॅक' मध्ये असलेल्या तुमच्या सहकाऱ्यांकडून ऐकल्या. त्या वेळी काही जणांनी ती प्रवचने तुमच्या वहीवरून उतरून घेतल्याचेही सांगितले.

गुरुजी, भारतातल्या सर्व प्रमुख भाषांमधून आणि इंग्रजीतूनही आता ही विनोबांची गीताप्रवचने प्रसिद्ध झालेली आहेत; सर्वदूर पोचली आहेत. मराठीत तर ती हजारोंनी खपली आहेत. आपल्या पदयात्रेत विनोबाजी सायंकाळच्या प्रवचनानंतर थोडा वेळ 'प्रेमबाजार' भरवीत असत. म्हणजे ज्याला स्वाक्षरी हवी असेल त्याने गीताप्रवचनाचे पुस्तक खरेदी करायचे आणि विनोबा त्यावर 'नित्य पठनीय' असे लिहून स्वाक्षरी द्यायचे. गुरुजी, बघता बघता ह्या गोष्टी कालच्या झाल्या. त्यांचा इतिहास बनला.

तुमचा,

१९ ऑक्टोबर १९७४ *राजा*

■ □ ■

३५७६
२३/२/९९
बी.वा.

# ५.

## *प्रिय पूज्य साने गुरुजी,*

आठ-दहा महिने झाले असतील, मी शांतीदूत फडक्यांच्या घरी गेलो होतो. तुमची नि त्यांची जुनी म्हणजे १९२७-२८ पासूनची ओळख. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी अमळनेरहून ते, उत्तम पाटील जळगावजवळच्या पिंप्राळे आश्रमात दाखल झाले. तुम्हीही शाळेला रामराम ठोकून पिंप्राळ्याला आलात. मग पुढचे महाभारत घडले.

त्या वेळी हे फडके सूतकताई शिकवत असत. हां हां, आत्ता तुम्हाला ओळख पटेल, नि म्हणाल, 'अरे मग शंकर फडके म्हण की, शांतीदूत काय म्हणतोयस्?''

तुमचेही खरेच! मी आधीच सांगायला हवे होते. कारण तुमचे शंकर फडके आता बराच प्रवास करून पुण्यात स्थायिक झाले असून सध्या शुक्रवार पेठेत, फडगेटाच्या थोड्या जवळच 'शांतिदूत मंगल कार्यालय' चालवीत आहेत; तर त्यावरून मी त्यांना शांतिदूत फडके असेच नाव देऊन टाकले. अशी नावे ठेवण्याची मला फार जुनी खोड आहे हे तुम्ही जाणताच. आपल्या मंदिर प्रवेश प्रचार दौऱ्यात तुमच्या रत्नागिरीकडचाच एक मोरू नामक मुलगा होता. हरकामी असा तो मोरू होता. तर मी त्याला रोज एक नाव द्यायचा. आज काय तर त्रिंबक! त्या दिवशी दिवसभर मग त्रिंबक म्हणूनच त्याला हाक मारायची. दुसऱ्या दिवशी व्यंकटेश. त्या दिवशी दिवसभर मग तो व्यंकटेशच! तिसऱ्या दिवशी डेव्हिड! पुढे इब्राहिम, बळवंत, चार्लस्, रुस्तुम... काय वाट्टेल ते! आणि मोरूही मोठा गमत्या. त्या दिवशी तो त्या नावाने हाक दिली तरच 'ओ' द्यायचा. मला आठवतेय, एकदा-दोनदा सकाळी उठल्याबरोबर प्रवासाला निघताना तुम्ही मला 'आज याचं नाव काय रे?' म्हणून विचारले होते. आणि मी 'पोपट' म्हणून सांगून टाकले होते. तुम्ही मग त्याला त्या दिवशी 'पोपट, पोप्या' असंच म्हणत होता. अशी नावे ठेवण्याची खोड मी पुष्कळांना असलेली पाहिली आहे. आमचे ग. दि. माडगूळकर तर सरळ म्हणून

टाकतात, 'काय बाबासाहेब माकडे?', 'कसं काय फास्टर फेणे?', 'सर नेमीनाथ ऊऽऽऽपाध्ये!' माडगूळकरांचे मित्र आणि मराठीतले एक ख्यातनाम कथाकार श्री. पु. भा. भावे यांना तर अशा गमती करायची भारी हौस. आम्ही एकदा गोव्याला चाललो होतो. म्हापशाला गोमंतक साहित्य संमेलन होते आणि माडगूळकर अध्यक्ष होते. तर जाता-येता भावे आपले त्यांना 'म्हापुका म्हापुका' असेच म्हणायचे! गोखलेचे 'टोपले', चोरघड्याचे 'घोडेचोर' असे तर त्यांचे गंमतीने नेहमीच चाललेले असते.

गुरुजी, तुम्हीसुद्धा अशी नावे दिलेली आहेत. तुम्ही लिहिलेली जुनी जुनी पत्रं वाचताना, ती आढळतात. 'बोकोबा', 'भुत्या', 'डिच्च्या'.... अशी नावे अधूनमधून दिसतात. 'बोकोबांना मनासारखे काम मिळाले' असे एका पत्रात तुम्ही लिहिले आहे; तर 'परवा बोंऽची भेट झाली' असे दुसऱ्या एका पत्रात म्हटले आहे. 'भुत्याचा काहीच पत्ता नाही' असे एका पत्रात लिहिले आहे; तर 'डिच्युने मध्यंतरी घरी बरेच दिवसांत पत्र लिहिले नव्हते.' असे दुसऱ्या एका पत्रात म्हटले आहे. शोध केल्यावर कळले 'बो' किंवा 'बोकोबा' म्हणजे एस. आर. देशपांडे, 'डिच्यु' म्हणजे किसन तुळपुळे.

मध्यंतरी एसारांची गाठ पडली होती. खूप गप्पागोष्टी झाल्या. हल्ली ते नागपूरला असतात. किसन तुळपुळे मुंबईतच कामगारांत काम करतात. 'मिल मजदूर सभे'ची स्थापना १९४७ साली तुमच्या आशीर्वादानेच तर झाली होती. परवा ७२ साली मिल मजदूर सभेला २५ वर्षे झाली. रौप्य महोत्सव साजरा केला; त्यानिमित्त काढलेल्या स्मरणिकेत पहिल्या पानावरच तुमचे रेखाचित्र छापलेले आहे. तुमच्या धडपडणाऱ्या मुलांना तुमचा आधार अजून वाटतो.

तुमचा बगाराम तर आता केवढी जबाबदारी घेऊन दुर्गापूरला बंगालमध्ये आहे. मागे बिहारमध्ये असताना तुम्ही त्यांना 'प्रिय श्री.' म्हणून कितीतरी पत्रे लिहिली आहेत!

भुत्या कोण? हे काही नीटसे कळलेले नव्हते पण नंतर कळले मधू लिमये म्हणून.... गेल्या महिन्यात मुंबईच्या कोर्टात गेलो होतो. खटलाबिटला काही नाही हं! तिथे हल्ली प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट म्हणून जस्टिस बी. पी. सप्तर्षी असतात, तर त्यांना भेटायला. लंच अवरमध्ये गप्पा झाल्या. त्या वेळी त्यांनाही भुत्या कोण म्हणून विचारले होते. पण त्यांनाही आठवेना. गुरुजी हे मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणजे कोण, हे आले का लक्षात? अहो, बाळासाहेब

सप्तर्षी नगरचे. आता तुम्ही मघासारखेच म्हणाल, 'बाळशा एवढा मोठा झाला... !'

चळवळीत तुमची नि त्यांची केवढी गट्टी! येरवड्याच्या बंदिशाळेत तुम्ही बरोबरच होता. त्या वेळच्या एका पत्रात तुम्ही लिहिले आहे. '....बाळशा येथे आमची आई झाला होता. दूध वगैरे आम्हास देणे, कोणाचा खाऊ आला तर तो नीट पुरवून रोज सर्वांना देणे, चहा करणे, ताक करणे, सरबत करणे, शिकरण करणे —सारे बाळशा करी. तो नाशिकला गेला. आम्ही पोरके झालो आहोत! तो भाऊला ओळखतो. एकदा म्हणाला, 'म्हणजे सोक्या ना?'

सोक्या म्हणजे बोक्याचा भाऊ हे आलेच. एसारांचे बंधू भाऊराव देशपांडे!

मधू देशपांडे यांची अधूनमधून गाठ पडते. साधनेत काही व्याख्यान वगैरे कार्यक्रम असला म्हणजे कधी तरी स्वारी येते. हल्ली तोही पुण्यातच आहे. सरकारच्या शेतीखात्यातच मोठा हापिसर आहे. एकदा टोपणनावाबद्दल मी विचारले, तेव्हा तो 'धूठूजामळू' असे म्हणून हसू लागला. मी विचारले, "हे धूठूजामळू काय प्रकरण आहे?"

तसा तो म्हणाला, "हीदेखील गुरुजींचीच गंमत!"

"धूठूजामळू?"

"हं."

"म्हणजे काय पण?"

मग त्याने सांगितले, "४२ साली भूमिगत असताना नावं बदलावी लागत."

"हो. इमामसाहेब म्हणजे एसेम, भास्करराव म्हणजे नानासाहेब गोरे... ?"

"तर गुरुजींनी असंच एक पालुपद बनवलं होतं 'धूठूजामळू'.... यातील 'धू' म्हणजे मी मधू देशपांडे. 'ठू' म्हणजे विठू पटवर्धन, 'जा' म्हणजे राजा सरंजामे, म्हणजेच बाळ अभ्यंकर, 'म' म्हणजे रामदास फेणे, आणि 'ळू' म्हणजे निळू लिमये. मग बोलताना, 'अरे, 'धू' आला होता बरं का, 'ठू' कसा नाही दोन दिवसांत दिसला!' असे उल्लेख करायचे.

'धूठूजामळू' प्रत्येकाच्या नावातील दुसरे अक्षर घेऊन केलेली तुमची ही गंमत ऐकून हसू आले! परंतु या नावाच्या भोवऱ्यात अडकून मी कुठल्या कुठे आलो!

श्री. शंकरराव फडक्यांनी अमळनेर, धुळे येथील तुमच्या सहवासातील पुष्कळ आठवणी सांगितल्या. अमळनेरच्या 'तरुण मंडळा'ने तुमच्या कवितांचा

संग्रह 'पत्री' ह्या नावाने कसा छापला, ह्याची हकिगत सांगितली व त्या वेळची पण आता जुनीपानी झालेली पत्रीची एक प्रतही मला दिली. त्याचबरोबर तुमच्या हस्ताक्षरांमधील एका कवितेचे छायाचित्र व त्याची निगेटिव्हसुद्धा दिली. केवढी ही भक्ती! केवढे हे प्रेम!

छायाचित्रातली कविता स्वच्छ वाचता येते.

*तुझ्या करातील बनून पावा*
*कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा*
*करावया मूर्त शुभ स्वहेतू*
*करी मला साधन आपले तू॥*

*तुझाच आधार सदा मला रे*
*सदैव तारी मज तारका रे*
*मदंतरंगी करुनी निवास*
*सुवास देई मम जीवनास॥*

*करीन सेवा तव मोलवान*
*असो अहंकार असा मला न*
*मदीय आहे बळ अल्प देवा*
*बळानुरुपा मम घेई सेवा॥*

*असे तुला मागत एकमेव*
*तुझीच सेवा मज दे सदैव*
*सदैव होईन तुझा मजूर*
*सदैव होई मम तू हुजूर॥*

*असे तुझ्या मी चरणावरील*
*लहानसे क्षुद्र दरिद्र फूल*
*तुझ्या कृपेने रस गंध दावो*
*तुझ्याच सेवेत सुकोन जावो॥*

शंकरराव आठवणी सांगत होते. आत स्वयंपाकघरात त्यांच्या पत्नी काम करत होत्या. पण त्यांचे कान होते बाहेरच. राहवले नाही तशा त्या बाहेर

आल्या आणि त्याही आपल्या आठवणी सांगू लागल्या. त्यांचे नाव सौ. आशाताई फडके. यांची-तुमचीदेखील फार जुनी ओळख. पुण्यात घारेशास्त्रींकडे तुमचे येणे-जाणे होते. तर त्यांचीच ही मुलगी ताई. म्हणजे तुमचे डबल नाते झाले!

ताई म्हणाल्या, ''त्या वेळी आठ-नऊ वर्षांची असेन मी. तर एकदा वडिलांबरोबर गुरुजी सज्जनगडला गेले होते. परत आले तेव्हा मी अशीच सोप्यावरच्या झोपाळ्यावर झोका घेत बसले होते. गुरुजींना पाहताच झोका थांबवून उठले आणि त्यांच्या कमरेला मिठी मारली. तसे म्हणाले, 'थांब थांब. तुला प्रसाद देतो' आणि खिशातून शेंगदाणे काढून हातावर ठेवले!

''लग्न झाल्यावर घर-संसार पाहायला आले. अमळनेरलाच होतो आम्ही. म्हटले, 'गुरुजी, जेवायलाच या.' आले. घरात फार ताटे नव्हती. पत्रावळी घेऊन आले. जेवण झाल्यावर म्हणाले, 'दमलीस. बैस थोडी. गप्पा मारू' बाहेरच्या खोलीत बोलत बसलो. मध्येच ते उठले नि हळूच स्वयंपाकघरात गेले. सगळ्या पत्रावळी उचलल्या. उष्टी काढली. खरकटी भांडी गोळा केली. खुडखुड आवाज आला म्हणून आत जाऊन पाहिले तर सारी आवराआवर करून झाकापाक केलेली!

''धुळ्याला असतानाही आले होते. त्या वेळी सेवा दलाची मुलींची प्रौढ शाखा होती. माझी एक मैत्रिण पत्की म्हणून होती. ती आजारी म्हणून शाखेवर आली नव्हती. तर शाखा सुटल्यावर म्हणाले, 'चल, तुझ्या मैत्रिणीला पाहून येऊ!' गेले त्यांना घेऊन. पत्कीच्या बिछान्याशेजारी बसून विचारपूस केली, धीर दिला. तेवढ्यात चहा आला. मी म्हणाले, 'गुरुजी चहा नाही घेत.' तसे म्हणाले, 'आणा, आणा पिऊन टाकतो.' आणि चहा प्याले.'' अशा त्या तुमच्या आठवणी. साध्याच. पण किती हृदयंगम! कितिक वर्षे होऊन गेली. पण कशा हृदयसंपुटात जतन करून ठेवलेल्या आहेत. त्या ऐकताना त्यांच्या शब्दाशब्दांतून ओथंबणारा भक्तिभाव आणि डोळ्यांतून ओसंडणारे प्रेम हे मला अनुभवायला मिळाले. तसेच तुमचे प्र. द. पुराणिक आणि त्यांच्या पत्नी सौ. प्रमिलाबाई पुराणिक. प्र. द. पुराणिकांनी अमळनेर-जळगावच्या बऱ्याच आठवणी सांगितल्या. कधी कधी तुम्ही न जेवता तसेच राहात होतात. विचारले तर सांगायचे की, 'आयुर्वेदाच्या सिद्धांतानुसार खाल्लेल्या अन्नापासून बनलेल्या रक्ताचा प्रत्येक थेंब हा प्रेरणादायी बनावा लागतो. आज तसे घडत नाही म्हणून जेवत नाही!'

वरणगावला तुम्ही गेला होता, त्यावेळची आठवण सांगताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. हरिजनांना घेऊन सत्यनारायण केला म्हणून त्यांच्या आईला खूप दुःख झाले होते! जुन्या धार्मिक विचारांची ती माऊली. तिने आपल्या जिवाला त्रास करून घेतला. तुम्हाला हे कळताच १९४७ च्या त्या धावत्या दौऱ्यातही तुम्ही त्यांच्या घरी गेलात. आईने दूध पुढे केले तसे तुम्ही त्यांचे पाय धरून साष्टांग नमस्कार घातलात. उठेचनात. ती माता म्हणाली, ''उठा, किती वेळ नमस्कार करता?''

तुम्ही म्हणालात, ''प्रभाकरला पोटात घेतल्याशिवाय मी उठणार नाही. त्याचे काहीही चुकलेले नाही. त्याच्यावर राग धरू नका.''

हे ऐकताच त्या माऊलीच्या डोळ्यांतूनही प्रेमाश्रूंच्या सरी झरू लागल्या.

मायलेकरांचे परत मनोमिलन झाले.

प्रमिलाबाईंशीही तुमचे सासर-माहेर दोन्हींकडून नाते. त्या पारोळ्याच्या. पाठक आणि कंपनीचे पाठक तुमच्या परिचयातले. शाईवाले पाठक. त्यांच्याकडे तुमचे येणे-जाणे. प्रमिलाबाई म्हणाल्या, ''मी लहान होते. माझे भाऊ काँग्रेसचे कार्यकर्ते - विष्णू एकनाथ पाठक. पारोळ्याला आले म्हणजे गुरुजी घरी यायचे. आले की, माझ्याकडून गाणे म्हणून घ्यायचे, गोष्टी सांगायचे. गोष्टीची नवीन नवीन पुस्तके आणून द्यायचे. गुरुजींना भेंडीची व काल्र्याची भाजी फार आवडायची. जेवताना फार पदार्थ केले तर आवडायचे नाही...''

अशा आठवणी त्या सांगत. त्यांच्या मुलाचे 'प्रदीप' हे नावही तुम्हीच ठेवलेत, होय ना!

गुरुजी, सेवा दलात पाहिलेल्या, खेळलेल्या, तुमच्या गोष्टी ऐकलेल्या ह्या मुली आता चांगल्या पोक्त महिला झाल्या आहेत. त्यांच्या केसांवर आता रुपेरी छटा चढलेली आहे. काहींना जावई आले आहेत, तर काहींना सुना, काहीजणी तर आजी बनल्या आहेत!

प्र. द. पुराणिकांनी आपल्या हिंदी हायस्कूलमध्ये 'आंतरभारती'चा चांगला प्रकल्प साकार केला आहे. धडपड चालू आहे.

तुमचा,

२ नोव्हेंबर १९७४

*राजा*

■ □ ■

# ६.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

मागच्या पत्रात मधू देशपांडेबद्दल मी थोडे लिहिले आहे. तो सध्या कुठे आहे आणि काय करत आहे हेही कळवले आहे.

एकदा मी त्याच्या घरीच गेलो होतो.

पुण्यात असेंब्ली हॉलजवळ त्यांचे सरकारी प्रशस्त फ्लॅटस् आहेत.

त्याची पत्नी, मुले ठीक आहेत. मी गेलो तेव्हा त्याची पत्नी नातीला खेळवत होती. हो तर, तुमचा 'धू'देखील आजोबा झाला आहे!

गुरुजी, तुमचे समकालीन होते ना, त्यापैकी आता इथे असणारे सत्तर ते ऐंशीच्या घरात आहेत. तुम्हीच नाही का येत्या डिसेंबर १९७४ ला पंच्याहत्तर वर्षांचे होणार! तेव्हा तुमच्या बरोबरीपैकी ही मंडळी आता बरीच वृद्ध दिसू लागली आहेत. एकदा तुमच्या दत्तोपंत केसरी सरांनाही भेटलो होतो. ते पुण्यातच साने गुरुजी नगरात म्युनिसिपल कॉलनीत आपल्या मुलाकडे राहतात. त्यांचा मुलगा येथील कॉर्पोरेशनमध्ये आहे. तर केसरी सर खूपच वृद्ध दिसले. पिकल्या पानासारखे. सुरकुतलेले शरीर, खोल डोळे, पण तुमच्याविषयीचे प्रेम तसेच!

तर अशी पिकलेली तुमची पिढी आणि ज्यांना तुम्ही धडपडणारी मुले म्हणत होता ना, ती मुलेसुद्धा आता पन्नास ते साठीच्या घरात आहेत. आपल्या मुलामुलींना कुणी संसाराला लावून दिले आहे, कुणी त्यांच्या लग्नाची जुळवाजुळव करीत आहेत, कुणी अजून त्यांच्या शिक्षणाचे वगैरे पाहात आहेत. थोडक्यात, तुमच्या धडपडणाऱ्या मुलांनाही मुलेबाळे होऊन काहीजण तर रीतसर मामंजी, आजोबा आणि सासूबाई, आजी... बनलेली आहेत! गुरुजी, हे वाचून तुम्हाला आनंद आणि गंमत वाटेल, नाही का!

अहो, परवा दोन-एक वर्षांपूर्वी २५ जुलै ७२ ला आम्ही सेवा दलातील मित्रांनी वसंत बापटांचा पन्नासावा वाढदिवस साजरा केला! बापटांचा सर्व चटपटीतपणा तस्साच आहे पण केसांच्या बटांवर चंदेरी छटा नाही म्हटले तरी दिसतेच आहे.

आपल्या यदुनाथांची तर गंमतच केली आम्ही.

'साधने'च्या आंतरभारती सभागृहात ४ ऑक्टोबर ७२ च्या रात्री गाण्याचा आणि व्हायोलिन वादनाचा एक कार्यक्रम आयोजित केला होता.

मध्यरात्रीपर्यंत संगीताचा धुंद आनंद लुटला. बारा वाजले. ऑक्टोबरची ५ तारीख झाली, आणि एसेम उभे राहिले. म्हणाले, ''ही कार्यक्रमाची जशी इंटरव्हल आहे, तशीच आज यदुनाथच्या वयाचीही इंटरव्हल आहे. ते आज पन्नाशीच्या उंबरठ्यावर पोचले आहेत...'' आम्ही आनंदाने कडाडून टाळ्या वाजवल्या! तेव्हा कुठे आमचे गुपित यदुनाथांना कळले!

एकदा मजा झाली. एके ठिकाणी गेलो. एकजण आले आणि नमस्कार केला. मीही नमस्कार केला. तसा माझ्या चेहेऱ्यावरचा निर्विकारपणा पाहून ते म्हणाले, ''ओळखलं नाही वाटतं?''

'हं... हो.... नाही' असं काहीतरी म्हणालो. अशा वेळी पंचाईत होते. 'हो' म्हणावे तरी कठीण, 'नाही' म्हणावे तरी कठीण.

कारण एकदा दडपून 'हो-हो' म्हणालो तर समोरचे गृहस्थ म्हणाले, ''नाव सांगा बरं?'' जिरली! कुठून सांगणार? आठवतच नव्हतं. तरीपण कसंबसं सावरत म्हणालो, 'नाव... नाव काही आठवत नाही, पण चेहरा ओळखीचा वाटतो हं. लगेच ओळखलं. काय हो नाव?'.... मग असा प्रसंग मारून नेणे येते.

पण त्या दिवशी त्या गृहस्थांना चक्क 'नाही ओळखलं' म्हणून खरं खरं सांगून टाकलं. तसे ते म्हणाले, ''मी मोरेश्वर देशमुख.''

''अरे वा!'' ओळख पटून मी म्हणालो. आणि थोडं हलक्या आवाजात विचारलं, ''का हो, खोटे दात बसवलेत वाटतं?'' ''हो'' म्हणून हसले. खोटे शुभ्र दात चकाकले. खरंच गुरुजी, असे खोटे दात बसवले की, चेहऱ्याची ठेवणच बरीचशी बदलून जाते. त्यात बऱ्याच दिवसांनी-वर्षांनी गाठभेट झाल्यावर तर मग ओळख पटणे कठीणच जाते. आमच्यापैकी आता कुणी असे खोटे दात बसवले आहेत, चाळशा तर बहुतेकांना निदान वाचायला तरी लागलेल्या आहेतच, डोकी पांढरी-पांढुरकी सगळ्यांची झाली आहेत, काहींच्या माथ्यांवर मात्र अक्षरश: शपथेपुरतादेखील केस उरलेला नाही! चक्क तुळतुळीत टक्कल! परवा बाळ जोशीकडं भुसावळला गेलो. तो प्राचार्य आहे तिथे. सकाळी अंघोळ झाल्यावर म्हणालो, ''अरे, तुला तेल, कंगवा लागत नाही, पण मला दे

ना!'' —बाळच्या माथ्यावरील सर्व प्रदेश टक्कलमय झालेला आहे.

तर अशी ही तुमची मुलं वाढली आहेत, वाढत आहेत. शरीरावर वाढतेपणाच्या खुणा जरी दिसल्या तरी अनेकांची मने मात्र तुमच्या पवित्र स्मृतीने अजून ताजी टवटवीत आहेत. तुमचा कधीतरी घडलेला निसटता स्पर्श, एखादी आठवण, एखादी गाठभेट, एखादे ऐकलेले भाषण, एखादे दुरूनच झालेले ओझरते दर्शन.... आजही अनेकांच्या मनाला हिरवे राखीत आहे.

*हत-जीव-जीवनांच्या। रोपांस कोण पाळी*
*तू एक वाढविता। तूचि प्रबुद्ध माळी*
*हृदयी बसून माझ्या। फुलवी मदीय बाग*
*मातापिता सखा तू। गुरू तूचि सानुराग*
*फुलतील वाळवंटे। हसतील शुष्क राने*
*नटतील भू उजाड। गातील पक्षी गाणे*
*जरी त्वत्कृपा-वसंत। येईल जीवनात*
*चंडोलसा उडेन। संस्फूर्त गात गात*
*त्वत्स्पर्श अमृताचा। मजला मृता मिळू दे*
*मम रोमरोमि रामा। चैतन्य संचरू दे*
*आता सदा दयेचा। सुटू दे वसंत-वारा*
*फुलु देच जीवनाचा। जगदीश भाग सारा॥*

'पत्री' मधील 'येवो वसंत वारा', या तुमच्याच कवितेतल्या या काही पंक्ती.

तुमची प्रार्थना. पण आमच्याही मनाच्या ओसाडीवर चार थेंब शिंपून गेलेली आहे.

मधू देशपांडेचा नि तुमचा सहवास १९३७-३९ पासूनचा. त्याचे वडीलबंधू न. रा. देशपांडे हे अमळनेरच्या हायस्कूलमध्ये तुमच्या वेळेपासूनचे शिक्षक. त्यांच्यामुळे सगळ्या देशपांडे कुटुंबियांशीच तुमचे जिव्हाळ्याचे संबंध आलेले होते. कधी कधी तुम्ही नगरला त्यांच्याकडे जाऊन राहिला आहात. मधू सर्वात धाकटा. सगळ्याच धाकट्यांच्या वाट्याला तुमचे प्रेम अधिक यायचे. मधू तुमचा लाडका, आवडता बनला. बेचाळीस साली भूमिगत असताना तो तुमच्याच बरोबर होता. प्रतापगडावर, राजगडावर, मूषक महालात आणि

संतवाडीतदेखील. ही त्या वेळची तुम्हा भूमिगतांची मुंबईमधली निवासस्थाने. कार्यकर्त्यांप्रमाणे राहण्याच्या ठिकाणांची नावेही अशी बदललेली होती.

मधूने त्या वेळच्या अनेक आठवणी सांगितल्या. पंढरपूरच्या उपोषणाच्या वेळी तुमच्याजवळ तो होताच. जेलमधून त्याला लिहिलेल्या एका पत्रात तुम्ही म्हटले होते, '... आता कागद संपत आला. किती लिहिले तरी थोडेच. आपणास पक्षी होता आले असते तर पटकन एकमेकांस भेटून आलो असतो!'.... मधूने अज्ञातवासाच्या काळातील एक आठवण सांगितली.

एकदा प्रतापगडावर मुक्काम असताना रात्रीच दारावर खुणेची थाप पडली. दार उघडले तशी सुटाबुटातली एक व्यक्ती एका ओळखीच्या कार्यकर्त्याबरोबर आत आली. जवळ स्टेथास्कोपही होता. कुणी मोठा डॉक्टर असावा, असे पाहणाऱ्याला वाटले असते आणि होताही तो डॉक्टरच. पण माणसाची नाडी तपासणारा नव्हता. साऱ्या भारताची नाडी पाहणारा होता!

बरोबर आलेल्या कार्यकर्त्याने मधूला आणि मधूने आत येऊन तुम्हाला सांगितले, ''गुरुजी, जयप्रकाशजी आले आहेत!''

बाप रे! मग कोण तुमची धांदल आणि केवढा आनंद! त्यापेक्षा केवढी मोठी जबाबदारी! बाहेर सैतानी सरकारचे शिपाई शिकारी कुत्र्यासारखे या वीराच्या मागावर होते.

तुम्ही लगबगीने मध्यरात्रीही रांधून जयप्रकाशजींना जेवू घातलेत. होती ती गादी टाकून दिलीत आणि स्वयंपाकघरात चटईवर हाताची उशी करून झोपी गेलात.

जयप्रकाशजी दोन-तीन दिवस होते. त्यांनी पुढे तुमच्याविषयी म्हटले आहे,

'... गुरुजींच्या पहिल्याच दर्शनात मला त्यांच्याठायी वसत असलेलं मातृवात्सल्य दिसलं. वरून ते 'थंड' दिसत असले तरी त्यांच्या अंगी 'आग' पेटलेली असे. त्या आगीनं अनेक तरुणांच्या अंत:करणात त्यांनी देशसेवेची ज्योत पेटवली...'

जयप्रकाशजींसारख्या आदरणीय नेत्याला आपल्या हाताने रांधून खाऊ घालताना तुम्हाला केवढी तृप्ती आणि स्वर्गसुख लाभले असेल याची कल्पनाच केलेली बरी!

गुरुजी, पारतंत्र्याविरुद्ध परकीय सत्तेशी प्राणपणाने झुंज घेणाऱ्या बहाद्दर, क्रांतिकारक जयप्रकाशजींचे ते तेजस्वी दर्शन तुम्हाला आणि अवघ्या राष्ट्राला

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ३५९६ दिनांक २३।२।९९

त्या वेळी घडले. स्वातंत्र्योत्तर हा महापुरुष लोकशाही समाजवादाची ध्वजा घेऊन स्वराज्याचे सुराज्य करायला आणि अधुरी क्रांती पुरी करायला उभा राहिला.

जयप्रकाश म्हणजे नित्य विकास! त्यांना जेव्हा पक्षीय राजकारणाच्या मर्यादा आणि कुंपणे जाचू लागली तेव्हा विशाल व्यापकतेच्या प्रांतातल्या ह्या विकासशील नेत्याने -

*मळ्यास माझ्या कुंपण पडणे*
*मला न अगदी साहे॥*
*कोण मला वठणीवर आणू*
*शकतो ते मी पाहे॥*
*हिंदुही नाही, यवनही नाही*
*न मी एक पंथाचा।*
*तेच पतित की जे आखडिती*
*प्रदेश साकल्याचा॥*

या केशवसुतांच्या नव्या शिपायाच्या शौर्याने, धैर्याने आणि उत्कटतेने ते आखडून टाकणारे प्रांत, समोर सत्तेचे, मानाचे, वैभवाचे झगमगते सिंहासन दिसत असूनसुद्धा, सहज लिलया त्यागले आणि साकल्याच्या खुणा दिसल्या त्या सर्वोदयाच्या कामात रमले. एक नाही, दोन नाही, जवळ जवळ वीस-एक वर्षे त्यांनी तनामनाने ह्या कामात जीव ओतला. गांधी-विनोबांच्या ग्रामस्वराज्यासाठी झटले, रक्त आटवले.

पण मूळ स्वातंत्र्याच्या रोपट्याला भयंकर भ्रष्टाचाराने जिथे ग्रासले आहे, तिथे हे गावा-गावातून स्वराज्याचे फूल फुलावे कसे? गुरुजी, गावे आज सत्ताधारी लोकांच्या कळपातल्या गुंडांचे अड्डे बनली आहेत. भ्रष्टाचाराचा राक्षस सर्वच क्षेत्रांत बेगुमानपणे थैमान घालत आहे. तुमचे आवडते शिक्षणाचे पवित्र क्षेत्रदेखील या रोगजंतुंनी बुजबुजून गेलेले आहे. 'गरिबी हटाव' च्या घोषणा देऊन गरिबांना हटवले जात आहे. दलितांना दटवले जात आहे. विचारवंत सज्जनांचा तर सोडाच पण साध्या, सरळ सामान्य माणसाचाही जीव गुदमरून जावा अशी आजची भ्रष्ट परिस्थिती आहे. स्वातंत्र्याची रजतजयंती दोन वर्षांपूर्वी झाली पण कसले स्वातंत्र्य नि कुठले स्वातंत्र्य!

गुरुजी, भ्रष्टाचार अगदी-अगदी कळसाला पोचलेला आहे. किळस-किळस यावी अशी व्यवस्था आहे. आणि म्हणूनच स्वातंत्र्याकरता झुंजलेले जयप्रकाश, वयाची सत्तरी उलटून गेली, प्रकृती ठीक नाही तरी, नव्या तेजाने, धैर्याने पुनरपी स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी धावलेले आहेत.

गुरुजी, जयप्रकाशांचे एक वेगळेच ओजस्वी दर्शन देशाला होत आहे. सारा बिहार त्यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. नव्या युवाशक्तीचा आविष्कार जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली होत आहे. आपले अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, एस. एम. जोशी, मधू लिमये, ना. ग. गोरे जयप्रकाशजींच्या खांद्याला खांदा लावून उभे ठाकले आहेत. तुमचे विनोबा मात्र...

विकल, व्याकुल बनलेला अवघा भारतवर्ष जयप्रकाशजींच्याकडे मोठ्या आशेने पाहात आहे आणि तसेच हे जयप्रकाशजींचे आश्वासक नेतृत्व आहे. एकदा आचार्य दादा धर्माधिकारी गप्पाटप्पा चालू असताना म्हणाले होते, ''जयप्रकाशजींच्यासारखा शूर, साहसी, चारित्र्यशील आणि विचारवंत नेता वृद्धपणी लाभला हे मी माझे महान भाग्य मानतो!''

परवा वर्ध्याला सर्वोदय संमेलनात जयप्रकाशजींच्या भूमिकेचे समर्थन देताना ते आणखी पुढे जाऊन असेही म्हणाले की, ''जयप्रकाशजींच्याबरोबर चुका करण्यात किंवा चुकीच्या मार्गाने जाण्यातही मी गौरव मानतो!''

गुरुजी, परवा सहज मनात येऊन गेले की, आज तुम्ही असता तर.... भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढाईची तुतारी सर्वांआधी तुम्हीच फुंकली असती!

*निघालो आम्ही हो सुखाने मराया।*
*स्वतंत्र स्वदेशा प्रयत्ने कराया।।*
*नका आमुचे पाय कोणीही ओढू।*
*आम्ही आईची बंधने आज तोडू।।*
*उठा रे उठा जाहला काय षंढ।*
*उठा रे उठा थोपटून स्वदंड।।*
*उठा रे उठा क्षोभ ना काय येतो।*
*न का दास्य पाहून तो त्वेष येतो।।*
*करा गर्जना थोर ऊर्जस्वला ती।*
*जिला ऐकुनी कापती ते अराती।।*
*उठावे आता एकदाची समस्ती।*

*चला झाडुनी जीवनातील सुस्ती॥*
*आम्हा थोर वीरां जगी कोण वारी।*
*आम्हा दिव्य वीरां जनी कोण मारी॥*
*करू मुक्त आम्ही प्रिया भारताते।*
*प्रतिज्ञा अशी ऐकवितो जगाते॥*

स्वातंत्र्यलढ्याच्या काळी अशी धीरगंभीर 'प्रतिज्ञा' करणारे तुम्ही स्वातंत्र्य व लोकशाहीच्या संरक्षणासाठी व भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी सर्व तरुणांना निश्चित हाक दिली असतीत.

*उठू दे देश, उठू दे देश*
*येथून तेथून सारा पेटू दे देश, पेटू दे देश॥*

आणि शेकडो हजारो लक्षावधी तरुण तुमच्या पाठीशी निश्चित गोळा झाले असते.

गुरुजी, स्वातंत्र्याचे मोल आणि लोक-कळवळा या बाबतीत तुमचे नि जयप्रकाशजींचे प्रकृती रसायन पुष्कळसे मिळतेजुळते असावे, असे वाटते.

आज बराच गडगडाट होऊन मोठा पाऊस पडला. हवेत गारवा आला. हस्त चालू आहे.

तुमचा,

१६ नोव्हेंबर १९७४

***राजा***

■ □ ■

## ७.

### *प्रिय पूज्य साने गुरुजी,*

एवढ्यातच वाईला जाऊन आलो.

या वर्षी पाऊसपाणी या भागात तरी तसे बरे झाले आहे.

आश्विनाचा महिना.

घरोघरी जगदंबेचे नवरात्र.

घटस्थापना झालेली.

शेतेभाते हिरवीगार आहेत.

कृष्णामाईच्या पात्रात निर्मळ पाणी मुबलक आहे.

कृष्णामाईच्या काठचा परिसर मला फार आवडतो. म्हणूनच श्री. कोल्हापुऱ्यांच्या घरी पिशवी ठेवल्यावर सर्वांआधी, त्यांनाही न सांगता सवरताच मी नदीकाठी गेलो.

कोल्हापुऱ्यांचे घर गणपती आळीत, अगदी नदीकाठीच आहे. घर आणि दुकान जवळ जवळच. एकत्र.

त्यांच्या घरातूनच कृष्णामाईचा स्वच्छ, सुंदर प्रवाह दिसतो. आणि वाईच्या सुप्रसिद्ध गणपतीचे मंदिरदेखील. रास्त्यांच्या त्या दगडी, चिरेबंदी सुरेख मंदिरातली गणेशमूर्ती प्रचंड आहे!

मंदिर, मूर्ती, कृष्णामाईचा तो सहवास हे सगळे कसे छान आहे, पण खटकली ती मंदिरातली अस्वच्छता, घाण!

एवढी चांगली मंदिरे असताना ती स्वच्छ का नाही राखली जात? देवाच्याजवळही घाण करणारी, ठेवणारी ही माणसं कसली? अशा मंदिरांतून देव राहात तरी असेल का? मी गेलो त्या वेळी सर्वत्र धूळ, माती तर होतीच, पण दोन-चार ठिकाणी काही खेडूत मंडळी भाकऱ्या सोडून जेवतही बसली होती. त्यांच्या वासावर आलेली चार-पाच मरतुकडी कुत्री तिथंच घुटमळत होती. इकडं तिकडं टाकलेला, पडलेला तुकडा मटकावीत होती. माशा घोंघावत होत्या, खरकटं, मरकटं सांडलेलं होतंच आणि मंडपातच चक्क दोन गाढवंदेखील

तोंड हालवत उभी होती!

गणेश मंदिरापुढच्या काशीविश्वेश्वराच्या मंदिरातला तुळतुळीत पाषाणाचा प्रचंड नंदी मात्र देखणा आहे. त्याची बसण्याची ऐट काय झकास आहे. पण पुढच्या गाभाऱ्यात आहे केवळ काळोखाचे साम्राज्य! कोंदट, कुबट काळोख!

नंदीवरून आठवले. दक्षिणेत असे, याच्याहूनही मोठे प्रचंड कितीतरी नंदी आहेत. म्हैसूरच्या नंदी हिलवरील तो नंदी तर भारतप्रसिद्ध आहेच पण रामेश्वर, तंजावर इत्यादी ठिकाणच्या शिवालयांतील नंदीही केवढे अवाढव्य आहेत! तंजावरचा नंदी १२ फूट उंच, तर तिथली शिवपिंडी १३ फूट उंच नि १८ फूट रुंद! दक्षिणेतली मंदिरेच एकूण ऐसपैस, प्रशस्त. एखादे लहानसे गाव सहज आत मावून जाईल एवढी. केवढा आकार आणि प्राकार! एवढे असूनसुद्धा दक्षिणेतल्या मंदिरांतून तशी स्वच्छता दिसते. उत्तरेतल्यापेक्षा दक्षिणेतली मंदिरे मोठी आहेत आणि स्वच्छही आहेत. गोव्यातली मंदिरेदेखील निर्मळ, प्रसन्न वाटतात. प्रार्थनास्थळांचे पावित्र्य स्वच्छतेने राखण्याची दृष्टी ख्रिश्चन, मुस्लिमांत आढळते. एकदा प्रतापगडावर गेलो होतो. गडावरच्या देवीचे देऊळ पाहिले, तर तिथेही बरीच अस्वच्छता, मेणचटपणा आढळला. पण खाली आल्यावर अफजलखानाच्या कबरीजवळ गेलो तर किती स्वच्छता दिसली. उदबत्त्यांचा सुवासही दरवळत होता. प्रकाशही होता. बाजूला नेटका बगीचाही आहे. हेतू कसल्याही टीकाटिपण्णीचा नाही. तर ही दृष्टीचीच बाब आहे असे दिसते. स्वच्छतेचा, सौंदर्याचा शुभ डोळाच हवा हे खरे!

देवळांतून घाटावर आलो आणि पाण्यात पाय सोडून बसलो. किती बरे वाटले म्हणून सांगू. पैलतीर आता हरितगार आहे. आकाश निरभ्र आहे. लख्ख केशरी ऊन पुष्कळ पुष्कळ आहे. कृष्णामाईच्या उदंड पाण्यात साताठ मुलं मस्त डुंबताहेत.... खिदळताहेत...

मी वाईला आलो ते तुमच्या गुरुजींना भेटण्यासाठीच. गुरुजींचे गुरुजी! तुमच्याप्रमाणेच त्यांच्याविषयी अतीव आदर वाटतो. हल्ली महामहोपाध्याय डॉ. दत्तो वामन पोतदार हे वाईला असतात. चार-दोन वर्षे झाली. गंगा आळीत त्यांचे छोटेसे, टुमदार 'आनंदीधाम' आहे. अंगणात छोटीशी बाग आहे.

गेलो त्या वेळी दादा पलंगावर बसून वाचीत होते. आजूबाजूला अनेक ग्रंथ होते. दादांना मी त्यांच्या निवासस्थानी पुण्यास जेव्हा जेव्हा पाहिले, तेव्हा तेव्हा ते असेच— याहूनही घनदाट ग्रंथारण्यात बसलेले होते! पुण्याच्या

त्यांच्या, पानशेतपूर्वीच्या 'लोककल्याण' या निवासस्थानी गेल्यावर दादाच काय, त्यांची ती सारी बैठकच वाचनात, अध्ययनात निमग्न असल्यासारखी वाटत असे.

एकदा मी लोककल्याणमध्ये दादांकडे गेलो होतो. त्यांना भाषणाचे निमंत्रण द्यायला. आमच्या पंढरपूरच्या नवभारत व्याख्यानमालेबद्दल एकदा मी तुम्हाला लिहिलेच आहे. तर त्याच व्याख्यानमालेसाठी. त्या वेळी मी पंढरपुराहून पुण्याला आलो होतो. आपल्या नानासाहेब गोऱ्यांना भेटलो होतो. 'महाराष्ट्र धर्माची व्याख्या करण्याची आज वेळ आलेली आहे' असा विषय घेऊन नानासाहेब त्या वेळी किती सुंदर बोलले होते! नानासाहेबांचे वक्तृत्व त्यांच्या लेखनाप्रमाणेच असते. त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच मोठे नीटस, रेखीव, लोभस.

नानासाहेब 'हो' म्हणाले नि आले. दुसऱ्या एका पक्षाच्या मोठ्या पुढाऱ्याकडे गेलो. त्या वेळी दहा-पंधरा अनुयायी कार्यकर्त्यांच्या गराड्यात ते बसले होते. मी तिथेच जाऊन निमंत्रण दिले. म्हणाले, 'वेळ नाही!'

मी पुन्हा चिवटपणाने आग्रह केला. त्या वेळी उफाळून आले नि म्हणाले, ''माझे हे कार्यकर्ते पोट बांधून कार्य करीत असताना मी काय नुसती व्याख्याने देऊ?''

मी म्हणालो, ''आपल्या पक्षाच्या पंढरपूरच्या कार्यकर्त्यांचीही आपण तिथं यावं अशी इच्छा आहे.''

''बरं मग किती पैसे देणार?''

''व्याख्यानाचे?''

''हो, मोफत यायला वेळ आहे कुणाला?''

''पण आमची माला तर गरीब आहे''.....वगैरे मी बोललो.

तशी म्हणाले, ''तिकीट लावा. माझ्या व्याख्यानाला पैसे देऊन लोक येतील.''

मला त्यांच्या विद्वत्तेबद्दल किंवा व्याख्यानाबद्दलही काही म्हणायचं नव्हतं, आजही काही म्हणायचं नाही, पण पंढरपूर हे तीर्थक्षेत्राचं गाव. तिथं देण्यापेक्षा घेण्याचीच प्रथा किंवा परंपरा आहे हे मी त्यांना कसं सांगू?

उठलो नि दादांच्याकडे गेलो. निमंत्रण दिलं. ऐकलं आणि दादा म्हणाले, ''येईन. व्याख्यान देईन, पण एक अट आहे.''

''कसली?'' मी विचारल्यावर दादांनी सांगितलं की, ''तिथं अमुकअमुक

एका बडव्यांकडे अमुक अमुक जुनी कागदपत्रं आहेत, ती मला मिळाली पाहिजेत.''

आता ही अट पुरी करणं त्या वेळी बसल्या बैठकीला तरी मला शक्य नव्हतं. म्हणालो, ''त्या बडव्यांना भेटतो. प्रयत्न करतो. त्यांची-माझी ओळख आहे.''

दादा म्हणाले, ''बघा. भेटा. ते हो म्हणाले तर मला कळवा, व्याख्यानाच्या तारखेसह. त्या दिवशी मी पंढरपुरात येतो.''

दादांचा सशर्त का होईना, होकार लाभला होता.

उठता उठताच मी विचारले, ''बरं, मग तुमच्या व्याख्यानाचा विषय कोणता जाहीर करू?''

''ते मी काय सांगू? पंढरपूरच्या लोकांना कोणत्या विषयावर माझं व्याख्यान ऐकायचं आहे ते त्या ऐकणाऱ्या लोकांना विचारून कळवा. त्यावर मी बोलेन. मला जेव्हा काही सांगायचं असेल तेव्हा मी अमुक विषयावर बोलणार आहे असं सांगेन. इथं तसं नाही. तुम्ही मला तिथं बोलवत आहात; तेव्हा तुम्हीच विषय सांगा म्हणावं.''

''आम्ही आमच्या कार्यकारी मंडळात आपल्यासाठी असा विषय...''

''तुमच्या कार्यकारी मंडळापुरतंच माझं भाषण व्हायचं आहे काय?''

''नाही.''

''मग तुमच्या कार्यकारी मंडळाचंही मत मला नको. ऐकणाऱ्या लोकांना काय पाहिजे ते विचारून कळवा.'' दादांनी चमकावले.

पुढं पंढरपुरी आल्यावर त्या बडव्यांना भेटलो. त्यांची संमती मिळवली आणि दादांना ती तारखेसह कळवली. त्यानुसार दादा, त्या वेळेस असलेल्या जी. आय. पी. रेल्वेच्या बसने सायंकाळी पाच-साडेपाच वाजता आले आणि साडेसहा वाजता श्रोत्यांनी तुडुंब भरलेल्या खाजगीवाल्यांच्या वाड्यात भाषणासाठी उभे राहिले. 'मध्यमवर्गियांच्या समस्या' या विषयावर दोन-एक तास दादा असं काही उत्कृष्ट बोलले की पंढरीतली जनता बेहद्द खूष झाली!

दादांचे बोलणे थेट मराठी. खुसखुशीत, मार्मिक आणि कितीतरी माहितीपूर्ण. खरंच, दादा म्हणजे चालता बोलता ज्ञानकोशच!

गुरुजी, सर परशुरामभाऊ कॉलेजच्या रौप्य महोत्सवी अंकात तुम्ही एक लेख लिहिला आहे आणि आपल्या कॉलेजविषयीचे प्रेम, कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्याच लेखात दादांच्याविषयी तुम्ही लिहिले आहे. 'कॉलेजमध्ये असताना

तसे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध माझे फारसे कोणाशी आले नाहीत. मी दूर राहणारा प्राणी परंतु प्रो. पोतदार व प्रो. लागू यांच्याबद्दल मला आदर वाटतो.'

बी. ए. च्या वेळी मराठी विषय तुम्ही घेतला, त्या वेळची हकीगत दादांनीही सांगितली. 'त्या वेळी बी. ए.ला मराठी विषय नव्हता. परंतु तो असावा अशी खटपट चाललेली होती. तिला यश येऊन बी. ए.ला मराठी हा विषय घेण्याची परवानगी आली. प्रिंसिपॉल आपटे यांच्या सांगण्यावरून मी नोटीस काढली. ती वाचून २०-२५ विद्यार्थी आले. सानेही त्यात होता. साने हा अभ्यासात हुशार विद्यार्थी होता. त्याचा संस्कृत विषय चांगला होता. पण मराठीच्या प्रेमाने त्याने मराठी विषय घेतला! इतके विद्यार्थी येतील अशी कल्पना नव्हती. त्या वेळी १८०० ते १८७४ हा कालखंड मराठी विषयात अभ्यासाला होता. पण या विद्यार्थ्यांना या काळातल्या मराठी साहित्याची माहिती देणार कोण? मिळणार कुठं? मी त्यातला नादी होतो. त्यामुळे माझ्याकडं जुन्या जुन्या पुस्तकांचा संग्रहदेखील उत्तम होता. त्यातून मी टिपणं काढली, उतारे काढले आणि शिकवू लागलो. फळ्यावर उतरून देत असे. त्या वेळी मराठीही इंग्रजीतून शिकवावे लागे! मग मोरोपंताचे 'मोरोपॅन्ट' असाही काहीजण उच्चार करीत! त्या कालखंडातली माहिती जमा करण्यासाठी म्हणून ठाण्याच्या आणि मुंबईच्या ग्रंथसंग्रहालयात जवळ जवळ महिनाभर बसलो. पांगारकरांचा-माझा स्नेह होता. त्यांच्याकडं जाणं-येणं फार होतं. त्यांच्या संग्रही दादोबाचं एक हस्तलिखित होतं, ते मी एकदा आणलं आणि दोन-चार विद्यार्थ्यांकडून लिहून घेतलं; मग परत केलं. अशी मी तयारी करत होतो. हे त्या ए. व्ही. बापटाला समजलं. म्हणाला, ''मी ते छापून काढतो.'' मी सांगितलं, ''काढ, पण परीक्षेच्या आत. ते माझ्या विद्यार्थ्यांना मिळालं पाहिजे.'' 'हो' म्हणाला आणि ते हस्तलिखित प्रेसकडे गेले. दत्तोपंत खांडेकरांचा लॉ प्रेस. तिथं छपाई सुरू झाली. एका मागून एक फॉर्म माझ्याकडे आले. पण पुस्तक काही प्रसिद्ध होईना! बाजारात येईना. म्हणून गेलो खांडेकरांच्याकडे. म्हटलं, ''अहो! ते पुस्तक छापून झालंय, मग बाहेर का नाही येत?'' तेव्हा कळलं की व्यवहाराच्या अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. मग त्यांना म्हणालो, ''मी ते पुस्तक मुद्दाम माझ्या मुलांच्यासाठी लिहिलं आहे. त्यांच्या अभ्यासासाठी.'' परीक्षा जवळ आली, तेव्हा मग काही तरी करून अभ्यासापुरते तरी फॉर्म्स एकत्र करून ते मुलांना उपलब्ध करून दिले. पुढं त्याला पुरवणी, पुरवणीला पुरवणी असं

पुष्कळ झालं. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हे नाव त्या पुस्तकाचं ठेवलं, त्याचीही हकिगतच आहे.'

आणि दादांनी तीही हकिगत सांगितली. एकातून दुसरी, दुसरीतून तिसरी अशा किती तरी हकिगती, आठवणी एकामागून एक त्यांच्या तोंडून ऐकल्या. दादांचे वय आता ८५ आहे. पण स्मरण किती टवटवीत आहे! पाठीत आताआताशाच थोडे वाकले आहेत. पण वाचन, टिपण, स्मरण जसेच्या तसे अखंड आहे. वर उल्लेखिलेल्या लेखात तुम्हीच पुढे म्हटले आहे, '...शेवटी मी मराठी विषय घेतला. आणखीही मग आले. प्रो. पोतदार शिकवायला लागले. आमचा तास रंगू लागला. प्रो. पोतदार म्हणजे ज्ञानकोश! महाराष्ट्रातील जुन्या-नव्या घडामोडींची, स्थानांची व व्यक्तींची त्यांना अपरंपार माहिती... मी तर त्या तासात तन्मय होत असे. प्रो. पोतदार शिकवताना अनेक प्रसंग सांगत. फर्ग्युसनमध्ये ते शिकत असता त्यांनी विटीदांडू क्लब काढला होता व जिमखान्याकडून विटी व दांडू हक्काने भांडून मिळविला. ते म्हणाले, ''एकदा मी चर्चमध्ये गेलो होतो. ख्रिश्चन लोक कशी प्रार्थना करतात ते पाहायचे होते. त्या चर्चमधील सर्वांनी प्रार्थनेसाठी डोळे मिटले की मी माझे डोळे उघडीत असे व सर्वांकडे बघून घेत असे.'' अशा गमती निघायच्या. काव्यशास्त्रविनोद चालावयाचा. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हे पुस्तक आम्ही त्यांच्या पाठीस लागून लागून करून घेतले. त्या पुस्तकातील उतारे त्यांनी दिलेल्या निरनिराळ्या पुस्तकांतून आम्ही लिहून आणून देत असू. परीक्षेच्या वेळेपर्यंत आम्हाला मुद्रितांच्याच प्रती कशातरी करून मिळतात. मी एकदा प्रो. पोतदारांना विचारले, ''तुम्ही इतके वाचले आहे, तुम्ही लिहीत का नाही?'' ते म्हणाले, ''सध्या टाचणे-टिपणे करीत आहे. वेळ येईल तेव्हा लिहीन.'' परंतु त्यांना अनंत उद्योग! ते लोकांना लिहायला स्फूर्ती देतील, स्वतः त्यांना केव्हा फुरसत होईल प्रभू जाणे! कोलरिज या प्रतिभावान् इंग्रज साहित्यिकाने अनेकांना स्फूर्ती दिली, परंतु त्याने फार थोडे लिहिले.'

या भेटीतही खूपखूप काव्यशास्त्रविनोद झाला. अनेक विषय आले, जुन्या साखळीकथेप्रमाणे किंवा पंचतंत्रातल्या गोष्टींप्रमाणे. एकातून एक... असे अनेक. त्यांची मते, विचार अगदी सुस्पष्ट. पण आपल्या मताचे कुणावर दडपण आणण्याची वृत्ती नाही. परक्याच्या मताबद्दल मोठी सहिष्णू वृत्ती त्यांच्या ठायी आहे. बोलता बोलता म्हणालेच, ''मी कर्तृत्वाचा अभिमानी आहे. मत काही का

असेना! ते ज्याचं त्याचं वेगवेगळं असणारच. तसं नसेल तर 'मत' म्हणजे काय मग?''

यामुळंच दादांची मैत्री सगळ्यांशी. त्यांची बैठक सगळीकडं. राजकारणातले रागरंग त्यांना बाधले नाहीत. समाजकारणातले हेवेदावे त्यांना भोवले नाहीत. आता टीकाप्रतिटीका, खंडनमंडन हेही केल्याशिवाय ते राहिले नाहीत. पण त्यांतील औचित्य, उच्च दर्जा हा त्यांनी कधी सोडला नाही. गुणग्राहकता दादांच्याजवळ उदंड आहे.

तुमच्याविषयी त्यांना केवढा अभिमान! केवढे प्रेम! तुमचा हायस्कूलमधला मराठीचा एक पेपर त्यांना इतका आवडला, की तो अजूनही त्यांच्या संग्रही आहे! 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हे पुस्तक लिहायला तुम्ही एक निमित्त झाला होता. 'नामदार गोखले' या तुमच्या पहिल्यावहिल्या प्रसिद्ध पुस्तकाला दादांनीच प्रस्तावना लिहिलेली आहे. आणि परवा बोलता बोलता त्यांनी असेही सांगितले की, तुमच्या 'पत्री' काव्यसंग्रहाला दादांची प्रस्तावना लाभावी अशीही तुमची इच्छा होती. ती त्यांनी मान्य केली होती पण चळवळीच्या त्या दिवसात तुरुंगवास, जप्ती वगैरे कटकटींमुळे ते घडले नाही.

गुरुजी, तुमच्याप्रमाणेच हे गुरुजीदेखील खरेखुरे हाडाचे शिक्षक, आणि केवढ्या व्यापक अर्थाने शिक्षक-आचार्य! आपल्या विद्यार्थ्यांविषयी केवढी ममता, केवढी प्रीती! त्यांच्या भलाईसाठी, ज्ञानवर्धनासाठी केवढी काळजी!

असहकाराच्या काळातली हकिकत सांगताना म्हणाले, ''त्या वेळी शाळा-कॉलेजवर बहिष्कार टाकण्याची चळवळ सुरू झाली होती. परक्यांचे राज्य नको, स्वातंत्र्य हवे हे सगळे खरे, पण शिक्षण सोडल्यावर पुढे काय? हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या बाबतीत माझ्यापुढे होता. म्हणून मी त्या गोष्टीस कधी उत्तेजन दिले नाही. त्या वेळी राजनिष्ठेची लेखी शपथ घ्यावी लागायची. तो फॉर्म असे. आहे त्याची एक प्रत माझ्याजवळ. त्यावर सही करताना मला का कमी खेद होत असे? पण या मुलांना चांगलं शिक्षण दिलं पाहिजे, या तळमळीतून मी ते केलं. एकदा तर भाऊसाहेब लवाटयांना मी म्हणालो होतो, की उद्या जर सरकारने लुगडी नेसून शाळेत जा नि शिकवा असं फर्मान काढलं, तर मी त्याप्रमाणं वागायला कमी करणार नाही.''....

दादांची श्रेष्ठ ज्ञानभक्ती आणि आपल्या विद्यार्थ्यांविषयी आत्यंतिक जिव्हाळा असा होता.

एकदा १९६८ साली, त्यांचे एक पत्र आपल्या साधनेकडे आले होते. त्या वर्षीचा कुमार अंक प्रसिद्ध झाला होता आणि तो वाचून त्यांनी लिहिले होते, 'बारावा कुमार अंक आमुलाग्र वाचला. साहित्य आणि सजावट दोन्ही उत्कृष्ट साधली आहेत. यामुळे अंक भरदार झाला आहे. उपक्रम पुढे कसा चालेल याबद्दल काही चिंता व्यक्त झाली आहे. हा भावी पिढीच्या मन:पिंड पोषणाचा प्रश्न आहे. म्हणून याला जगवण्याकडे अणि पोषणाकडे शासनानेही लक्ष दिले पाहिजे. भाषा-संस्कृती मंडळाकडे खडा टाकून पाहावा.' असे दादांचे बारीक लक्ष आणि अशी त्यांची कळकळ.

परवाच्या तीन-साडेतीन तासांच्या गप्पागोष्टींतही ती व्यक्त होत होती आणि या वयातही, 'ते मी लिहिणार आहे', 'हे मी करणार आहे' अशी भाषा होतीच. इतकी निवड, इतकी तीव्रता अजूनही त्यांना वाटते आणि त्यापुढे ते आपले वयही विसरतात, हे नवलच नव्हे काय? दादांसारखी माणसं वयानं आणि शरीरानंच वृद्ध होत असावीत, त्यांच्या मनाला ते वृद्धत्व कधी शिवतच नसावे. असो.

वाईला आल्यावर ब्रह्मीभूत नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंदसरस्वती यांची आठवण झाल्याशिवाय कशी राहील! तुमच्या पंढरपूर मंदिर प्रवेशाच्या प्रचाराच्या वेळी स्वामींनी तुम्हाला पाठिंबा दिला होता, इतकेच नव्हे तर तुमच्या उपोषण काळात स्वामीजी पंढरपूरलाही आले होते! दापोलीचे आपले बाबा फाटक त्या वेळी त्यांच्याबरोबर होते.

स्वामीजींचा अधिकार मोठा. त्यामुळे तुम्हालाही त्यांच्या पाठिंब्याने केवढा आधार वाटला होता. स्वामींच्याविषयी पू. विनोबांनी म्हटले आहे.

'स्वामींनी सारे जीवन जनसेवेला वाहिले, धर्मकोशाचे कार्य आरंभिले, सुधारणेला चालना दिली. हे सगळे त्यांचे कार्य मोठे आहे पण त्याहीपेक्षा मोठे आहे त्यांचे अंतरंग! शत्रू आणि मित्र, उदासीन आणि मध्यस्त, परके आणि सख्खे, सर्वांना समान लेखणारे हृदय, ही जीवनातली मोठ्यात मोठी कमाई. ती त्यांनी सिद्ध केली. अशांच्या शुभ संकल्पाने जागत विविध कार्ये होत असतात. त्यांच्या स्थूल देहाकडून घडलेली कार्ये मोजत बसणे आंधळेपणाचे लक्षण होईल.'

वाईतून येताना शिरवळला, का कुणास ठाऊक, आमची एस्टी बराच वेळ थांबली होती. शिरवळ म्हटल्याबरोबर मला आपल्या राघूअण्णा लिमयांची

आठवण येते. आपल्या बरोबर दौऱ्यात ते होतेच. गाणी वगैरे म्हणायचे. अत्यंत आनंदी आणि उत्साही. तुम्हीसुद्धा कुणाला तरी लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे, 'राघुअण्णा म्हणजे आनंद, उत्साह. त्यांच्या उत्साहातला एक अंश मला मिळाला तर..'

राघूअण्णांना आपल्या सातारा जिल्ह्याचा भारीच अभिमान. दौऱ्यात, आपल्या भागातली कुणी एखादी गोष्ट सांगायचाच अवकाश की, लागलीच राघूअण्णा म्हणायचेच, ''ह्ये, आमच्या सातारा जिल्ह्यात...'' एकदा कुणीतरी म्हणाले, ''आमच्याकडं ज्वारी कशी पांढरी शुभ्र छान होते.'' यावर राघूअण्णा लगेच म्हणालेच, ''ह्ये, आमच्या सातारा जिल्ह्यातल्यासारखी ज्वारी कुठंच नाही. हा एकेक दाणा एवढाला, बोरासारखा!'' एकदा कुणी तरी म्हणालं, ''आमच्याकडं मिरचीचं पीक चांगलं होतं.'' मग राघूअण्णा काय ऐकून घेणार? चटकन म्हणाले, ''ह्ये, आमच्या साताऱ्या जिल्ह्यात ही एकेक मिरची एवढी. लालभडक. झणझणीत''....

तुम्ही काही म्हणा, त्यावर चढ राघूअण्णांचा सातारा जिल्हा असायचाच! हे ऐकून ऐकून मग आम्ही गंमत करायची ठरवली आणि तशी गंमत सुरू केली. म्हणजे बळेच कुणीतरी काही सांगायचं आणि लगेच आम्हीच ''ह्ये, आमच्या सातारा जिल्ह्यात.....'' असं म्हणून सुरुवात करायची. मज्जा!

पण राघूअण्णा म्हणजे खरंच उत्साही माणूस! त्या वेळी ते म्हणायचे, ''आमचा यशवंता एक दिवस दिल्लीला जाईल!'' आणि खरंच, तसंच घडलं. गुरुजी, आज यशवंतराव चव्हाण दिल्लीत आहेत. केंद्रमंत्री म्हणून.

सात-आठ वर्षांपूर्वी निवडणुकीच्या प्रचारासाठी हिंडत असताना राघूअण्णांच्या मोटारगाडीला याच शिरवळ गावी भीषण अपघात झाला आणि राघूअण्णा त्यात गेले. वाईट झाले!

तुमचा,
*राजा*

३० नोव्हेंबर १९७४

■ □ ■

# ८.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

तुमच्या प्रिय खानदेशात जाऊन आलो. जळगाव, भुसावळ, फैजपूर, खिरोदा, रोझोदा, आमोदे, सावदे, अमळनेर, धरणगाव, एरंडोल, चोपडा, शिरपूर, धुळे, चाळीसगाव..... इत्यादी ठिकाणी गेलो होतो. प्रत्येक ठिकाणी तुमचे आप्तजन भेटले. तुमच्या आठवणीने गहिवरले. गुरुजी, डॉ. राम मनोहर लोहिया एकदा म्हणाले होते की, ''एखाद्याचा पुतळा उभा करायचा असेल तर त्याच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांनी त्याबद्दल विचार करावा. आणि एखाद्या ग्रंथाचे परीक्षण करायचे असेल तर त्याच्या प्रसिद्धीनंतर पाच वर्षांनी करावे.'' डॉक्टरसाहेबांच्या तरल, तैलबुद्धिमत्तेबद्दल बोलायलाच नको. त्यांच्या उद्गारांतली भेदक मार्मिकता बरेच काही सांगून, शिकवून जाते.

तर तुमच्या इथल्या प्रयाणानंतर मी परवा तुमच्याच आप्तजनांना भेटण्यासाठी म्हणून तब्बल २४ वर्षांनी गेलो होतो. आणि गुरुजी, तुम्हाला हे कळवतानाही ऊर भरून येतो आहे, डोळे पाणावताहेत.... तुमच्या खानदेशचे तुमच्यावर अलोट अलोट प्रेम आहे. तुम्ही ज्या वेळी तिथे त्या मातीवर आणि त्या माणसांत वावरत होतात, मिसळत होतात ना, त्या वेळी जसे त्यांचे तुमच्यावर प्रेम होते, तस्सेच आजही कायम आहे. रतीभर वाढलेच असेल पण कमी झालेले नाही. त्यात तुमच्या गाठीभेटीला नि चार प्रेमळ शब्दांना आंचवल्याची एक दर्दभरी गर्द छटा मात्र मिसळलेली आहे.

खरंच गुरुजी, तुमचा नि या खानदेशच्या मातीचा काय ऋणानुबंध असेल तो असो पण या मातीने आणि या मातीतील माणसांनी तुमच्यावर प्रेम केले तसेच तुम्हीही या मातीवर आणि इथल्या माणसांवर प्रेम केले. प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे असा परस्पर प्रेमव्यवहार इथे घडून आला खरा!

एकदा रत्नागिरी जिल्ह्यात कणकवलीजवळ अप्पांच्या गोपुरीत गेलो होतो. त्या वेळी एका मित्राने तुमचा उल्लेख 'खानदेशचे साने गुरुजी' असा केला. ऐकून मला गंमत वाटली!

खरे तर तुम्ही रत्नागिरी जिल्ह्यातले, कोकणातले. पण कोकणातली माणसेही तुम्हाला खानदेशी म्हणून ओळखू लागली! आणि खानदेशाला तर तुम्ही आपलेच वाटलात, तुमचे परकेपण त्यांना कधी जाणवलेच नाही, इतके तुम्ही खानदेशी बनून गेलात!... पुढे खानदेश सोडलात, मुंबईत राहू लागलात, तरी मनाने तिथेच रेंगाळत होतात. खानदेशला तुम्ही कधी विसरलाच नाहीत.

आणि विसरतो म्हटले असते तरी ते शक्य नव्हते, असेच ते नातेगोते जुळलेले होते, सूतगूत गुंतलेले होते.

सखेसोबती, विद्यार्थी, सहाध्यायी, भाऊ-बहिणी पुष्कळजण येथे तुम्हाला मिळाले. पूज्य विनोबांची नि तुमची गाठभेटही या खानदेशातच झाली. तुम्ही दोघेही कोकणातले पण भेटलात खानदेशात!

१९३२ साली धुळ्याच्या कारागृहात तुम्ही होता नि विनोबाही होते. तिथेच त्यांनी गीता-प्रवचने दिली आणि तुम्ही ती अक्षरबद्ध केली!

सहज आठवले म्हणून सांगतो. आठ-दहा वर्षे झाली असतील. नागपूरहून एकदा वामनराव चोरघडे आणि ग. दि. माडगूळकर यांच्याबरोबर पवनारला विनोबांकडे गेलो होतो. त्या वेळी विनोबांचे मौन होते.

वामनरावांना पाहून त्यांनी चिठ्ठीवर लिहिले, 'चोरघडे जुने स्नेही, पण अधुनमधून चोरासारखे येतात!' आणि हसले.

त्यांचे हसणेही किती निर्मळ!

त्याचवेळी भारावून गेलेल्या माडगूळकरांनी तिथल्या तिथेच एक ओवी रचली आणि ती एका कागदाच्या कपट्यावर लिहून विनोबांच्या पुढे सरकवली. मला ती ओवी आता पूर्ण लक्षात नाही, पण तिचा पहिला चरण आठवतो; तो असा होता -

वृद्धत्व ल्यालेल्या ज्ञानेश्वरा...

जो ज्ञानेश्वर विशी एकविशीतच समाधिस्थ झाला तोच आज वृद्ध बनून अवतरला आहे....

विनोबांनी ती ओवी वाचली. निर्लेप मनाने बाजूला ठेवून दिली. विनोबाच ते!

परवा खानदेशात हे आठवले आणि मलाही असेच वाटले की, त्या ज्ञानदेवांचा जसा तो 'सच्चिदानंद बाबा लेखकु जाहला', तसेच धुळ्याच्या कारागृहात तुम्ही विनोबांना भेटलात आणि.... आणि इथंही अशा प्रकारे इतिहासाची

पुनरावृत्ती झाली.

आणखी एक गंमत म्हणजे विषय तोच, भगवद्गीतेचे निरुपण.

या गीतेचीही पुन्हा गंमतच! तिचा आणि कारागृहाचा काय घनिष्ठ संबंध आहे कुणाला ठाऊक! गीता सांगणारा भगवान श्रीकृष्ण जन्मलाच मुळी कंसाच्या कारागृहात. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले कारागृहात. गांधीजींनी गीतेवर 'अनासक्ती योग' लिहिला कारागृहात. पुढे महादेवभाई देसाई यांनी त्याचा गुजराती अनुवाद केला तोही कारागृहात. विनोबांची गीतेवर प्रवचने झाली ती देखील कारागृहातच. आणि तुम्ही 'गीताहृदय' लिहिलेत तेही कारागृहातच. आहे की नाही गंमत!

सुटल्यानंतर विनोबांनी तुम्हाला खानदेशातच नावरानावरीच्या आश्रमात राहायला सांगितले होते. तुमचे खानदेशी प्रेम त्यांनीही हेरले होते. पुढे फैजपूर काँग्रेसच्या वेळी त्यांचा तुमचा निकटचा संबंध. आणि तुमचा ४६ वा वाढदिवस खानदेशातील तुमच्या मित्रांनी जळगावी साजरा केला. त्याचे अध्यक्ष विनोबाच! विनोबांचा आणि खानदेशचा लोमही तसाच.

चाळीसगावला हरिभाऊ चव्हाण भेटले. नव्वद वर्षांचे झाले आहेत पण सभेला आले होते. त्यांच्यावर विनोबांचा किती लोभ होता हे तुम्हाला ठाऊकच आहे. तसेच ममुराबादचे सीतारामभाऊ चौधरी. मला परवा ते भेटले नाहीत. मी चौकशी केली तेव्हा कळले की ते पैठणला गेले आहेत. त्यांच्या पंढरपूर-पैठण तीर्थयात्रा चालूच आहेत. सीतारामभाऊ आपल्याबरोबर दौऱ्यात होते. तुमच्या पंढरपूर उपवासाला तेही एक कारण होते. सीतारामभाऊ म्हणजे सगळेच मोठे. मनही आणि शरीरही. आपले अप्पा सांगत होते की, सीतारामभाऊ एकदा बोर्डीला तुम्हाला भेटायला म्हणून आले होते. पण तुम्ही कुठे बाहेर गेला होतात. त्यांनी प्यायला पाणी मागितले तर लोटीभर दिले. पण एक-दोन लोट्यांनी सीतारामभाऊंची तहान थोडीच भागणार! ते म्हणे पस्तीस लोट्या पाणी प्याले. प-स्ती-स! आणि मग रात्री जेवायला बसायचे तेव्हा म्हणे चार पाट जुळवून त्यांच्यासाठी मांडले! सीतारामभाऊ आले म्हणजे तुम्ही तुमच्या वहिनींना सांगायचे म्हणे की, 'आज चार माणसे जेवायला आहेत असे समजूनच स्वयंपाक करा!'.... अप्पाच सांगतात हो!

बाळूभाई मेहतांना तर विनोबांनी अलीकडे दहा-पंधरा वर्षे तरी झाली असतील आपल्या परंधाम आश्रमातच ठेवून घेतले आहे. बाळूभाईदेखील आता

नव्वदीच्या आसपास असतील, पण अजून खुटखुटीत. काया सुरकुतलेली आहे, पण तांब्यासारखी लख्ख लाल दिसते. स्वावलंबन चालूच. लेखन-अध्ययनातही खंड नाही. मध्यंतरी, लहर लागली म्हणजे विनोबाजी त्यांच्याकडे जाऊन बुद्धिबळाचे चार डाव टाकायचे! आणखी तुमचे सुभान पाटील, नामदेव राणे, लोढूभाऊ फेगडे... किती तरी लोकांशी संबंध.

लोढूभाऊंनी तर विनोबांशी तुरुंगात असताना भांडणच केले होते म्हणे! परवा लोढूभाऊंनीच मला सांगितले. दर रविवारी तुम्ही सारे राजबंदी विनोबांकडे जमायचे. गीता प्रवचनासाठीच की काय? तर त्या वेळी विनोबा सगळ्यांची विचारपूस करायचे. कोणाला काही कसला त्रास होतो का वगैरे. एका रविवारी जामनेरच्या राजमल शेटनी काही सांगितले वाटते. त्यावर तरुण लोढूभाऊंचे रक्त गरम झाले. ते म्हणाले, ''हा लबाड आहे, नालायक आहे!'' विनोबांना ही भाषा कशी रुचणार? त्यांनी लोढूभाऊंना, 'शब्द मागे घ्या' असे सांगितले. लोढूभाऊंनी ऐकले नाही. म्हणाले, ''नाही घेणार.'' विनोबांनी स्वतःच्याच तोंडात मारून घेतली. स्वतःलाच शिक्षा करून घेतली. झाले! सगळे वातावरण गंभीर. मामला कडक. सगळ्या राजबंद्यांनी लोढूभाऊंवर बहिष्कार टाकला! कोणी त्यांच्याशी बोलेना-चालेना. लोढूभाऊ एकटेच कोपऱ्यात बसून राहायचे, रडायचे!

मग तुम्हाला हे कळले. तुमचे आईचे हृदय गप्प कसे बसणार? तुम्ही लोढूभाऊंकडे गेलात, त्यांची समजूत काढलीत. नंतर विनोबाही आले म्हणे. विनोबा आले तसे लोढूभाऊ उठून चालले. विनोबा त्यांच्या मागे मागे जाऊ लागले. ''मी मूर्ख, अडाणी कशाला माझ्याशी बोलता?'' लोढूभाऊ म्हणाले.

विनोबांनी 'रागावू नका' वगैरे सांगितले. तसे ते म्हणाले, ''राग तुम्हालाही येतो. नसता तर कशाला गालात मारून घेतले असतेत? तुम्ही असे मारून घेतले म्हणून माझी सगळ्यांत छी थू झाली.''

नंतर हे सगळे मिटले. लोढूभाऊंनी आणखी पिंप्राळ्याच्या, लव्हाऱ्याच्या, फैजपूरच्या, खिरोद्याच्या पुष्कळ कथा सांगितल्या.

ते लोकलबोर्डासाठी उभे असताना तुम्ही त्यांच्या प्रचारासाठी त्या भागात गेला होतात. लोढूभाऊ आता बरेच थकले भागलेले दिसले, गुरुजी. पण स्वस्थ बसलेले नाहीत. अजूनही लोकांची कामे करताहेत. भांडणतंटे मिटवताहेत. मी रोझोद्याला गेलो त्याच दिवशी रात्री कुठच्या तरी गावाला अशाच कामासाठी जायचे होते. लोक आले होते. माझे बोलणे झाले नाही, तर रातोरात काम

संपवून निघाले आणि फैजपूरला डॉ. पार्थ चौधरींच्याकडे येऊन मला भेटले!

फैजपूरला डॉ. पार्थ चौधरी आणि डॉ. सौ. सिंधूताई चौधरी असतात. त्यांचा दवाखाना आहे. समाजवादी पक्षाच्या, सेवा दलाच्या कामात दोघेही आघाडीवर असतात. सिंधूताई एक बालक मंदिरही चालवतात.

फैजपूरला राष्ट्रीय सभेचे पहिले खेड्यातले अधिवेशन १९३६ च्या डिसेंबरमध्ये भरले होते, त्या वेळी तुम्ही आणि एस. एम. जोशी यांनी खेड्यापाड्यांतून प्रचाराचे कसे रान उठवले होते त्याच्या कथा ऐकल्या. आणखी पुष्कळ होते. त्यातली काही मंडळी भेटली.

खिरोद्याला ग्रामपंचायतीच्या कचेरीत तीस-चाळीस स्वातंत्र्यसैनिक तुमच्या आठवणी सांगायला केवढ्या प्रेमाने जमले होते! त्यांत मोतीराम गुरुजी होते, भादू महाजन होते, गुणा टोके होते, सुनाटू चौधरी होते, यादवराव होते, पांडुरंग खुशाल बोंडे होते.... किती जणांची नावे घेऊ? सगळेच तुमचे संबंधी. धुळ्याच्या जेलमध्ये तुम्ही एकत्र चक्की पिसलेली.

अरे हो, या सर्वांत तुमचा 'वाटाणा' भेटला. हसलात ना! मीही हसलो. लोटू पुना वाघोरे त्याचे नाव. ठेंगणाठुसका. चालतो तरातरा म्हणून तुम्ही त्याचे नाव ठेवले होते 'वाटाणा', होय ना! आणखी त्याच्या खऱ्या नावावरूनही तुम्ही त्याचे खांदे धरून ढकलत म्हणत असा, ''लोटू पुना, लोटू का पुन्हा लोटू?'' सभा संपल्यावर मीही त्याला तुम्ही करत असा तसेच करून म्हटले, 'लोटू पुना' गंमत आली! लोटूही निर्मळ हसला.

सरलाबाई ऊर्फ सोनाबाई चौधरींकडेही गेलो. त्यांना तुम्ही 'काकू' म्हणायचे. काकूंनीही तुमच्या आठवणी सांगितल्या. फैजपूर काँग्रेसच्यावेळी स्त्रियांचे प्रचारपथक काढले होते, त्यात काकू होत्या. खानदेशात गावोगाव हिंडल्या होत्या.

खिरोदा ही धनाजी नाना ऊर्फ दादासाहेब चौधरी यांची कर्मभूमी. फैजपूरच्या वेळी गांधीजी, विनोबाजी येथे आले होते. गांधीजी त्या वेळी म्हणाले होते, ''ह्या खेड्यात येण्यास मला कितीतरी आनंद होत आहे. येथील श्री. धनाजी नाना चौधरी ह्यांनी पोलीस खात्यातील आपली हुद्याची नोकरी सोडून काँग्रेस कार्यात महत्त्वाचा भाग घेतला व राष्ट्रसेवा करून मोठा त्याग केला, हे आठवून मी ह्या स्थानाला तीर्थक्षेत्र मानतो. श्री. चौधरी यांना ज्या ७५ स्त्री-पुरुषांनी सहकार केला, त्यांच्याही कार्याची मला आठवण होत आहे आणि त्या राष्ट्रसेवेप्रित्यर्थ मी ह्या गावाचे अभिनंदन करण्यास आलो आहे. गावातील व सभोवतालील

खूप स्वच्छता पाहून मला आनंद झाला आहे. तुमच्याजवळ काँग्रेस अधिवेशनास जर काही कारण असेल तर ते म्हणजे तुम्ही ह्या राष्ट्रीय लढ्यात भाग घेतला हे होय.''

दादासाहेबांच्या प्रत्येक कार्यात तुमचा सहभाग असायचाच. तुमचे 'खरा तो एकचि धर्म' हे गीत दादासाहेबांना फार फार आवडायचे. ते म्हणे म्हणायचे, ''साने गुरुजींनी एवढे एकच काव्य जरी लिहिले असते तरीदेखील ते महाकवी ठरले असते!''

खिरोद्याला तुमचे जाणे-येणे नित्य असे. तुमची तिथली भाषणे, प्रवचने, सफाई, सहभोजने यांच्या कितीतरी आठवणी अजून लोकांच्या लक्षात आहेत. त्यांनी तर त्याबद्दल सांगितलेच. पण तीन-चार महिन्यांपूर्वी दादासाहेबांच्या चिरंजीवांनी मधुकरराव ऊर्फ बाळासाहेब चौधरी यांनीही त्या काळातल्या बऱ्याच आठवणी सांगितल्या. त्या वेळी ते दहा-बारा वर्षांचेच होते पण तुमच्या तोंडून ऐकलेल्या गोष्टी विसरलेल्या नाहीत! जळगावला तुमचा वाढदिवस साजरा झाला. त्या वेळी त्यांनी तुमच्यावर एक कवन रचले होते. त्यातील पहिली ओळ त्यांना आठवत होती, ती त्यांनी सांगितली.

*मत्प्रिय गुरुजी, साने गुरुजी, प्रणाम हा घ्यावा*

मुंबईत बाळासाहेबांशी चांगल्या दीड-दोन तास गप्पाटप्पा झाल्या. विषय तुमचाच. बाळासाहेब सध्या महाराष्ट्र राज्याचे वित्तमंत्री आहेत बरे का, गुरुजी. पण त्यांचे खरे चित्त रमलेले होते शिक्षणात. यापूर्वी ते शिक्षणमंत्री होते. त्यांना मुले नि त्यांचे शिक्षण संस्कार, याविषयी खूपच आस्था आहे. आमच्या 'साने गुरुजी कथामाले'चे ते बरीच वर्षे अध्यक्षही आहेत.... आता विचाराल, ही कसली कथामाला म्हणून. अहो, तुम्ही मुलांना गोष्टी सांगत असा, मुलांत रमत असा. तुम्ही इथून गेल्यावर तुमच्या प्रकाशभाई मोहाडीकरांना वाटले, 'आपल्या गुरुजींची स्मृती मुलांना गोष्टी सांगूनच जागती ठेवावी.' आणि 'साने गुरुजी कथामाला' सुरू झाली. काही गावांतून कथामाला चालतात. पण पुष्कळ पुष्कळ गावांतून नव्हे गावागावांतून कथामाला चालल्या पाहिजे असे तुम्ही म्हणाल. परंतु आमच्याजवळ तुमच्यासारखे गोष्टी सांगणारे, गोष्टी लिहिणारे कुठे आहेत? आणि मुलांवर निरतिशय प्रेम करणारे, मुलांत मूल होऊन जाणारे तुमच्याएवढे थोर मन तरी कुठे आहे?....

खिरोदा-फैजपूर भागात शिक्षणाची सुबत्ता आढळली. खिरोदा तर विद्यानगरीच बनली आहे. जनता शिक्षण मंडळाचे विद्याकार्य भरभराटीत आहे. खिरोद्याच्या शिक्षण संस्थेला आता 'साने गुरुजी विद्यावर्धिनी' असेच नाव दिलेले आहे! प्रशस्त आवार आहे, प्रसन्न उद्यान आहे, सुंदर इमारती आहेत, भाऊसाहेब बोंडे यांची दक्ष उपस्थिती आहे.

शिक्षणशास्त्राचे शिक्षण घ्यायला आलेल्या शिक्षकांच्या वाङ्मय मंडळाचे मी नारळ फोडून उद्घाटन केले! हायस्कूलमधल्या मुलांना गोष्ट सांगितली. फैजपूरला ज्या क्षेत्रावर काँग्रेसचे अधिवेशन भरले होते तिथेच आता 'धनाजी नाना चौधरी महाविद्यालय' उभे आहे. टोलेजंग इमारत, हिरवागार परिसर. इथल्या विद्यार्थ्यांशीही गप्पागोष्टी केल्या. फैजपूर काँग्रेसच्या वेळी मुंबईहून जी स्वातंत्र्यज्योत इथवर आणली होती, ती तुम्हीच काँग्रेसचे स्वागताध्यक्ष शंकरराव देव यांच्या हाती येथे दिली. ती ज्योत या महाविद्यालयात मला पाहायला मिळाली! एखाद्या वस्तूलाही कसा इतिहास चिकटलेला असतो, नाही!

आता थाबंतो. बाकीचे खानदेशवृत्त पुढील पत्री.

तुमचा,

७ डिसेंबर १९७४

*राजा*

■ □ ■

म. ग्रं. सं. ठाणे,
वा. क्र ३५९६ दिनांक २३।२।९९
बा-वा

# ९.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

तुमच्या खानदेश-प्रेमाबद्दल आणखी एक कळले. तुम्ही म्हणे 'खानदेश स्तोत्र'च लिहिले होते आणि ते छापून प्रसिद्धही झाले होते. प्रयत्न करूनही अद्याप ते मला मिळालेले नाही. धुळ्याचे कांतीलाल गुजराती धाडून देतो म्हणाले आहेत. त्यांना पुन्हा लिहितो. कांतीलाल भाईंची आणि तुमची ओळख होतीच. त्यांनी अनुवादिलेल्या 'हरिजन संत' या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन तुमच्याच हस्ते झाले होते. त्याची बातमी मला साप्ताहिक 'भारत'ची फाईल चाळताना आढळली. जुन्या फाईलींतील जुन्या बातम्या वाचताना गंमत वाटते. तुम्हालाही ती वाटेल म्हणून ता. ५-१०-१९३७ च्या अंकातील ती बातमीच येथे देतो:

**'हरिजन संत' प्रकाशन**

*श्री. कांतीलाल गुजराती यांनी अनुवादिलेल्या 'हरिजन संत' या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचा प्रकाशन समारंभ 'साने गुरुजी' यांच्या हस्ते, खोल गल्लीत रात्री साडेआठ वाजता झाला. जागा उत्तम रितीने श्रृंगारण्यात आली होती. अनुवादक श्री. कांतीलाल यांनी पहिली प्रत सर्वात जास्त किंमत देणाराला देऊन ती रक्कम हरिजन कार्यास देण्याचे जाहीर केले व गुरुजींनी पुस्तकाचा लिलाव केल्यावर श्री. सुरजमल लादूराम यांनी रु. ११ देऊन ते घेतलं, याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे जरूर आहे.*

*त्यानंतर गुरुजींचे थोडक्यात भाषण होऊन 'पत्री' या बंधमुक्त संग्रहातील काही उदात्त, प्रेममय व देशभक्तीपर कविता त्यांनी म्हणून दाखविल्या.* (म्हणजे तुम्ही काव्यगायनही केले आहे तर!) *त्यानंतर श्री. सापे यांचे मजूर परिषदेतील भाषण झाल्यावर श्री. गोरे यांचे गांधीजींच्या चरित्रावर उत्तम व परिणामकारक भाषण होऊन त्यांनी धुळ्यातील विद्यार्थ्यांच्या उत्साहाबद्दल सानंद अभिनंदन केले.* (हे गोरे म्हणजे आपले नानासाहेबच की काय?) *वंदेमातरम् होऊन*

*समारंभ समाप्त झाला.*

'भारत' साप्ताहिकाच्या फाइल्स चाळताना १९३७-३८ च्या काळातील अंकांमधून तुम्ही लिहिलेले कितीतरी लेख नि अग्रलेख आढळले. 'लोकमान्यांचे स्मरण', 'काँग्रेसचे संग्राहक स्वरूप', 'तुझा तू वाढवी राजा', 'श्रीगणपतीची पूजा', 'दारुबंदीचा महान प्रयोग', 'शाळा म्हणजे सूतशाळा' इत्यादी इत्यादी तुमच्या अग्रलेखांचे मथळे आहेत. अमळनेरच्या जैन मंदिरात जैन युवकांच्या समोर दिलेल्या 'अहिंसा' या विषयावरच्या तुमच्या व्याख्यानाचा सारांशही १० ऑगस्ट १९३७ च्या अंकात वाचायला मिळाला. तशीच 'पत्री' काव्यसंग्रहात नसलेली पण ता. ७-१२-१९३७ च्या भारतात प्रसिद्ध झालेली 'भारत मारी हाक' नावाची पुढील कविताही वाचायला मिळाली.

*अरे भाई कर घाई*
*भारत मारी हाक॥ धृ०॥*

*भारतमाता रडत बसली*
*चिखलामध्ये गाडी फसली*
*कोण बरे खांदा देऊन वरती काढील चाक॥ १॥*

*अपमान करी सारे जग*
*डोळे उघडून जरा बघ*
*अविलंबे तेजे उठून मातृ-लाज राख॥ २॥*

*कोणी येतील मग निघू*
*अशी नको वाट बघू*
*मागे-पुढे मुळी न बघता पाऊल पुढे टाक॥ ३॥*

*देशसेवा करता करता*
*देशासाठी झिजता झिजता*
*कधीही न तनामना तुझ्या वाटो धाक॥ ४॥*

*आई तुझ्या सेवेसाठी*
*आई तुझ्या मोक्षासाठी*
*फेकीन माझे प्राण अशी घे रे आणभाक॥ ५॥*

*जखडिती शत पाश*
*नाही उरली इवली आस*
*बंध सारे झणी जाळून कर त्यांची राख॥ ६॥*

*ऊठ ऊठ ऊठ झणी*
*स्फूर्ती संचरू दे मनी*
*तुझ्या दिव्य उदाहरणे उठतील मग लाख॥ ७॥*

जळगावला गेलो त्या वेळी तुमचे कॉम्रेड सदुभाऊ भालेराव भेटले. त्यांच्या पत्नी सौ. इंदुताई भेटल्या. त्यांच्या घरीच गेलो होतो. त्यांची तुमच्यावर भक्तीच आहे. सुरुवातीला तर एक ध्येय, एक विचार असेच तुम्ही होता पण पुढे राजकीय विचार जरी बदलले तरी या वैयक्तिक संबंधाला कधी बाधा पोचली नाही. कशी पोचावी? तुम्ही ज्या चार विद्यार्थ्यांची आई होऊन पुण्यात राहिला होता त्यांतील एक सदुभाऊ होते. बाकीचे तिघे म्हणजे राजाभाऊ कुलकर्णी, रामभाऊ मोहाडीकर आणि पी. जी. कुलकर्णी. गुरुजी, या चौघांनाही भेटलो. सर्व खुशाल आहेत.

सदुभाऊ तर परवा जळगाव नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले! इंदुताई शाळा चालवतात. ज्योतिर्मयी वर्ग. वर्गातल्या छबुकड्यांकडून श्यामच्या आईमधील काही प्रसंग त्यांनी नाट्यरूपाने स्नेह-संमेलनाच्या प्रसंगी करून घेतले होते. मला त्यांनी फोटो दाखवले. त्यांनी 'समरकथा' नावाचे स्वत:च लिहिलेले पुस्तकही दिले. जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढ्याच्या शौर्यकथा त्यात आहेत. कव्हरवर आणि आतही प्रथम पृष्ठावर तुमचेच चित्र आहे. अर्पणपत्रिकेत म्हटले आहे,

*'भरोनी सद्भावांची अंजली, मिया ओविली फुले मोकळी,*
*अर्पियली मी युगली, साने गुरुजींच्या....*
*स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती असलेल्या, आमच्या व्यक्तिगत जीवनांशी निगडित असलेल्या पू. साने गुरुजींना ही मंजिरी अर्पण करीत आहे....'*

जळगावलाच तुमचे दुसरे कॉम्रेड भेटले, आंबोडेकरबुवा. दम्याने हैराण झाले होते मध्यंतरी. आता बरे आहेत. मॉस्कोला जाऊन औषधोपचार करून आले! माझी-त्यांची पूर्वीची ओळख नव्हती. ती करून देताना पहिलेच वाक्य त्यांनी उच्चारले, ''मी एका वेश्येशी लग्न केले होते!'' आणि मग पुढे सगळे.

त्यांच्या जहाल भाषणावर इंग्रज सरकारने बंदी घातली. तेव्हा तुम्हीच त्यांना 'कीर्तन करा' म्हणून सांगितलेत. आणि तेव्हापासून आजपावेतो बुवा कीर्तन करताहेत. कीर्तनामधून साम्यवाद सांगताहेत. आषाढी-कार्तिकी वारीला पंढरीला न चुकता जाताहेत. त्यांच्या वारकरी धारणेला साम्यवादी तत्त्वज्ञानातील जडतेची वा नास्तिकतेची बाधा झालेली नाही! त्यांनीही, 'महाराष्ट्रातील मुला-मुलींचे आवडते आणि प्रतिभासंपन्न स्फूर्तीदायी लेखक कै. साने गुरुजी यांच्या चरणी 'मारुतीची फुले' अर्पण असे,' असे म्हणून मुलांसाठी लिहिलेले आपले 'मारुतीची फुले' हे गोष्टींचे पुस्तक तुम्हाला अर्पण केले आहे.

१९३६ साली पाचोऱ्याला कन्हैय्यालाल उदयराम शर्मा यांनी दिलेल्या त्यांच्या शेतातील जागेत 'डोंगरी भिल्ल सेवाश्रम' काढला होता. त्यात ३२ भिल्ल मुले होती. पाचोऱ्यात आठवड्यातून एक-दोन वेळा सगळी मिरवणुकीने जायची. धान्यधुन्य मागून आणायची. तुम्ही या आश्रमाचे संचालक होता, आणि बुवांच्या पत्नी अनसूयाबाई ह्या व्यवस्थापिका होत्या.... बुवांनी तुमच्या बऱ्याच आठवणी सांगितल्या.

एकदा तुम्ही एका दगडावरच उभे राहून व्याख्यान दिले होते आणि नंतर त्या दगडाला म्हणाला, ''हे दगडा! तुझाही मला परकी साम्राज्य नष्ट करायला उपयोग आहे!''

भादलीचे डॉ. सुभान पाटील येथेच भेटले. त्यांच्याबरोबर कानळद्याचे श्री. नामदेव राणे आले होते. दोघांवरही तुमचा लोभ. डॉ. सुभान यांनी किती तरी आठवणी सांगितल्या. तुमचे एक पत्र आणि १९४५ साली सत्काराच्या वेळी काढलेले तुमचे छायाचित्र असलेले त्या वेळचे एक कॅलेंडरही त्यांनी मला दिले. सत्कारनिधीच्या वेळी कसकशा गोष्टी घडल्या हेही त्यांनी सविस्तर सांगितले. ते सत्कार समितीचे चिटणीसच होते ना!

कानळद्याला तुम्ही जात असा. तिथे 'तरुण मंडळ' होते. नामदेव राणे जीव तोडून काम करीत. तुमचा त्यांच्यावर किती जीव! नामदेवरावांनी तुमची चार-पाच पत्रे मला दिली आहेत. ती वाचली आणि कल्पना आली. एका पत्रात तुम्ही लिहिले आहे, 'काय लिहू तुला बाळ! तू माझ्या भेटीसाठी आसावला आहेस, मीही तुला भेटायला अधीर आहे.... तुझी आठवण येते. तुझा पूर्वी कान दुखत असे तो कसा आहे?' दुसऱ्या एका पत्रात लिहिले आहे, 'तुम्ही धडपडत आहात. मी येथे कर्मशून्य. उद्या ९ ऑगस्ट. ते महान

आंदोलन आठवते. ती बलिदाने, ती चिमुरे! त्या निष्पाप रक्त व अश्रुंतून नवमंगल प्रभात निर्माण होईल...' आणखी एका पत्रात लिहिले आहे, 'येत आहे राजा. तुझी सर्व पत्रे मिळाली. मी कर्महीन कीडा लिहिणार तरी काय? तुम्ही काम करा. मी प्रार्थना करीन... प्रार्थना हेच माझे बळ. दुसरे काय म्हणू? तुमचा उत्साह सदैव टिको. जे लागेल ते माझ्याजवळ माग. असेल तोवर देईन. स्वतःला विकूनही मी तुम्हाला मदत करीन. प्रभू तुम्हाला कामाचा आनंद देवो. तुमच्या हातून निर्मळ सेवा करून घेवो.....'

शांतीलाल रायसोनी भेटले. त्यांच्या घरी तुम्ही एकदा उतरला होता. त्यांच्या पत्नीला धुणे धुवायला, पोळ्या लाटायला तुम्ही मदत केली होती. 'एकटी किती करणार?' असे वाटून धावलात. हे सांगताना शांतीलालभाईंचे डोळे पाणावले.

त्यांनी भंगी कॉलनीतल्या व्याख्यानाची हकिकत सांगितली. भंगी कॉलनीत होत्या दोन पार्ट्या. भुरा गोयल आला सभेचे निमंत्रण द्यायला. ''भुरा, तुमच्यात भांडणे, कसे यायचे?'' म्हणालात. दोघांना वेगवेगळे भेटून समजूत काढायचा प्रयत्न केलात. पण त्यांची समजूत पटली नाही. भांडण मिटले नाही. पण व्याख्यानाला दोघांनी यायचे कबूल केले. त्याप्रमाणे ते आले. व्याख्यान सुरू झाले. तुम्ही राम-लक्ष्मणाची गोष्ट सांगितली. बंधुप्रेमाची महती गायली. दोघेही ढसाढसा रडले. व्याख्यान संपताच एकमेकांना मिठ्या मारल्या. भांडण संपले, वैर मिटले!

श्री. देवकीनंदन नारायण यांच्याकडे गेलो होतो. बराच वेळ बोलत बसलो होतो. वृद्ध झाले आहेत. श्री. गगडाणी, डॉ. बाकरे, एल. के. देशपांडे, गुलाबराव पवार इत्यादींच्याही गाठीभेटी झाल्या. श्री. पवार सध्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आहेत. अमळनेरला तुमच्याबरोबर राहत होते. जळगावच्या मुक्कामात प्रा. लता पाटणकर यांचे खूपच साहाय्य झाले. जळगावला त्या पुष्कळ काम करतात. झोपटपट्टीतल्या मुलांसाठी शिशुशाळा, संस्कार केंद्र चालवतात.

वाघोडचे राधो महाजन निरोप मिळताच फैजपूरला आले होते. त्यांचा आवाज सुरेख आहे. त्या वेळी निवडणुकीच्या प्रचार सभांमधून आणि मिरवणुकींमधून तुम्ही केलेली गाणी कशी असत व ती किती लोकप्रिय झाली होती हे त्यांनी अगदी त्या काळात जाऊन सांगितले. काही गाणी म्हणूनही दाखवली. मी उतरून घेतली.

*मतदार बंधु तुम्ही काँग्रेसला मतं सारे द्या रे॥ धृ०॥*
*काँग्रेस सदा मरे तुमच्यासाठी झुरे।*
*तुमच्यासाठी ती लाठ्याही खाय रे॥ मतदार०॥ १॥*

गुरुजी, ज्या काँग्रेससाठी तुम्ही प्राण पाखडलेत ती तशी आता राहिली नाही. स्वातंत्र्यासाठी लाठ्या खाणारी काँग्रेस आता जनतेला पायदळी तुडवून जयप्रकाशांच्यासारख्या स्वातंत्र्यवीर लोकनायकांवर लाठ्या चालवत आहे! सायमन कमिशनच्या वेळेला लाला लजपतराय यांच्यावर गोऱ्या सोजिरांनी खुनशीपणाने लाठीहल्ला केला होता, त्यांच्या छातीवर ठोसे मारले होते. त्या वेळी लालाजी म्हणाले होते, ''मला मारलेले हे ठोसे हे साम्राज्यशाहीच्या शवपेटीवर ठोकले गेलेले खिळे ठरतील!''

गुरुजी, जयप्रकाशजींच्या खांद्यावर हाणलेले तडाखेदेखील......

लालाजींवर लाहोरला हल्ला झाला, त्या वेळी लखनौला जवाहरलालजीही जनमोर्च्यात लाठ्या खात होते. जयप्रकाशांवर पाटण्यात हल्ला झाला. त्या वेळी जवाहरकन्या दिल्लीच्या तख्तावर राज्य करीत आहे, एवढाच फरक!

वाघोडच्या चावडीवर राष्ट्रीय झेंडा कसा फडकवला, त्या वेळची हकीकत राधो महाजन यांनी सांगितली. ते म्हणाले, ''गुरुजींनी भीती घालवली. आत्मा साफ केला. देशाकरता मरायला स्फूर्ती दिली.''

वाघोडला तुम्ही जात असा. तेथील एल. डी. पाटलांच्या घरात राहून तुम्ही लिखाणही केलेले आहे असे राधो महाजन म्हणाले आणि एका आठवणीने भारावून जाऊन डोळे टिपित म्हणाले, ''एकदा मला आपल्या ताटात घेऊन गुरुजी जेवले!''

भुसावळला श्री. ग. वि. जोशी, राठीजी, नारखेडे आदी मंडळी भेटली. जोशी पालगडचेच. बेचाळीसच्या चळवळीत ते तुरुंगात गेल्यावर तुम्ही एकदा भूमिगत असतानाच भुसावळला रात्री त्यांच्या घरी गेलात. तुमचा वेष होता शेतकऱ्याचा. थोडी ओळख दिल्यावर सरांच्या मातोश्री कुसाताई म्हणाल्या, ''कोण पंढरी का रे?'' आणि मग तुम्ही काही अडचण वगैरे आहे का, अशी त्यांची विचारपूस करून रातोरातच निघून गेलात.

कै. नारखेडे लेखक आहेत हे तुम्हाला ठाऊकच आहे. त्यांनी तुमच्यावर दोन गोष्टीही लिहिल्या आहेत; त्या त्यांनी मला दाखवल्या.

आमोद्याला 'लेवा श्रीराम मंदिर देवस्थान' येथे जाऊन आलो. प्रमुख

ग्रामस्थ बरोबर होते. श्री. भुन्हा पाटील हे मुख्य विश्वस्त. यांच्यासह तुम्ही हरिजनांना घेऊन या राममंदिरात गेला होता. त्या हरिजन मंदिर-प्रवेशाच्या आठवणी ग्रामस्थांनी सांगितल्या. शाळेत गेलो. मुलांना गोष्ट सांगितली. मजा आली. बाकी खानदेश पुढील पत्री.

तुमचा,

१४ डिसेंबर १९७४

*राजा*

■ □ ■

# १०.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

अमळनेर ही तर तुमची कर्मभूमी. तसा अख्खा खानदेश आणि नंतर महाराष्ट्र ही एवढी तुमच्या कर्मभूमीची व्याप्ती. पण त्यातल्या त्यात म्हणतात तसे. अमळनेरलाच शिक्षण संपवून तुम्ही शिक्षक बनलात. त्याआधी अमळनेरला आलात तेच येथील तत्त्वज्ञानमंदिरामुळे. तत्त्वज्ञानाच्या ओढीने इथवर धाव घेतलीत, पण तहान काही भागली नाही. म्हणून शाळेत शिक्षक झालात आणि तुम्हाला तुमचे क्षेत्र गवसले.

जेमतेम पाच-सहा वर्षेच तुम्ही या शाळेत शिक्षक म्हणूनदेखील राहिलात. पण तेवढ्या अवधीत शिक्षक म्हणून तुम्ही केवढा लौकिक कमावला! केवढी नातीगोती जोडली!

अमळनेरला धोंडोपंत कुलकर्णी भेटले. बरेच थकले आहेत. बरीच वर्षे ए. ओ. होते. 'शालापत्रका'चे संपादनही त्यांनी केले. आणि त्या वेळीच 'श्यामची आई' मधील काही रात्री 'शालापत्रका'तून प्रथम प्रसिद्ध झाल्या.

धोंडोपंतानी बऱ्याच आठवणी सांगितल्या. तुम्ही काढलेले स्वच्छता पथक, सूतशाळा, बगीचा वगैरे वगैरे. सूतशाळेतल्या मुलांनी कातलेले सूत तुम्ही पारोळ्यास घेऊन गेलात आणि त्याची खादी विणून आणलीत. त्या खादीचा कोट जेव्हा 'ए. ओ.'च्या अंगावर दिसला तेव्हा तुमचे डोळे आनंदाने पाझरले होते!

श्री. का. प्र. पुराणिकांच्या घरी गेलो. हे तर तुमचे सहकारी शिक्षक. पुराणिकांनी तुमच्या त्या काळातील आठवणी सांगितल्या. पाठदर्शनाचा एक उपक्रम त्या वेळी शाळेत सुरू झाला होता. दर आठ-पंधरा दिवसांनी एकेका शिक्षकाने सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत पाठ घ्यायचा व त्यावर नंतर चर्चा करायची असा तो उपक्रम. एकदा पाठ घेण्याबद्दल पुराणिकांनी तुम्हाला विचारले पण तुम्ही, "मी शिक्षणशास्त्र अभ्यासिले नाही. त्याची कोणतीही परीक्षा दिली नाही." असे सांगून त्यांना नकार दिलात. पुराणिक म्हणाले, "तुम्ही पाठ देणार नसाल तर आम्ही सर्व शिक्षक तुमच्या नेहमीच्या तासाला वर्गात येऊन

बसू.'' पण एवढ्याने तुम्ही बधणार? म्हणालात, ''तसे तुम्ही आला तर मी वर्गातून पळून जाईन!''

त्या वेळी तरी हा प्रश्न तसाच राहिला. पण पुढे काही दिवसांनी पुन्हा विनंती केल्यावर मराठीचा पाठ घेण्यास तुम्ही अनुमती दिलीत. पाठाचा विषय होता, 'मराठी पद्य-केकावलीतील काही श्लोक.'

त्या दिवशी सकाळी तुम्ही साडेनऊला पाठ सुरू केलात आणि एवढे रंगून गेलात - एवढे रंगून गेलात की अकराला पाठ संपविलात! पुराणिक म्हणाले, आम्ही सर्व शिक्षक आणि विद्यार्थी तर भान हरपूनच बसलो होतो. मंत्रमुग्ध झालो होतो.

*पिता जरि विटो, न जननी कुपुत्री विटे।*
*म्हणूनि म्हणती भले ऋण न जन्मदेचे फिटे॥*

या पंक्तीचे विवरण किती बहारीने तुम्ही त्या वेळी केले होते, हे पुराणिकांनी अगदी ते दृश्य डोळ्यांपुढे आणून सांगितले. मातेचे वात्सल्य, माता मुलाकरता सोशीत असलेले अपार कष्ट, त्याच्याकरता करीत असलेला असीम त्याग, त्याच्यावर करीत असलेले निरपेक्ष प्रेम इत्यादींचे तुम्ही केलेले सोदाहरण विवेचन ऐकून अनेकांच्या डोळ्यांत पाणी तरारले!

पाठ संपला नि भारावलेल्या मनाने सगळेच बाहेर पडले. पुराणिक म्हणाले, ''असल्या पाठावर काय चर्चा करणार? एका विशिष्ट समाधानाच्या स्थितीतच आम्ही बाहेर पडलो.... असे होते साने. निष्ठावंत व उपजत - बॉर्न शिक्षक.''

श्री. द. मा. वैद्य यांच्याही घरी गेलो होतो. हे तुमचे विद्यार्थी. नंतर तुमच्याच शाळेत शिक्षक झाले. वैद्यांनी अतिशय हृद्य आठवण लिहिली आहे. 'अडलेल्यास मदत करण्यास गुरुजी सदा तत्पर असत. फीला पैसे नाहीत या सबबीवर शाळा सोडावी लागण्याचा प्रसंग माझ्यावर आला होता. पण गुरुजींना हे कळताच त्यांनी मला सांगितले, 'तुला वर्षभर मी फी देईन. पण शाळा सोडू नकोस,' आणि खरोखरीच दर महिन्याच्या पहिल्या तारखेला गुरुजी माझ्या वर्गासमोर येऊन, मला बाहेर बोलावून माझे नाव वर लिहिलेली फीच्या पैशांची पुडी मला देऊन जात असत.'

एकदा छात्रालयात रात्री खिडकीचे दार लावताना एक मुंगळा चिरडला गेला हे पाहून सारी रात्र तुम्ही दुःखाने रडून काढली. उशी ओलावली. छात्रालय दैनिकातही ही शोकवार्ता तुम्ही दिली होती; आठवते का? अमळनेरच्या मुक्कामात

तुमची शाळा आताचे 'प्रताप हायस्कूल', त्या वेळची छात्रालयाची ती 'अंदमान' नामक जागा पाहिली. तुम्ही तिथे बगिचा फुलवलात आणि अंदमानाचे 'आनंदभुवन' केलेत. या बगिच्यासाठी सगळे काम उरकल्यावर रात्री अंधारात समोरच्या तत्त्वज्ञान मंदिराच्या आवारात असलेल्या विहिरीचे पाणी दोन हातात दोन बादल्यांनी भरून आणीत होतात.

अशी धडपड करून ती बाग शिंपलीत, फुले फुलवलीत आणि छात्रालयाच्या मुलांची मनेही उमलवलीत! सद्गुणांचा सुगंध भरलात! त्यासाठी हा केवढा आटापीटा! सगळ्यांचे सगळे बघायचे, करायचे, शिकवायचे, आणि रात्रीतून पुन्हा एकटाकी 'छात्रालय दैनिक' लिहून काढायचे! सकाळी त्यावर शाळेतल्या मुलांच्या उड्या पडायच्या, आठवते ना!

तुमच्या छात्रालयातील एक विद्यार्थी यशवंतराव पवार यांना, शिरपूरला गेलो त्या वेळी चार मैलांवरच्या वाघाडीला त्यांच्या हवेलीत जाऊन भेटून आलो. आपला गजानन जोशी शिरपूरलाच असतो. एल. आय. सी.मध्ये आहे. त्याची पत्नी, मुलेबाळे ठीक आहेत. तर त्याच्याबरोबर फटफटीवर बसूनच गेलो होतो. हा तुमचा विद्यार्थीही आता बराच थकला आहे.

छात्रालयात असताना हे तुमच्याच खोलीत राहत असत. घरची श्रीमंती, सरदारी राहणी. बडोद्याहून ते अमळनेरला आले होते. नको असलेल्या सगळ्याच सवयी त्यांच्याजवळ त्या वेळी होत्या. पण तुमच्या सहवासात तेही पार बदलून गेले. तुमच्या 'धडपडणाऱ्या मुलां'त त्यांचे चित्रण तुम्ही केलेलेच आहे. तर वाघाडीला गेलो तेव्हा यशवंतराव म्हणाले, "भलाईची व मानव धर्माची जाणीव गुरुजींच्या सान्निध्यात मला झाली."

एकदा तुम्ही, तुमचे मित्र चंद्रोदय भट्टाचार्य यांच्याबरोबर वाघाडीला त्यांच्याकडे गेला होता, असे यशवंतराव म्हणाले. आणखी एक आठवण सांगितली. म्हणाले, "मी १९३७ च्या निवडणुकीच्या वेळी स्वतंत्र म्हणून उभा राहिलो होतो. काँग्रेसच्या विरोधी. गुरुजींना हे कळताच त्यांनी मला रागावून लिहिले होते, 'तू माझा माणूस असून काँग्रेसविरोधी उभा राहतोस?' गुरुजींना माझे उभे राहणे आवडले नव्हते."

अमळनेरला जिथे तुमची सूतशाळा होती ती वसंतराव मुठ्यांच्या चिरेबंदी वाड्यातील पाठीमागची जागा पाहिली. आता पूर्वी होती तशी ती नाही. नव्याने भिंती वगैरे घातल्यामुळे थोडा बदल झाला आहे. कोणी भाडेकरूही तिथे

हल्ली राहताहेत.

वसंतरावांच्या बरोबर त्यांच्या प्रशस्त दिवाणखान्यात गप्पागोष्टी झाल्या. वसंतराव पहिल्यापासून संगीताचे भक्त. त्यांच्या त्या दिवाणखान्यात कितीतरी थोरामोठ्यांनी पायधूळ झाडलेली. लोकमान्य टिळकही एकदा तिथे उतरले होते. त्यांच्याबरोबर त्या वेळी काढलेल्या एका फोटोत लहानगे वसंतरावही आहेत. तुम्ही काढलेल्या राष्ट्रीय मेळ्याची हकिकत त्यांनी सांगितली. तुम्ही नाटक, गाणी, संवाद लिहून द्यायचे, सोबत्यांनी ते बसवून गावोगाव प्रचार करत हिंडायचे. सर्वांना खादीचा गणवेश असायचा.

एकदा पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन, तुम्ही या मुठ्यांच्या वाड्यातूनच पसार झाला होता. आणि त्यामुळे पुढे म्हणे पाच वर्षे त्यांच्या वाड्यावर पोलिसांचा कडक पहारा होता!

वसंतराव तबलावादक आहेत. त्यांच्या एका स्नेह्यांनी गाणे म्हटले आणि वसंतरावांनी तबल्याची साथ केली. आता वय झाले तरी त्यांच्या हातातले सफाई नि कौशल्य उणावलेली नाही. एक छोटीशी मैफिलच त्या दिवशी झाली म्हणा ना! माझ्याबरोबर तुमचे पी. जी. कुलकर्णी व बी. जी. ऊर्फ भालजी ब्रह्मे हे होते. वा. रा. सोनारही उशीरा पोचला. या मंडळींनी अमळनेरच्या मुक्कामात खूपच मदत केली, गुरुजी!

मुठ्यांच्या घरातच तुमचे पुसाळकर वकील राहायचे. ते हल्ली पुण्यास मुलाकडे असतात. दोन-तीन वेळा त्यांची भेट झाली. बोलणे झाले. किती तरी गोष्टी त्यांच्याकडून समजल्या. तुमची अमळनेरची पत्र्याची खोली, ज्या केसरी सरांच्या घरात तुम्ही एकदा उपोषण केलेत ते घर, प्रताप हायस्कूल, अंदमान छात्रालय, अशी काही छायाचित्रे पुसाळकरांनी मला दिली आहेत. तुमच्या प्रकाशनाचे व्यवहार किती तरी दिवस तेच पाहत असत. तुम्ही कुणा-कुणाला सतत आर्थिक साहाय्य करीत होतात, ते ज्याचे त्यांना पोचते करणे वगैरे कामही पुसाळकरच करीत असत. त्यासंबंधीच्या आणि तुमचे 'काँग्रेस' साप्ताहिक, 'कर्तव्य' दैनिक इत्यादी संबंधीच्या अनेक हकिकती त्यांच्याकडून कळल्या. काँग्रेस संघटनेतही ते पदाधिकारी असत; त्यामुळे चळवळीतल्यादेखील खूप आठवणी त्यांनी सांगितल्या.

एकदा म्हणे ग्वाल्हेर दरबारकडून ४०० रुपयांची मनिऑर्डर तुमच्या नावे आली होती. तुमचा सगळा पत्रव्यवहारच पुढे पुसाळकरांच्या पत्त्यावर होता.

एवढी रक्कम पोस्टमास्तर त्यांना देईना. तुम्ही तर दौऱ्यावर. पैसे पोस्टात पडून. मग धावाधाव करून तुमची ॲथॉरिटी आणवली आणि ते पैसे म्हणे मिळाले. मी विचारले, "हे कसले पैसे?" तेव्हा त्यांनी सांगितलेली हकिकत मला मजेशीर वाटली. ग्वाल्हेरच्या राणीसाहेबांना म्हणे पुत्ररत्न झाले होते. संस्थानभर आनंदी आनंद साजरा होत होता. तिथे कोणाला एकाला वाटले, आपण राणीसाहेबांना काय बरे भेट द्यावी? तो होता तुमचा वाचक. भक्त. तुमचे 'स्त्री-जीवन' त्याने वाचलेले. त्याला, मास्टर विनायकांप्रमाणेच अतिशय आवडलेले. त्याने काय केले, त्यातील काही वात्सल्यपूर्ण ओव्या सुबक, सुंदर अक्षरात लिहून वेलबुट्टी वगैरेंनी सजवून त्याच राणीसाहेबांना नजर केल्या! आणि त्या ओव्या पाहून राणीसाहेबही खूष झाल्या. इतक्या खूष झाल्या की, त्यांनी तुम्हाला चारशे रुपये बक्षीस म्हणून धाडले! आठवते ना, गुरुजी! काही असो, कुणाच्या तरी फाटक्याला ठिगळ लावायला, कुणाची तरी अडचण निवारायला तुम्हाला ते कामास आले!

सहज जाता जाता, 'स्त्री-जीवन' ची आठवण झाली म्हणून कळवून टाकतो. नुकतेच इचलकरंजी येथे पन्नासावे मराठी साहित्य संमेलन झाले. या सुवर्ण महोत्सवी संमेलनाचे अध्यक्ष होते आजचे सर्वात लोकप्रिय लेखक श्री. पु. ल. देशपांडे. पंढरपूरच्या मंदिर-प्रवेशाच्या दौऱ्याच्या वेळी आम्ही निरनिराळी गाणी म्हणत असू. त्यात श्री. पु. ल. देशपांडे यांचेही एक गीत म्हणत असू, आठवते का?

*हरिचे प्यारे हरिजन आम्ही आलो हरिचरणी*
*पंढरिराया राऊळि तुमच्या बसू धरून धरणी....।*
*चोखामेळयाच्या भक्तीची शक्ती आम्हांला*
*मिराबाइचे घुंगुर चरणी, सखुच्या करताला॥*
*तुकयाची वाणी मुखामधि निश्चय नाम्याचा*
*बंडखोर आम्ही म्होरक्या ज्ञानदेव अमुचा*
*शिणली गा पाऊले विठ्ठला तिष्ठुनिया दारी*
*उघडा दरवाजे नका हो घालवु माघारी*
*चोखामेळयाला जयांनी दुष्टपणे छळले*
*त्या बडव्यांहुनि का दयाळा मन अमुचे मळले?।*
*कान्होपात्रेला ठरवूनी नीच त्याज्य पतिता*

*अनाचार करिती राऊळी तुझ्याच भगवंता॥*
*कशी न तुला वाटे दयाळा भक्तांची खंत*
*का? तुझ्याहि दरबारि जाहला न्यायाचा अंत?।*
*जनाबाईला जे बडवीती म्हणोनिया चोर*
*बडवे झाले का दयाळा आम्हाहुनी थोर?॥*
*दूर लोट वा पोटी घेई केला निर्धार*
*वेदाशास्त्रांचा असो वा नसोच आधार।*
*महाराष्ट्राच्या रे सावळ्या विठ्ठल महाराजा*
*तुटले जरि हे मस्तक तुटेल चरणावरि तुझ्या॥*

किती सुंदर गीत! तर पुलंनी तुमच्या लोकवाङ्मयाच्या वेडाचा मोठ्या गौरवाने आणि कृतज्ञ भावनेने उल्लेख केला. ते म्हणाले, ''... अनेक वर्षांनंतर साने गुरुजींनी ह्या फुलांच्या परड्या भरून आम्हांला आणून देईपर्यंत आमचेही लक्ष तिकडे गेले नव्हते...''

संमेलन संपल्यानंतर सांगलीला त्यांच्या हस्ते तेथील नगर वाचनालयाच्या सभागृहात लावण्यासाठी तयार केलेल्या तुमच्या प्रतिमेचे अनावरण पुलंच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी, ''साने गुरुजींचे साहित्य हे लोकवाङ्मय आहे; ते सहजस्फूर्त आहे'' असे सांगून ते म्हणाले, ''साने गुरुजींच्या साहित्यातून आणि जीवनातून ज्या अनेकांना स्फूर्ती, प्रेरणा मिळाली आहे, त्यांपैकी मी एक आहे.''

अमळनेरला जिथे तुमचे 'काँग्रेस' साप्ताहिक छापले जाई त्या 'अरविंद प्रेस' मध्ये गेलो होतो. प्रेसचे मालक श्री. न. वे. शिंपी भेटले. त्यांना तुमच्याविषयी केवढा आदर! म्हणाले, ''गुरुजींच्या रूपाने खुद्द पांडुरंगाचे पाय आमच्या प्रेसला लागले; आमचे फार चांगले झाले!''

'काँग्रेस' पत्रावर पुढे सरकारची अवकृपा झाली. पत्र बंद करावे लागले. शिंपींनाही आर्थिक त्रास सोसावा लागला. आपल्यामुळे असा त्रास कोणाला झाला तर ते तुमच्याने कसे पाहवणार? शिंपी म्हणाले, ''एकदा रात्री गुरुजी घरी आले आणि माझ्याकडून प्रॉमिसरी नोट लिहून घ्या म्हणाले. पण मी काही घेतली नाही.''

याशिवाय अमळनेरच्या मुक्कामात हिराभाई शहा, शंकरशेट शिंपी, मो. द. ब्रह्मे, डी. एस. देशमुख, सौ. कमलाबाई परांजपे, इत्यादी तुमचे परिचित भेटले. कमलाबाई सांगत होत्या की, ''कधी तरी गुरुजी आमच्याकडे जेवायला

यायचे. अर्ध्या पाटावर अंग चोरून बसायचे. संकोचूनच जेवायचे. हवं-नको हातानेच सांगायचे. पण मला कधी कधी कळायचे नाही. वाढावं की नको? मी सासुरवाशीण. माझी पंचाईत व्हायची.''

एकदा त्यांच्या भगिनी मंडळात तुमचे व्याख्यान ठरले होते. वेळ होत आली पण तुमचा पत्ता नाही. म्हणून त्या चिंतेत पडल्या. पण बरोबर वेळेवर तुम्ही जिना उतरून खाली आलात. मागच्या बाजूने गुपचूप केव्हा येऊन जिन्याच्या पायरीवर येऊन बसला होता कुणास ठाऊक! दर चतुर्थीला तुम्ही भिकूअण्णा परांजपे यांच्याकडे जेवायला जात असा. भिकूअण्णा सरकार पक्षाचे होते पण तुमच्याविषयी त्यांना फार आस्था होती. काही तरी निमित्ताने तुम्हाला जायला उशीर झाला म्हणजे म्हणे म्हणायचे, ''मोरया जेवायला यायचा आहे अजून!''

डी. एस. देशमुखांच्याकडे धानोऱ्याला अनेक वेळा तुम्ही गेलेले आहात. ते सांगत होते, ''एकदा आम्हाला म्हणाले, 'गुरुजी' 'गुरुजी' म्हणता तर गुरुदक्षिणा द्या. आम्ही विचारले, 'काय देऊ?' तर म्हणाले, ''चहा पिणार नाही. विडी-सिगारेट ओढणार नाही, निर्व्यसनी राहीन, अशी प्रतिज्ञा करा. म्हणजे मला माझी गुरुदक्षिणा मिळाली' आम्ही मुरलीधराच्या समोर त्यांच्या पायावर हात ठेवून तशी शपथ घेतली. मी ती अजून पाळली आहे.''

एकदा तुम्ही धानोऱ्याला गेलात. देशमुखांच्याच खोलीवर उतरलात. गावातील भुतडा शेटजींकडून पंचपक्वान्नांचे ताट भरून आले पण ते पाहून तुम्हाला रडू कोसळले! म्हणालात, ''माझ्या देशातल्या गरीब लोकांना हे कधी तरी मिळेल का? मग मी कसे खाऊ?'' त्या दिवशी तुम्ही स्वत:च्या हाताने भाकरी व पोकळ्याची भाजी करून खाल्लीत.

धानोऱ्याचीच गोष्ट. तिथे बारणे नावाचे एक ख्रिस्ती मिशनऱ्याचे कुटुंब होते. परिस्थितीचा गैरफायदा घेऊन एका हरिजन मुलाला बळेनेच बाप्तिस्मा देण्याचा त्यांनी घाट घातला होता. तुम्हाला हे कळले. तुम्ही सेवा दलाच्या तरुणांना म्हणालात, 'हे धर्मांतर होऊ देऊ नका!' आणि ते सक्तीचे धर्मांतर थांबले.

काँग्रेसच्या प्रचाराला बैलगाड्यांवर तिरंगी झेंडे फडकावीत मंडळी तुमच्याबरोबर निघायची. गावोगावचे लोक बघून म्हणायचे, 'काँग्रेसना लोके उनात रे बाप' काँग्रेसचे लोक येऊन राहिलेत रे बाबा!'

तुमचे राजा कुलकर्णी मो. द. ब्रह्मे यांच्याकडे असायचे. तिथेच त्यांची एक आत्याही राहायची. ती मोठी सनातनी, सोवळी होती. तुम्हां सुधारणावाद्यांचे तिला काही पटायचे नाही. पण गांधीजी गेल्याचे कळल्यावर आत्याबाई नदीवर जाऊन आंघोळ करून आल्या. ब्रह्मे वकील म्हणाले, ''पटत नव्हते तरीही गुरुजींचा प्रभाव असा आत्यावर पडलेला होता!'' आता थांबतो. बाकी पुढच्या पत्री.

तुमचा,

११ जानेवारी १९७५

*राजा*

■ □ ■

# ११.

***प्रिय पूज्य साने गुरुजी,***

मागच्या पत्रात धानोऱ्याचा आणि तिथं त्या वेळी असणाऱ्या डी. एस. देशमुखांचा उल्लेख केलाच आहे. अमळनेरला गेलो त्या वेळी श्री. पी. जी. कुलकर्णी सरांच्याबरोबर त्यांच्या घरी गेलो होतो. त्यांनी सांगितलेल्या काही आठवणी लिहिल्या. काही पुन्हा आठवल्या त्या लिहीत आहे.

देशमुख म्हणाले, ''१९३२ साली आडावदला गुरुजी आले होते.'' त्या वेळी तुम्ही तिथल्या व्यायामशाळेला भेट दिली होती. मुलांना, तरुणांना सांगितले, 'धीट बना, बलोपासना करा, राष्ट्रीय शाळा करा, शाळेवर राष्ट्रीय ध्वज लावा.' वगैरे.

तुमचे ते स्फूर्तिदायक भाषण ऐकून खरेच चमत्कार झाला! शाळेतल्या लहान लहान मुलांनी सोमवारच्या दिवशी, सोमवारी तिथला बाजार ना! तर बाजारातून तिरंगी झेंडा घेऊन 'महात्मा गांधी की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणा देत मिरवणूक काढली!

गाववाले आणि बाजाराला आलेले आजूबाजूच्या गावातील पंचक्रोशीतील गावकरी आश्चर्याने थक्कच झाले! गुरुजी, त्या वेळी गावकरी तसे का थक्क झाले याची कल्पना आजच्या मुलांना, तरुणांना येणार नाही. स्वातंत्र्य मिळून आता पाव शतक उलटून गेले आहे. स्वातंत्र्यापूर्वी पंधरा-सोळा वर्षे या घटनेला होऊन गेली. त्या काळात परकी सत्तेची केवढी जरब होती! तरीही तीस-बत्तीसच्या वेळी ती लोकांच्या मनांतून पुष्कळच कमी झाली होती. आणि त्याला कारण म्हणजे महात्मा गांधी! गांधीजींनी असहकारितेपासून स्वातंत्र्याची चळवळ गावागावातून, घराघरापर्यंत पोचवली. प्रौढ, वयस्कच नव्हे तर स्त्रिया आणि मुलेदेखील राष्ट्रसेवेसाठी बाहेर पडली. त्या काळातल्या प्रभातफेऱ्या आठवतात ना, गुरुजी! आणि ती गाणी!

*हे घन:श्याम श्रीराम मदात्मा राम।*
*इटलीहि सुखे हसविली-स्वातंत्र्ये*
*भू-जपानची नटविली-स्वातंत्र्ये*
*त्वां अमेरिका सुखविली-स्वातंत्र्ये*

*मग आम्हालाच का पारतंत्र्य-कर्दमी कोंडिले राम?*
*हे घनःश्याम श्रीराम मदात्मा राम॥*

आणि ते द्वंद्वगीतासारखे एकाने विचारायचे आणि दुसऱ्याने उत्तर द्यायचे असे हिंदी गाणे—

*नौजवानों!*
*हाँ भाई हाँ!*
*जेल चलोगे?*
*क्यों भाई क्यों?*
*एक चीज मिलेगी*
*क्या भाई क्या?*
*आजादी!*
*वाह भाई वाह, वाह भाई वाह!*

आणि ती लोकजागृतीसाठीची हाक—

*उठो, सोनेवालों, सवेरा हुवा है।*
*वतन के फकीरोंका फेरा हुआ है॥*

आणखी ते तकलीचे गाणे—

*अरे ही गांधीची तकली*
*इंग्लंडच्या बोकांडी बसली*

तुमचीदेखील गाणी तीस-बत्तीस पुढल्या दशकात तोंडोतोंडी झाली होती.

*वानर, वानर हुप् यारे*
*वानर वानर हुप्! हुप्!*
*महात्मा गांधी आले राम*
*त्यांचे करू चला काम*
*त्यांनी मारली आहे हाक*
*चला उठा लाख लाख*
*नका बसू गुपचूप॥*
*वानर वानर हुप् हुप् हुप्!*

या वानरसेनेच्या गाण्याप्रमाणेच तुमचे दुसरे गाणे—

*मुलांमुलींनी लढा अता चालवावा।*
*भारतमातेचा कलंक घालवावा॥*
*लाखो मुले उठतील*
*तेव्हा बंध तुटतील*
*हिंदभूमीचा गौरव वाढवावा॥*
*घरदार आता सोडा*
*अपुल्या स्वराज्याला जोडा*
*आपला पराक्रम दुनियेला दाखवावा॥*
*झेंडा खांद्यावर घ्या*
*मुखी मोक्ष-गीत गा*
*येथून तेथून हा देश सारा जागवावा।*

असेच स्फूर्तीदायक बोलला असाल, गायला असाल, होय ना! मग ती असोद्याची मुलं झेंडा घेऊन उठली नाही तरच नवल! त्या मुलांनी मिरवत, गरजत झेंडा शाळेवर पार पक्का लावून टाकला. अशी निर्भयता येऊ लागली होती.

दुसऱ्या दिवशी बातमी पोलिसांना कळली. पोलीस आले. चौकशी झाली; वगैरे. त्या वेळी डी. एस. देशमुखांचे चुलत आजोबाच सरपंच होते.

किनोदची एक आठवण त्यांनी सांगितली. तिथं गेलात तेव्हा तिथल्या पन्नालालशेठच्या घरात डुकराचे पिलू मेलेले आढळले. कुणी न्यायला तयार नव्हते की मुद्दाम कुणी टाकले होते, कुणासं ठाऊक! तुम्ही ते ओढून नेलेत म्हणे!

गुरुजी, धानोऱ्याच्या मोटार स्टँडजवळ आता धर्मशाळा आहे बरं का! तुम्हीच एकदा उन्हात तिथं तिष्ठत उभे होता. त्या वेळी तळपत्या उन्हात बसलेले लोक पाहून म्हणाला होतात, ''का रे, इथं हे लोक उन्हात बसले, पावसातही बसत असतील. कुणी धर्मशाळा नाही का बांधणार?''

गुरुजी, कशी कुणास ठाऊक पण तुमच्या अंतरीची करुणा कोणा मालाबाई नामक धनाढ्य स्त्रीच्या मनी पुढे उपजली आणि तिथे तिने धर्मशाळा बांधली! गावकऱ्यांनी विहीरही खोदली.

या गावात एकदा चार-पाच दिवस तुम्ही अज्ञातवासात काढले आहेत. सारखे घरात बसून लिहीत होतात; आठवते?

भालजी ब्रह्मे डोके खाज-खाजवून आठवायचा प्रयत्न करत होते, 'बरा होईन जरी मारणार नाही' या एका चरणाखेरीज त्यांना दुसरे चरण काही आठवत नव्हते. ते बी. टी.ला पुण्याला असताना तुमच्याकडे आले होते,

त्या वेळी तुम्हीही पुण्यातच होता. त्यांना पाठ घ्यायचा होता. आले तुमच्याकडे आणि कविता द्या म्हणाले, तुम्ही ती कविता करून त्यांना दिलीत 'बरा होईन जरी मारणार नाही' आणि गंमत म्हणजे गेल्या महिन्यात गोरेगावला अप्पांच्याकडे गेलो, त्या वेळी बोलता बोलता त्यांनी तुमची गाणी टिपून ठेवलेली एक वही सहज म्हणून दाखवली, तर तिच्यात हेच गाणे संपूर्ण मिळाले. अप्पा मला लिहून धाडून देणार आहेत.

गेलो त्या वेळी ते नुकतेच टायफॉइडमधून उठले होते. अशक्तपणा होताच. त्या दिवशी तुमच्या वहिनींनी आणि अप्पांनीही जेवूनच जाण्याचा आग्रह केला. मग जेवलो, आपल्याला काय! तिकडे गिरगावात मुकुंद तांबे आणि प्रभा तांबे यांनी एक-दीड वाजेपर्यंत वाट पाहिली आणि मग संध्याकाळी अन्नाबरोबरच बोलणीही खाल्ली हे निराळे!

शंकरशेट शिंपी यांनीही तुमच्या पुष्कळ आठवणी सांगितल्या. १९४२ साली धुळ्याहून सुटल्यावर तुम्ही भूमिगत झालात. मुंबईत दादरला शिवाजी पार्कजवळ 'लक्ष्मी सदन' मध्ये श्री. नागेश पिंगळे यांच्या खोलीवर आलात. त्या वेळची 'खानदेश अजून का पेटत नाही?' म्हणून ती तुमची अस्वस्थता वर्णन करत होते. गुरुजी, तुमचे नागेश पिंगळे बडोद्यालाच आहेत. त्यांच्या चित्रकलेबद्दल तुम्हाला फार कौतुक होते. तुमच्या 'पत्री' वगैरे पुस्तकांची मुखपृष्ठे त्यांच्या चित्रकारीने सजलेली आहेत. परवाच त्यांनी मला लिहिले आहे की, 'श्यामची आई' पुस्तकाचे मुखपृष्ठही त्यांनी त्या वेळी केले होते म्हणून. 'श्यामची आई' पुस्तकाचे तुम्ही दिलेले एक हस्तलिखित त्यांच्याकडे अजून आहे. त्यांनी तुमची दोन पत्रे मात्र नकलून माझ्याकडे धाडली आहेत. त्यातील एक १३-७-४८ रोजी तुम्ही मुंबईहून त्यांना बडोद्याला लिहिलेले आहे. आपल्या आप्तजनांची तुम्ही किती काळजी वाहात असा, याचे नवल वाटते. तुम्ही या पत्रात लिहिले आहे -

*'प्रिय नागेश,*

*सप्रेम प्रणाम,*

*तुला तेथे जागा मिळून तुझी व्यवस्था लागो ही प्रार्थना. ते संगीत प्रोफेसर आठवले, त्यांनाही कोठे जागा असली तरी द्या मिळवून म्हणून सांग. ते भेटतील. मला तेथील कोणाचे पत्ते माहीत नाहीत. श्री. ठकारांना सोबतचे पत्र दे. त्यांचा पत्ता मला माहीत नाही. प्रिय गजाननने त्यांना पत्र लिहिले असते तर अधिक बरे झाले असते. त्याचा निकट परिचय होता.*

*तू कोठेतरी स्थिर व्हावेस असे वाटते परंतु जीवन नदीप्रमाणे धावतेच असेल तर? ध्येयार्थी माणसाला एके ठिकाणी राहणे कठीण जाते हेही खरे.*

*कला भवनात कायम व्हायला हरकत नाही. तुझ्या गुणांचा सुगंध सर्वत्र पसरायला कदाचित वेळ लागेल. परिस्थिती सर्वत्र सदा अशीच. ज्यांना ज्यांना देवाची देणगी असते त्यांना सदैव मागेच पडावे लागते. कारण नीच उपायांचे, हांजी हांजी, लाचलुचपत यांचे ते कधी अवलंबन करीत नसतात. कोठेही राहा, आपल्या कलेचा विकास करीत राहा. एक दिवस उजाडेल, ज्या दिवशी तुझ्या गुणांचे चीज होईल. अधिक काय लिहू! प्रिय श्री. जोगळेकर तुझे मित्र यांस स. प्रणाम. मावशीसही.*

*तुझे,*
*गुरुजी*

आणखी शंकरशेटनी, त्रिपुरा काँग्रेसला तुम्ही गेला होता ना, त्या वेळची हकिकत सांगितली. म्हणाले, ''तिथे रात्री आम्ही गुरुजींच्याबरोबर झेंड्याच्या पायथ्याशीच झोपत असू.''

कोणी बरं हरिपुरा काँग्रेसला तुम्ही गेलात त्या वेळची हकिकत सांगितली होती हं, हिराभाई शहांनी. ते म्हणाले, ''हरिपुराला गुरुजींनी अमळनेर कॅम्पच काढला होता. सफाई वगैरे आम्ही करत असू.'' आणखी तुमच्याबरोबर आलेल्या एकाने सांगितले, त्याचे नाव आठवत नाही. आठवल्यावर कळवीन. तो म्हणाला, ''हरिपुराला काँग्रेसच्या अधिवेशनाच्या मंडपाजवळच एक हॉटेल होते. नास्ता, चहापाणी तिथंच चालायचं. गर्दी खूप असायची. त्याचा फायदा घेऊन काही जण पैसे न देताच सटकायचे. एकदा आमच्यापैकीही कुणीतरी असंच केलं. पण गुरुजींचं लक्ष होतं. त्यांनी त्याचे पैसे भरले. त्याला मागाहून हे कळले. पार शरमिंदा झाला.'' चालायचेच. जत्रेत, नवसे, हौसे, गवसे असायचेच!

१९४५ साली जेलमधून सुटल्यावर तुम्ही अमळनेरला गेला होतात; तेव्हा याच शंकरशेट शिंपींच्याकडे तुमची सगळी मित्रमंडळी सहकुटुंब जेवायला जमली होती. जिलेबीचे जेवण झाले. एका मोठ्या लढ्यानंतर तुम्ही सगळे एकमेकांना भेटत होता. तुमच्या मनात शतआठवणींचे आणि भावनांचे कल्लोळ उठले असतील, नाही! थांबतो.

तुमचा,
१ फेब्रुवारी १९७५ **राजा**

■ □ ■

# १२.

## *प्रिय पूज्य साने गुरुजी,*

बऱ्याच दिवसांनी पुन्हा तुम्हाला हे पत्र लिहीत आहे. अशी भेट झाली म्हणजे, तुम्ही हात हातात घेऊन असे काही हसत असा की तुमचे सारे वात्सल्य त्यातून झिरपून येत असे.

आचार्य अत्रे यांनी तुमच्या नि त्यांच्या पहिल्या भेटीचा नाट्यपूर्ण प्रसंग एका लेखात वर्णन केला आहे. आचार्य, तुम्ही जणू त्यांना ओळखता अशा भावनेनेच तुमच्याशी बोलत होते आणि तुम्ही गोंधळून जात होता. बऱ्याच वेळाने ही गोष्ट आचार्यांच्या लक्षात आली आणि त्यांनी हसून आपले नाव तुम्हाला सांगितले, तेव्हा तुमची जी गडबड उडाली ती वर्णन करताना आचार्य लिहितात, 'तेव्हा गुरुजींच्या चेहऱ्यावर ज्या भावना एकदम प्रकट झाल्या त्याचे वर्णन शब्दांनी करणं अशक्य आहे. आपल्या दोन्ही हातांनी त्यांनी माझे हात दाबून धरले आणि मान खाली वाकवून अन् सारे अंग घुसळून असे गंमतीदार ते हसले की, काही विचारू नका. एक शब्द न बोलता गुरुजींनी आपले अंत:करण एकदम मजपुढे उघडे केले. त्यात सगळा खुलासा अन् सगळी भरपाई झाली. संकोचाची अन् अनोळखीपणाची टरफले आपोआपच गळून खाली पडली. गुरुजींच्या भाबडेपणाचे आणि जिव्हाळ्याचे ते विलक्षण तेज बघून मी दिपलो, थिजलो, कोसळलो, अन् जिंकलो गेलो....'

तुम्हाला आठवते का गुरुजी ही भेट? बेचाळीसच्या आंदोलनाच्या वेळी भूमिगत असताना अच्युतरावांना भेटायला तुम्ही अत्रे यांच्या घरी गेला होतात. आठवले ना?

नानासाहेब गोरे यांनीही एके ठिकाणी लिहिले आहे. '.....आणि आईच्या हातासारख्या तुमच्या त्या खरबरीत व मऊ हातांनी माझा हात एक वेळ तरी पुन्हा दाबला जावा....'

तुमच्या त्या विशिष्ट हात दाबण्यात एक विलक्षण जादू होती. शक्ती होती. 'शब्देविण संवादिजे' अशी आगळी, अद्‌भुत, उदंड माया होती!

तर या भेटीतदेखील तुम्ही माझा हात असाच आपल्या हातात घेऊन हळुवार दाबला असतात आणि तुम्ही न विचारताच मला कळले असते की, 'कुठे होतास इतके दिवस?' अशी तुम्ही विचारपूस करीत आहात!

.....पण हे आता आपल्या हातचे राहिलेले नाही. जाऊ द्या...

आणि तरीही मी कसे घडले असते हे कल्पून, तुमचा प्रश्न लक्षात घेऊन सांगून टाकतो की, मी तसा आजारीबिजारी नव्हतो, की कुठं लांब गावालाही गेलो नव्हतो. इथंच होतो. घरात. आणि तुमच्या दाट सान्निध्यात! तुमच्याबरोबर लहानगा 'श्याम' बनलो आणि तुमच्या लहानपणी तुम्ही जे केले, अनुभवले ते मी पाहिले. तुमचा रुसवा-फुगवा, तुमचे हसणे-रागावणे, तुमचा ताप-संताप, तुमचे खेळणे-बागडणे, तुमचा द्वेष-मत्सर, तुमची श्रद्धा-भक्ती... किती तरी न्याहाळायला मिळाले. तुमच्याबरोबर तुमच्या पालगडातील पऱ्ह्यांचे गाणे ऐकत हिंडलो.... 'पऱ्ह्या' हा शब्दसुद्धा तुमच्याकडूनच मला प्रथम कळला होता बरं का! आम्हां देशावरच्या मुलांना 'पऱ्ह्या' ठाऊकच नसतो. ओढा, नाला, झरा ही आमच्या ओळखीची मंडळी. पण 'पऱ्ह्या' भेटला तुमच्या श्यामच्या आईतच. आमच्या देशावरच्या नाल्याचा हा कोकणी अवतार!

पऱ्ह्याच कशाला? 'खाचर', 'गोयला', 'तंवसे', 'पानगी', 'वरंड', 'फिटुकनळी', 'सुयरा', —असे किती तरी आम्हाला नवे नवे कोकणी शब्द श्यामच्या आईमध्येच प्रथम भेटले.

या कालावधीत तुमचे दाट सान्निध्य अनुभवले ते देखील 'श्यामची आई' आणि 'श्याम' खंड १ ते ३ या तुमच्या आत्मगत कहाणीमुळेच प्रामुख्याने. त्याशिवाय अमळनेरच्या शाळेत शिक्षक असताना तुम्ही जे 'छात्रालय दैनिक' रोज पहाटे लिहून काढीत असा ना, त्यावरूनही त्या काळात डोकावता आले. तुमच्या 'छात्रालय दैनिकाचे' काही अंक हाती आले आणि केवढे अप्रूप वाटले म्हणून सांगू! किती किती लिहिले आहे हो तुम्ही! शिस्त, संयम, अभ्यास, स्वच्छता, देशभक्ती, स्वदेशी असे अगणित विषय (गणितसुद्धा त्यात आहेच) तुम्ही हाताळले आहेतच, पण 'धोतर कसे धुवावे?' यावरही लेख लिहिला आहे. हसू येते माझ्यासारख्यास हे कबूल करतो पण हे तुम्हीच, केवळ तुम्हीच करू जाणे, हेही मान्य करतो. कारण हे असले लिहिण्यामागे जे वात्सल्य, आईचे मन असावें लागते ते कुणाजवळ होते आणि आहे?

खानदेशमधील फेरफटक्यासंबंधी मागच्या पत्रांमधून तुम्हाला मी लिहिले होते. तर अमळनेरला तुमचे बरेच सगेसोयरे भेटले. काहींची मुलाखत झाली

नाही. पण त्यांचे क्षेमकुशल कळले. अशांपैकी एक म्हणजे मुकुंद देवचंद न्हावी. सेवा दलाच्या सुभाष शाखेवरचा हा सैनिक. तुमच्या प्रोत्साहनाने लिहायला वाचायला शिकला. तुम्ही त्याला सांगत असायचात, 'आंघोळ करणे हा धर्म आहे' देवचंद रोज आंघोळ करून स्वच्छ राहू लागला. स्वच्छता, सेवा, सूतकताई आदींचे धडे तुम्ही अशा प्रकारे किती तरुणांना त्या वेळी दिले!

देवचंदचा उद्योगधंदा चांगला चालला आहे. त्याचा हात हलका आहे. त्यामुळे काही लोकांना हजामतीसाठी देवचंदच लागतो. तो गोडबोल्या आहे, निर्व्यसनी आहे. गावातील वकील, डॉक्टर्स अशा थोरामोठ्यांच्याकडे त्याचे जाणे-येणे, उठणे-बसणे आहे. तो म्हणतो, ''गुरुजींच्यामुळेच मला हे वळण मिळाले.'' त्याची मुलेही शिकलीसवरली आहेत.

अमळनेरच्या टाऊन हॉलमध्ये लायब्ररी आहे हे तुम्हाला ठाऊकच आहे. तिचे नामकरण आता 'साने गुरुजी वाचनालय' असे झालेले आहे. मी तिथे तुमच्यासंबंधी आणि तुमच्या आवडत्या गोष्टीसंबंधी बोललो. त्या वेळी तत्त्वज्ञान मंदिरातील तुमचे सहाध्यायी श्री. चिंगळे भेटले.

अमळनेरहून धरणगावला आलो. स्टेशनवर उतरलो आणि गलबलून गेलो. सुन्न झालो. पंचवीस वर्षांपूर्वी १० जूनला तुम्ही मुंबईहून धरणगावला येणार होता. भोई परिषद व शेतकरी परिषद मधू लिमये यांच्या अध्यक्षतेखाली होणार होती. तुम्ही उद्घाटक. तुम्हा दोघांची तिकिटेही काढलेली होती. पण धरणगावऐवजी तुम्ही परलोकीचेच प्रस्थान ठेवलेत. त्या तुमच्या अचानक जाण्याने आम्हां सर्वांनाच धक्का बसला! असे एकाएकी तुम्ही का गेलात?.... तुमच्या अशा अकस्मात जाण्याविषयी इकडे अनेकांनी अनेक प्रकारचे तर्कवितर्क लढवले. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेऊन कारणमीमांसा शोधली.... पण खरे तुमचे तुम्हालाच माहीत. का कंटाळलात आम्हांला? इतका का आम्ही त्रास दिला तुम्हाला?....

धरणगावला स्टेशनबाहेर आलो. बरोबरचे साथी सांगत होते, ''हे सारं आवार शेतकऱ्यांनी फुलून गेलं होतं नुसतं. गुरुजींच्या स्वागतासाठी हजारो शेतकरी खेड्यापाड्यांतून आलेले होते. ५१ बैलजोड्यांचा रथ मिरवणुकीसाठी सजवलेला होता. गाडी आली. गुरुजींच्या जयजयकाराच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेले. पण गाडीतून गुरुजींच्याऐवजी विनायकराव कुलकर्णीच उतरले. मधु लिमयांनीच त्यांना धाडले होते. गुरुजींची प्रकृती बिघडली असून त्यांना इस्पितळात ठेवले आहे असा निरोप त्यांनी बी. डी. पवारांना सांगितला. ते

स्वागताध्यक्ष होते.''

गुरुजी, तुम्ही आला नाहीत आणि तुम्ही आजारी आहात ही वार्ता ऐकून तिथे जमलेल्या हजारो शेतकऱ्यांची निराशा झाली आणि काळजीचे वातावरणही निर्माण झाले 'तुम्ही नाही तर परिषद नाही', असा निर्णय झाला आणि सजवलेल्या स्थानी तुमचे छायाचित्र ठेवून मिरवणूक काढण्यात आली. ही १० जूनची गोष्ट. आणि ११ जूनला तर.....

बी. डी. पवार, पंढरीनाथ पाटील आदी कार्यकर्ते बरोबरच होते. बी. डी. पवार आठवतो ना! त्याची पत्नी वारली तेव्हा तुम्ही तुमच्या 'कर्तव्य' दैनिकातून त्याचे सांत्वन केले होते आणि लिहिले होते, 'तुझे लग्न आता समाजवादी पक्षाशीच लागलेले आहे. लोकशाही समाजवादाला वाहून घे.'

हे सांगताना पवार गलबलून गेला होता. त्याने तुमचा उपदेश पाळला आहे. पवार सांगत होता, गुरुजींना मेहरूणची बोरं फार आवडायची म्हणून. मुंबईला आला म्हणजे आठवणीने घेऊन यायचा ना! मग तुम्ही मेघाभुवनातील तुमच्या मित्रांना तो खानदेशी मेवा लुटून देत होता. ती बोरे खाताना खानदेशातल्या किती तरी आंबट-गोड आठवणी निघत असत. किती जणांची विचारपूस तुम्ही अगदी बारकाईने करायचात. नावनिशीवार, गावशिवेसह. कसे अद्भुत स्मरण तुमचे! विनोबांचेही असेच! ते एकदा म्हणाले, ''मला दहा हजार कार्यकर्त्यांचे नावागावांसह स्मरण आहे. ते कितीही लांब असले तरी मी त्यांना नित्य स्मरणाने भेटत असतो.''

धरणगावात एका पटांगणाला तुमचेच नाव दिलेले आहे, 'साने पटांगण' म्हणतात. १९४६ सालातील निवडणूक प्रचारासाठी तुम्ही येथे आला होता. त्या वेळी याच पटांगणावर तुमचे भाषण झाले होते. संघाच्या मंडळींनी गोंधळ घातला होता. आठवते का? तेव्हापासूनच 'साने पटांगण' हे नाव पडले.

पोकर्णा नावाचे तुमचे अमळनेर हायस्कूलमधील एक विद्यार्थीही भेटले. त्यांनीही पुष्कळ आठवणी सांगितल्या तुमच्या. एकदा प्रतापशेठच्या दारात लाचारीने बसलेले भिकारी तुम्हाला दिसले तर तुम्ही कळवळून गेलात. बाजारात जाऊन मिठाई आणलीत आणि त्यांना वाटून दिलीत!

धरणगावहून एरंडोलकडे गेलो. एरंडोलवर तुमचा लोभ होता; तसा सगळ्या खानदेशवरच पण त्यातल्यात्यात म्हणतात तसे. नारायण माहेश्वरी, मानुधने, गजराज गोपाळ, शंकर तिलोकचंद बिर्ला आदी भेटले. सगळेच आता वयस्क.

१९४५ साली एरंडोलच्या नगरपालिकेने तुम्हाला मानपत्र दिले होते. त्या

वेळी तुम्ही केलेल्या भाषणात म्हणाला होतात, 'गावची सफाई करणारा मंत्री बी. एस्सी. पाहिजे. विज्ञानाचा पदवीधर पाहिजे. त्याशिवाय सफाईचे काम चांगले होणार नाही.'

चाळीसगावला तर तुमचे पुष्कळच आप्तजन भेटले. एकाच ठिकाणी. तुमचा जगन्नाथ वाणी, भागवत गुरुजी, राम शिरोडे आदी मित्रांनी काय केले होते, मी येणार म्हणून आजूबाजूला खेड्यांतूनही कळवले होते. त्यामुळे साठ-सत्तर जण तातडीनेच आल्यासारखे आले होते. नगरपालिकेच्या सभागृहात आम्ही भेटलो. बसलो, बोललो. त्यांत राजाराम पाटील होते, मोतीराम सूर्यवंशी, जनार्दन सोनार, भा. य. देशपांडे, सोनू नागू चौधरी, अर्जुन झिपरू पाटील, सुभानभाई खाटिक, देवराम पाटील, रामसिंग घोरपडे इत्यादी होते. अनेकांनी तुमच्याविषयी सांगितले. सांगताना तुमच्या आठवणीने गहिवरत होते. डोळे पाणावत, कंठ भरून येई... गुरुजी, पंचवीस वर्षे झाली तुम्हाला जाऊन, पण अद्यापही या मंडळींच्या हृदयात जसेच्या तसे आहात!

वाघडूचे सखारामभाऊ पाटील होतेच. १९४२ साली भूमिगत असताना त्यांच्याच घरी तुम्ही गुप्त बैठक घेतली होती. तिथेच लष्करी सामानाची गाडी पाडण्याचा बेत ठरला.

चाळीसगावला श्री. रतन वाघही भेटले. त्यांनी आपले सलून हरिजन बांधवांसाठी सत्तेचाळीस सालीच खुले केले. तुमच्याच प्रेरणेने! तुम्ही पंढरपूरच्या विठ्ठलाची दारे हरिजनांना उघडावीत म्हणून प्राण पणाला लावले होते. तुमची वेदना रतन वाघांना कळली. त्या काळात त्यांचे ते कृत्य म्हणजे धैर्यच! तुम्ही त्यांना धाडलेली ती पत्रे त्यांनी केवढ्या जिव्हाळ्याने आणि पावित्र्याने जपून ठेवली होती! मला ती त्यांनी दिली. त्यांच्या धैर्याबद्दल एका पत्रात तुम्ही त्यांचे अभिनंदन केले आहे, आणि 'कर्तनालय चालते का? तेथे हॉटेलात सारे जातात का?' अशी चौकशीही केली आहे.

चाळीसगावला स्टेशनच्या पलीकडे श्री. के. के. मूस राहतात, तुम्हाला माहीतच आहे. तुम्ही एकदा चाळीसगावला आला होता त्या वेळी त्यांच्या या निवासस्थानीच असलेल्या स्टुडिओत जाऊन तुम्ही त्यांना फोटोला पोज दिली होती. तुमचे दोन झकास फोटो त्यांनी मला दिले. तुमचे व्यक्तिमत्त्व तुमच्या अन्य फोटोंत या फोटोंइतके उतरलेले नाही, असे आपले मला वाटते. तुम्ही तुमच्या फोटोवर स्वाक्षरीसह संदेशही दिलेला आहे. हा फोटो त्यांच्या स्टुडिओत लावलेला आहे. आणखी किती तरी साहित्यिकांची छायाचित्रे मूस

यांनी काढून लावली आहेत. चाळीसगावला व्याख्यान वगैरे निमित्ताने येणाऱ्या साहित्यिक, विचारवंतांची छायाचित्रे, त्यांना आपल्या स्टुडिओत निमंत्रित करून घेण्याचा त्यांना छंदच आहे. त्या त्या व्यक्तीची स्वाक्षरी आणि संदेशही.

पण विनोबा काही, स्टेशनवर थांबूनही, त्यांच्या स्टुडिओत गेले नाहीत आणि ते स्टुडिओत आले नाहीत, म्हणून मूसही कॅमेरा घेऊन स्टेशनकडे फिरकले नाहीत. त्यामुळे विनोबांचे छायाचित्र घ्यायचे राहूनच गेले. दोघेही मनस्वीच!

श्री. मूस हे खरेच मनस्वी कलावंत आहेत. त्यांनी काढलेल्या छायाचित्रांप्रमाणेच त्यांनी रेखलेली पेंटिंग्जही मोठी सुंदर, कलापूर्ण आहेत. त्यांच्या अनेक चित्रकृतींना आंतरराष्ट्रीय सन्मान लाभलेला आहे.

चोपडे, शिरपूर, धुळे येथेही जाऊन आलो. शिरपूरला उत्तमराव भेटले. ब. ग. कुलकर्णीही भेटले. सगळे ठीक आहेत.

तुमचा,

२५ मार्च १९७५ *राजा*

■ □ ■

# १३.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

परवा तुमच्या काही डायऱ्या की वासऱ्या?.... मी चाळीत होतो. पिवळट, धुरकट झालेल्या पानापानांतून कुबट, जीर्ण वास येत होता. नाक चुरचुरत होते. त्या तीव्र गंधाने चार-सहा शिंकाही आल्या पण पानन् पान सोडवीत न्याहाळले. वाचले.

तसे काहीच तुम्ही या डायऱ्यांमधून लिहिलेले नाही म्हणजे- 'डायरी लिहिणे' या अर्थाने. का बरं? कदाचित तुम्हाला वेळ मिळाला नसेल! किंवा तुम्ही इतके लिहितच होता अहोरात्र की आणखी वेगळी डायरी ती काय लिहायची, असेही वाटले असेल. अन्य जनांना दुसरे काहीच लिहायचे नसते म्हणून कोणी कोणी डायरी तरी लिहीत असतील! 'दिसामाजी काही तरी ते लिहावे'.... अर्थात दैनंदिनी लिहिण्यातले महत्त्व मी नाकारीत नाही. मी स्वत:ही बऱ्याच नियमाने डायरी लिहितो. भाऊसाहेब रानडे यांच्या तत्कालीन आरडाओरडीने बेशिस्तीला चुकूनमाकून लागलेली ही काहीशी शिस्त. पण काही लोक मात्र खरंच छान लिहितात हं डायरी. किती तरी थोरामोठ्यांच्या जीवनावर त्यांनी लिहिलेल्या डायऱ्यांनी केवढा तरी प्रकाश टाकलेला आहे, नाही? तुमचा आवडता महर्षी टॉलस्टॉय याची डायरी वाङ्मयीन मूल्यांनी सजलेली आहेच आहे पण त्याचे व्यक्तिगत जीवनही कसे उलगडून समोर येते!

आपले नानासाहेब गोरे यांचे 'कारागृहाच्या भिंती' हे पुस्तक आठवते तुम्हाला? निझामी राजवटीतल्या गुलबर्ग्याच्या तुरुंगात लिहिलेली नानासाहेबांची ही डायरीदेखील किती सुंदर आहे, नाही! अशी आणखी काही माणसे सांगता येतील. पण चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवे पंचांग आणण्याच्या उत्साहानेच प्रतिवर्षीच्या १ जानेवारीला डायरी विकत घेऊन ती नियमाने मान मोडून लिहिलेल्या अनेकांच्या डायऱ्या म्हणजे निव्वळ खतावण्याच असतात. पै-पाव आण्याचा हिशेब कसा व्यवस्थित लिहिलेला. आपल्याला नाही बुवा हे जमत.

*खावे द्यावे घ्यावे। जमाखर्च तुझ्या नावे॥*
*आता चुकली खटपट। झाडापाड्याचा बोभाट॥*
*तुका म्हणे चिंताभार। वाहे तुझा माथा॥*

तर तुम्ही या काही डायऱ्यांचा उपयोग टाचणे-टिपणे करण्यासाठीच केलेला आहे. त्यात कार्यकर्त्यांचे पत्ते आहेत, लेखन-संकल्प आहेत, दौऱ्यांची योजना आहे. साधनेची रुपरेखा व खर्चाची आकडेमोडही आहे.... त्यातच एका १९४९ सालच्या डायरीत चक्क माझेही नाव आहे एका यादीत. नावापुढे आकडा आहे २५-०० रुपयांचा आणि खाली लिहिले आहे, हॉटेलमधील. हे वाचून एक मित्र म्हणाला, ''म्हणजे तू गुरुजींकडून हॉटेलिंग करायला पैसे घेत होतास की काय? आणि पंचवीस रुपये परत दिलेस गुरुजींना तर खाल्लेस कितीचे रे?''

मला हसूच फुटले. हसू नको तर काय करू? अहो 'हॉटेलमधील' या तुमच्या शब्दांनी कसा बरोबर उलटा अर्थ घेतला त्या माझ्या दोस्ताने! मग मी त्याला वस्तुस्थिती सांगितली.

गुरुजी, तुम्ही जेव्हा 'साधना' मुंबईत सुरू केली, तेव्हा साधनेसाठी तुमची धडपडणारी मुलं, चाहते, साथी ठिकठिकाणाहून शक्तीनुसार मदत धाडीत होते. मी त्या वेळी पंढरीत होतो. बेकार होतो. गुरुजींच्या साधनेला मदत धाडलीच पाहिजे अशी बोचणी लागून राहिली होती. तेवढ्यात आषाढी आली!

*आषाढी कार्तिकी भक्तजन येती।*
*चंद्रभागेमाजी स्नाने जे करिती॥*
*दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती।...*

पंढरीच्या माणसाला आषाढी-कार्तिकी म्हणजे पर्वणीच! सुगीचे दिवस! पंढरपूरसारख्या क्षेत्रातील लोकजीवन हे अन्य ग्रामांपेक्षा किंवा शहरांपेक्षा वेगळेच असते. इथं वारी म्हणजेच सर्वस्व. आर्थिक उलाढालीचा केंद्रबिंदूच! म्हणून पंढरपूर वारीत हालते, डोलते, बोलते, पळते पण वारी संपली रे संपली की, निवांत ढिम्म बनते. पुढल्या वारीपर्यंत. सारा हिशेबठिशेब, वायदे, सौदे वारीला धरून. घरभाडे, किराणावाला, कापडचोपड, सगळ्यांचे वायदे वारीला. महिन्याची पहिली तारीख पंढरीला माहितीच नाही जणू! त्यामुळे पुढल्या महिन्याचा पगार झाला की, मागची बाकी चुकती करायची दगदग पंढरीच्या निवांत जीवनाला

मानवतच नाही. आखाडी हे आषाढीचे खास तिकडले नाव, चैत्रातल्या वारीला चैती आणि माघातलीला म्हाई ही अशीच आणखी त्या परिसरात रूढ असलेली नावे. तर चैतीचे वायदे आखाडी झाल्यावर पूरे व्हायचे आणि आखाडी जर घसरली, म्हणजे वारी नीट भरली नाही तर हे वायदे कार्तिकीपर्यंत पुढे ढकलले जातात, आणि गंमत अशी की, वारी कितीही जोरात होवो, देणेकऱ्याच्या हिशेबी ती घसरलेलीच असते!

तर असे मजेशीर, वेगळे जीवन आहे तिथले. मी सांगत होतो, आषाढी जवळ आली होती. वारीचे वारे गावातून वाहू लागले होते. व्यापारी निवांतपणा सोडून आपापली दुकाने झाडूझटकू लागले होते. मला अचानक सणक आली. मनाशी म्हटले, 'आपण वाळवंटात हॉटेल काढले साधनेच्या मदतीसाठी तर?'.... आणि सार्थीसह हॉटेल काढले. नेमका पाऊस कोसळला. पाणीच पाणी झाले. तरी चिखलात कसेबसे दोन दिवस चहा करून विकला. त्यातून पंचवीस रुपये नफा उरला. तो तुमच्याकडे धाडून दिला होता. त्याचे टिपण गवसले. त्यावरून पंचवीस-सव्वीस वर्षांमागची ही गोष्ट आठवली. गंमत वाटली. गुरुजी, आठवते हे तुम्हाला?

एका डायरीच्या अगदी मागे, स्मरणार्थ टिपण असा मथळा छापलेल्या पानावर तुम्ही एक पत्ता लिहिलेला आहे.

नाथ पै 43, Glenloch Road,
N. W. 3, London
United Kingdom.

पत्ता वाचला नि गलबलून गेलो. गुरुजी, तुमचा प्रिय नाथही आता आमच्यात नाही, तो तिकडे तुमच्याकडेच आलेला आहे. खरंच गुरुजी, तिकडे कसं काय आहे हो? इकडून गेलेली माणसं तिकडं एकमेकांना भेटतात? बोलतात? नाथ तुम्हाला भेटला? आणि आपले रावसाहेब, आचार्य भागवत, आवाबेन, कसं कळणार? स्वप्नात येऊन सांगता येतं म्हणे! सांगाल?....

नाथची कर्तबगारी पाहायला तुम्ही इथं नव्हता. तारुण्यात, अल्पावधीत केवढी भलाई कमावली त्याने! त्याचा झपाटा विलक्षणच! पण त्यातही किती लोभसपणा! त्याचे व्यक्तिमत्त्व जसे लोभस, तसेच त्याचे वक्तृत्वही! 'वक्ता दशसहस्त्रेषू' म्हणतात ना, तशा कोटीतलाच हा आणि 'मित्राय नमः' असा आदरणीय जगन्मित्र! कोणीसं म्हटलं आहे त्याला, 'समाजवादाचा राजदूत'

किती यथार्थ! भारताची लोकसभा अनेक वेळा नाथनं आपल्या चमकदार, अभ्यासपूर्ण वक्तृत्वानं उजळून टाकली होती. त्याच्यासारखा संसदपटू विरळा, आणि गोरगरिबांविषयीची त्याची कणव, गुरुजी, तुमच्याच जातीची, नाही तरी तुमच्याच गोत्राचा होता तो. तुमचीच प्रेरणा घेऊन, तुमचाच धडपडणारा मुलगा म्हणवून घेण्यात त्याला अभिमान वाटत असे. गांधीवधानंतर तुम्ही आणि सेनापतींनी उपोषण आरंभिले होते. नाथ त्या वेळी लंडनमध्येच होता. गांधीजींच्या वधानं तो आधीच व्याकुळ बनला होता, त्यात तुमचे उपोषण. तो चिंतामग्न बनला. एका मित्राला त्याने इकडे लिहिले, 'गुरुजी आणि सेनापती यांनी काय योजलेय बरे? देशातील हे सारे दीप मालवल्यावर आम्ही आमचा मार्ग कसा आखायचा?'

गुरुजी, तुमच्याप्रमाणेच मृत्यूशीही त्याने मोठ्या धिटाईने आयुष्यभर लडिवाळपणा केला. मरणाच्या खांद्यावर दोस्तीचा हात ठेवूनच तो वागला. हृदयविकार असतानाही त्याने कधी स्वतःला जपले नाही. घेतला वसा कधी टाकला नाही, त्यासाठी स्वतःला झोकून देणे कधी थांबवले नाही.

At my ear
I always hear
Times' winged chariot
Drawing near

मृत्यूच्या रथचक्राची चाहूल त्याला कधीचीच लागली होती. पण मृत्यूचे सतत, अव्याहत मिळणारे आव्हान झिडकारणे हाच जगण्याचा एकमेव मार्ग म्हणून नाथने स्वीकारला.

गुरुजी, मृत्यूशी सलगी करण्याची तुम्हा दोघांची धिटाई विलक्षणच. पण तुम्ही मृत्यूला निमंत्रिले, नाथने झिडकारले! तुमच्या मृत्यूच्या सलगीत फरक होता तो मात्र असा.

१९३९ सालच्या एका डायरीत हिंदीचा अभ्यासही थोडा आढळला. त्या वेळी तुम्ही हिंदीचे धडे घेत होता असे दिसते. मी तुम्हाला हिंदी बोलताना कधी ऐकले नाही. आपले एसेम किती ढंगदार हिंदी बोलतात, नाही! आणि उर्दूही तसेच सफाईदार. भाषा नुसती कळूनसवरून भागत नाही; तिच्या ढंगासह ती बोलता यायला हवी, नाही का? काही लोकांना निरनिराळ्या भाषा शिकणे कसे चटकन जमते. मला मुळीच जमत नाही.

काही डायऱ्यांमधून तुमच्या कितीतरी काव्यपंक्ती पानापानांवर आढळतात.

१९३९ च्या डायरीत किती तरी ओव्या तुम्ही टिपलेल्या आहेत,

*रायगडच्या किल्ल्यावरी सोनियाचा वरवंटा*
*शिवाजी मराठा राज्य करी॥ १॥*
*रायगडच्या किल्ल्यावरी सोनियाचा ग पाळणा*
*शिवाजीचा बाळ तान्हा राजाराम॥ २॥*
*शिवाजी शिवाजी ऐकून शत्रू धूम ठोकी*
*शिवाजीमहाराजांची सत्कीर्ती गावी लोकी॥ ३॥*

'ऐतिहासिक व देशाच्या' अशा मथळ्याखाली या ओव्या आहेत. त्या वेळी मायबहिणींकडून हा ठेवा तुम्ही मिळवला आणि अवघ्यांना दिला.

तुमचे हे ओव्या जमवण्याचे त्या वेळचे वेड माय-बहिणींना ठाऊक झालेच होते. तर त्याविषयीची एक आठवण दापोलीचे आपले 'ब्राह्मण चांभार' बाबा फाटक यांनी मला तिकडे गेलो असताना सांगितली. पालगडला गणपतीच्या देवळात एकदा तुम्ही गीतेवर प्रवचने दिली होती. समाप्तीच्या दिवशी एका वृद्ध आजीने ओवी म्हणून तुमचे कौतुक केले.

*पालगडच्या गणपतीला बेदाण्याचा केला शिरा*
*काँग्रेसमध्ये शोभे हिरा पंढरीनाथ।*

एका पानावर तर भूपाळी लिहिलेली आहे तुम्ही :

*उठा उठा रे विजयवीर हा भास्कर ये उद्भट*
*प्रतापी भास्कर ये उद्भट।*
*प्रभा दिगंती पसरी पाडी गाढ तमाचे तट॥*
*उठूं बाळगोपाळ सकलही प्रभात ये भारती*
*मोक्षदेवता येईल लौकर तिला दावूं आरती*
*प्रभात होता अनंत सुमने निजहृदयें उघडिती*
*निर्मळे निजहृदयें उघडिती।*
*स्वीयविकासे परमेशाला परममुदे पूजिती॥*

जुन्या वळणाचे तुमचे हे कवित्व आज मजेशीर वाटते. संस्कृतप्रचुर पंडिती वळण तुमच्या बऱ्याच कवित्वात आढळते. तुमचे गद्य मात्र खूपच मोकळे झाले

३७१६ २३।२।९९
बा.वा.

होते, नाही!

गुरुजी, तुमच्या एका डायरीत तर आणखीनच आल्हाददायक खजिना हाती लागला आहे. पण तो उघडा करीन पुढल्या पत्रात.

आमच्या शुभाने केलेल्या गुलाबाच्या कलमावर एका फांदीवर गेंदेदार पिवळा गुलाब फुलला आहे तर दुसऱ्या फांदीवर जांभळा. किती सुंदर!

तुमचा,

१० एप्रिल १९७५ *राजा*

■□■

# १४.

*प्रिय पूज्य साने गुरुजी,*

मागच्या पत्रात मी तुमच्या एका डायरीत गवसलेल्या आल्हाददायक खजिन्याचा उल्लेख केलेला आहे. खजिना आहे, तुम्ही लिहिलेल्या काही बालगीतांचा. ही काही बालगीते वाचली आणि गंमत वाटली. आनंदही झाला.

मी तुमच्या गोष्टी वाचल्या, ऐकल्या. पण राहून राहून वाटत होते, गुरुजींनी आपल्या लहानग्यांसाठी का नाही बरं खूप खूप गाणी लिहिली!

तुमच्या 'पत्री' काव्यसंग्रहात प्रामुख्याने देव आणि देश यांच्या भक्तीपर अशाच कविता आहेत. त्यात एखादी 'लहानपणची आठवण' सांगणारी चिमणीच्या पिलावरची अत्यंत हृदयंगम अशी कविता जशी आढळते तशीच 'हस रे माझ्या मुला' सारखी अत्यंत सुंदर कविताही आढळते.

*चिमणी येऊन*
*नाचून बागडून*
*काय म्हणे मला*
*चिव चिव करीन*
*चिंता हरीन*
*हस रे माझ्या मुला....*

चिमणी तर तुमची आवडती! लहानपणी रामच्या वहीत त्याचा श्याम चिमणीचेच चित्र काढीत असे, होय ना? श्यामने म्हटलेच आहे, 'चिवचिव करणारी चिमुकली चिमणी मला फार आवडत असे. चिमणी हे नाव मला फार आवडते. मला अजूनही चिमण्यांकडे बघत राहावे असे वाटते. चिमण्यांकडे कधी कधी घटका घटका मी पाहत राहिलो आहे.... अशी ही माझ्या जीवनात येऊन बसलेली चिमणी, माझ्या जीवनात संगीत व आनंद आणणारी ही चिमणी, तिचे चित्र मी रामच्या वहीत काढीत असे. शिक्षक तिकडे शिकवित असत परंतु मी माझ्या हृदयातील चिमणी तेथे चितारीत असे. मी साध्या चिमणीचे

चित्र काढीत नसे, तर पिलांसाठी चोचीत चारा घेऊन जाणारी मायाळू चिमणी मी काढीत असे...' आठवते ना गुरुजी हे?

तर चिमणी ही तुमच्या प्रेमळ, वत्सल, मातृहृदयी भावनांचे प्रतिकच होती. चिमणीचे सारे लक्ष आपल्या पिलांकडे असते. तुम्हीदेखील चिमणीच्याच मायेने व ममतेने मुलांवर प्रेम केले. नानासाहेब गोरे यांनी तुम्हाला 'बालवाडीचा माळी' म्हटले आहे! नानासाहेबांनीही तुमच्याप्रमाणेच आपल्या शुभाला कशी छान छान पत्रे लिहिली. तुम्ही इकडून गेल्यावर तुमच्या सुधालाही त्यांनी किती हृदयस्पर्शी पत्र लिहिले होते! शुभाच्या एका पत्रात तुमच्यासंबंधी नानासाहेबांनी लिहिले आहे, 'गुरुजींच्या तोंडावरचे हसू हे मुलाला पोटाशी घेऊन आनंदाने ऊर भरून आलेल्या मातेचेच हसू आहे. तसेच ऊबदार, तसेच निष्कपट, तसेच सात्विक. गुरुजींच्या विचारात व आचारात, बोलण्यात व लिहिण्यात हा मातृभाव ओतप्रोत भरलेला होता आणि त्या भावनेच्या द्वाराच ते सर्वांशी मैत्री साधित. नाशिक तुरुंगात मला ते एकदा म्हणाले होते की, 'मी मित्र जोडतो ते तुमच्यासारखा वादविवाद करून नव्हे. माझे मार्ग निराळे. मी पटकन जाऊन डोळे धरीन किंवा तो आजारी असला तर त्याचे पाय चेपीन. स्वयंपाकघरात जाऊन कोशिंबीर करू लागेन किंवा ताटे-वाट्या मांडू लागेन. मी माणसांच्या डोक्यात नाही रिघत, त्यांच्या मनात रिघतो!' महाराष्ट्रातल्या हजारो, लाखो मुलांची आईची भूक गुरुजींनी भागावली.''

गुरुजी, तुमचे मोठेपण अनेक प्रकारे सांगता येईल. पण मुलात मूल होऊन जाण्याची जी किमया तुम्हाला साधली होती, त्यासाठी जी साधना तुम्ही केली असेल ती खरोखरच अपूर्व होती! सर्व तऱ्हेच्या प्रौढपणातही मनाचे बाल्य जपणे ही मोठी गोष्ट आहे. ती तुमचा सहजभाव झाली होती. यात तुमचे श्रेष्ठत्व आहे! तुम्ही मुलांना गोष्टी सांगत असा. तुमच्या तोंडून गोष्टी ऐकणे हादेखील केवढा आनंदाचा आगळावेगळा अनुभव होता! कधी कधी तुम्ही मुलांमध्ये बसून एक गाणेही म्हणायचे,

*आम्ही सारी लहान मुले।*
*जैशी ताजी सुंदर फुले॥*
*जैसे किरण तेजाळ*
*होऊ देवाचे लडिवाळ*

तर तुमची दुर्मिळ असलेली बालगाणीही त्या एका डायरीत मिळाली. चांगली दहा-बारा तरी आहेत. त्यात पावसावरचे गाणे आहे, चांदणीवरचे आहे, नाल्यावरचे आहे, फुलांवरचे आहे, शाळेवरचे आहे आणि पाणी तापवण्याच्या बंबावरदेखील आहे! गुरुजी, तुमची ही बालगाणी त्या काळात रूढ असलेल्या बालगाण्यांसारखीच आहेत. आजच्या बालगीतांहून किंवा बडबडगीतांहून ती अर्थातच वेगळी आहेत. 'अगडबंब! दोंदिलपोट्या हा बंब!' हे पाण्याच्या बंबाचे तुम्ही केलेले वर्णन मात्र गंमतशीर आहे. बंबाला तुम्ही पुढे चक्क 'शुंभ' म्हटले आहे! हे वाचून हसू फुटल्याशिवाय राहत नाही. 'पाण्याचा बंब' नामक आठवतंय का हे गाणं? नाही तर हे पाहाच,

*अगडबंब!*
*दोंदिलपोट्या हा बंब॥*
*गरम घालतो आतून बंडी*
*बाहेरिल ना लागे थंडी*
*थंड जळाला उकळी फोडी, न विलंब॥ दोंदिलपोट्या॥*

*खाइ निखारे हा रसरशित*
*घटघट वरूनी पाणी पीत*
*कढत अशी मग धार सोडित, हा शुंभ॥ दोंदिलपोट्या॥*

*सारे काही याला पचते*
*तक्रार कधी याची नसते*
*राखी थोड्या राखेते, जणु शिवसांब॥ दोंदिलपोट्या॥*

*जरि तापट हा कधि न रागवे*
*गरम तयाचे पाणी घ्यावे*
*थंड तयाला आपण द्यावे, शिर-लंब॥ दोंदिलपोट्या॥*

तसंच हे दुसरं 'समुद्र आणि चंद्र' नावाचं गाणं:

*आकाशी वर शशी फुले।*
*सागर खाली उचंबळे॥*
*प्रचंड लाटा पाहा तरी*

धावत येती किती तरी
गणिती आला जरि मोठा
शकेल मोजू ना लाटा
नाचत नाचत धावत खेळत
येती गर्जत फेसांची उधळीत फुले॥
समुद्र अन् या चंद्राचे
काय बरे नाते साचे
इंदु जन्मला सिंधुतुनी
गोष्ट सांगती अशी जुनी
बघून शशिमुख म्हणून अतिसुख
करीत कवतुक सागर खाली उचंबळे॥

'चांदणी' वर लिहिलेले हे गाणे पाहा:

चमक चमक तू चमक चांदणी।
चमकशि रात्री सतत गगनी॥
कोटयवधी तू कोस सुदूर
तरिहि तेज तव ये पृथ्वीवर
घडवि कसा तुज तो परमेश्वर
येईल कधिहि न आम्हां समजुनी॥

मी भूवरुनी तुजला पाहीन
जाईन हृदयी आनंदून
सतेज निर्मळ सुंदर जीवन
करीन तुजसम निशिदिन झटुनी॥

रवि मावळता हळूच येशी
गाजावाजा मुळी न करशी
प्रकाश आपुला जगासि देशी
परार्थ जीवन परार्थ करणी॥

निशा संपुनी उद्या उजळता
दिनमणि येता पर्वतमाथा

काम न उरले आपले आता
समजून जाशी निमूट निघूनी॥

आणखी 'वारा' नावाचे तुम्ही लिहिलेले हे बालगीत आठवतंय का पाहा:

राहतोसी तू सांग कुठे वाऱ्या
कुठे रात्रंदिन मारिशी भराऱ्या।
तुझे आम्हा दिसले न जरी रूप
दिसे रात्रंदिन हालचाल खूप॥

वाहतोसी तू कधी मंद मंद
आणितोसी तू सवे पुष्पगंध।
कधी शीतल सुखदायी गोड येशी
कधी अंगाला परी झोंबतोशी॥

कधी डोलविशी वृक्षलता वेली
फुले फुलविशी करिशी खेळिमेळी।
हळूच पाण्याला करत गुदगुल्यांना
तरल उठविशी गोड तरंगांना॥

परि प्रेमळ तव वृत्ति कधी लोपे
सकल सृष्टीवर चित्त तुझे कोपे।
गंमत होता हळुवार तुझा हात
परि अनुभव विपरीत असा येत॥

करित घों घों येतोस आता वाऱ्या
भीति उपजे जगतास पाहा साऱ्या
मोडतोडीमधि मोद तुला वाटे
उठति लोकांच्या तनूवरी काटे॥

सपासप आता मारिशी तडाखे
सकळ दुनिया भयभीत मनी धाके।
धडाधड आता पाडितोसि झाडे
दणादण अमुची हाणिशी कवाडे॥

*पर्वतापरि उठवून चंड लाटा*
*करिसि करणी तू भीषणा अचाटा*
*कितिक बोटींते कितिक तारवांते*
*क्षणी नेशी तू अब्धिच्या तळाते॥*

*ताप देशी कधि बनून नारसिंह*
*कधी मंगल तू मधुर सौख्यवाह*
*कधी आणुन जलदांस वृष्टि देशी*
*कधी त्यांना तू नाहिसेच करिशी॥*

*तुझ्या वर्णाव्या सांग किती लीला*
*स्वैर चंचल तू बंधन ना तुला।*
*कसे सांभाळित तुला मायबाप*
*देत असशिल तू त्यांस फार ताप॥*

आणखीही काही आहेत, संवादात्मकसुद्धा. पण इथं देत नाही. तुमची ही बालगाणी तुमच्या अन्य अप्रसिद्ध साहित्याप्रमाणेच प्रसिद्ध व्हायला हवीत!

अरे हो, एक सांगायचे राहिलेच. मध्यंतरी तुमच्या कोकणात पालगड-दापोलीला जाऊन आलो. गेलो होते दाभोळला. तिथल्या वाचनालयाने बालविभाग सुरू केला आहे. मुलांना वाचायला मिळावीत म्हणून बरीच पुस्तके संग्रहित केली आहेत. मी त्याचे गोष्ट सांगून नि बालगीते म्हणूनच उद्घाटन केले. मुलांसाठी अलीकडे बरेच काही काही होऊ लागले आहे. नाटके, चित्रपट, आनंद मेळावे, शिबिरे इत्यादी. पण आणखीही खूप खूप व्हायला हवेच आहे.

मग दाभोळहून गेलो दापोलीला. दाभोळलाच बाबा फाटक आणि चंदू मेहता आले होते. चंदूकडेच दापोलीला उतरलो होतो.

दोपोलीची तुमची ती निसर्गाच्या कुशीतली शाळा पाहिली, आणि भारावून गेलो. एखाद्या वास्तूचेही किती भाग्य असते नाही! तुमच्या या शाळेचेच पाहा ना! केवढे थोर पुरुष विद्यार्थी म्हणून इथे वावरले! अण्णासाहेब कर्वे, र. पु. परांजपे, बाबासाहेब आंबेडकर, महामहापोध्याय पां. वा. काणे... आणि गुरुजी, तुम्हाला एकदम अभिमान वाटेल अशी गोष्ट सांगतो. स्वातंत्र्यानंतर विविध क्षेत्रात अपूर्व कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रपतींच्याकडून २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या मुहुर्तावर विविध पदवीदान करण्यात येते. त्यांत 'भारतरत्न'

ही सर्वोच्च पदवी असून आतापर्यंत ती केवळ पंधरा-सोळा जणांनाच देण्यात आली आहे. त्यात दोन महाराष्ट्रातले थोर पुरुष आहेत. तेही तुमच्या कोकणातले, नव्हे तर तुमच्या पालगड परिसरातले आणि दोघेही तुमच्या या दापोलीच्या भाग्यवान शाळेतले. एक महर्षी अण्णासाहेब कर्वे आणि दुसरे म. म. पां. वा. काणे!

तर हे आठवले, आणि तुमच्या शाळेविषयी विलक्षण आदर निर्माण झाला. त्या वास्तूला-परिसराला मनोमनी नमस्कार केला.

दापोलीमधल्या तुमच्या कापातल्या आतेचे घर बाबांनी दाखवले. बरेच फेरफार झालेले आहेत. मला उत्सुकता होती आतेचे यजमान तात्या यांनी खोदलेल्या गुहेची. 'श्याम'मध्ये तात्याविषयी तुम्ही पुष्कळ लिहिले आहे. बाबांनी ती गुहा दाखवली. त्यासाठी एक चढण चढून गेलो. त्या कोरीव छोट्या गुहेत थोडा वेळ बसलो. अजंठ्याच्या लेण्यामध्ये बौद्ध भिक्षूंच्या तपःसाधनेसाठी खोदलेल्या छोट्या छोट्या गुहा-घरांची आठवण झाली! तुमचे ते तात्या खरोखरीच अजब पण कर्तबगार गृहस्थ असले पाहिजेत!

मंडलिकांच्याकडे गेलो तेव्हा डॉक्टर आणि त्यांच्या पत्नी शैलाताई यांनी १९४५ साली निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने तुम्ही इकडे आला असतानाच्या आठवणी सांगितल्या. विठोबा अण्णा बेलोसे यांनाही भेटून आलो. ते पालगडचेच. तुमच्या गजाननदादांचा नि त्यांचा विशेष स्नेहसंबंध. थकले आहेत आता.

बाबांच्याबरोबर हर्णेला जाऊन आलो. तसेच तामसतीर्थावरही गेलो होतो. 'श्यामची आई'मधून ह्या स्थळांशी परिचय झालेलाच होता. प्रत्यक्ष डोळ्यांनी ती पाहिली. तुमच्या लेखनाच्या आधारे किती तरी प्रसंग आठवले. तामसतीर्थावर इथेच कुठे तरी लहानगा श्याम उभा राहिला असेल. हर्णेच्या बंदरावर इथेच श्यामला त्याची मावशी भेटली असेल. असे सारखे मनात यायचे. मावशीने ती दुःखद वार्ता सांगितली आणि श्याम आईच्या शोकाने व्याकुळ होऊन ओक्साबोक्सी रडला. ती धर्मशाळा हर्णेच्या बंदरावर आहे. तो प्रसंग पाहिलेला समुद्र या वेळी धीरगंभीर साक्षीदारासारखाच वाटला!

पालगडला गजाननदादांच्या घरातच उतरलो. तुमच्या जन्मस्थळी आता 'साने गुरुजी विद्यार्थी वसतिगृह' आहे. इमारत नवीन बांधली आहे. मोठा हॉल आहे. पाहताना वाटले, इथेच कुठे तरी पंढरीचा पाळणा असेल..... इथेच कुठे तरी अंगणात आईने श्यामला अंघोळ घातली असेल.....

तुमच्या पालगडच्या 'साने गुरुजी विद्या मंदिरा'तले विद्यार्थी इथे गोळा झाले होते. मी त्यांना अनेक गोष्टी सांगितल्या. त्या वेळी रावजी केळकरही आलेले होते. नंतर त्यांच्या घरी गेलो. त्यांनी पुष्कळ आठवणी सांगितल्या. एक तर मजेशीरच- काही तरी निमित्ताने ना. ग. गोरे वगैरे मंडळी आली असताना त्यांच्याकडे जेवायला होती. तुम्ही सर्व जेवलात. मंडळी सोप्यावर पानसुपारी खात बोलत बसली. तुमचे लक्ष माजघरात. उष्टी तशीच पडली होती. बायकांना जेवायला किती उशीर होईल या विचाराने तुम्ही अस्वस्थ. उठलात आणि आत जाऊन पाळण्यातल्या बाळाला रडवलेत. तशी ते निमित्त करून माजघराचे सोप्यावरचे दार लावून घेतलेत आणि भरभर उष्टी पाने काढून टाकलीत. बाळाला मग समजावलेत, खेळवलेत हे का सांगायला पाहिजे!

तुमच्या आजोळी जाऊन आलो. ज्या खोलीत तुमच्या आईचे निधन झाले, त्या स्थळाचे पाणावलेल्या डोळ्यांनी दर्शन घेतले.

जवळच गणपतीचे देऊळ आहे. दर्शन घेतले. किती रम्य परिसर आहे! झोळाई, सोमेश्वर यांच्याही मंदिरांकडे गेलो होतो. वाटेत नदी लागतेच. मी विचारल्यावरून एका ग्रामस्थाने सांगितले, ''कुणी हिला भारजा नदी म्हणतात, कुणी जोग नदी म्हणतात. पण ते खरे नाही. ही पालगडचीच आमची नदी.''

झोळाईच्या देवळात लहानपणी श्याम अंधारात रुसून लपून बसला होता. ते ठिकाण पाहावे म्हणून गाभाऱ्याच्या मागील प्रदक्षिणेच्या बोळकंडीत गेले पण अंधार कुठेच नव्हता. चक्क उजेड. मी चौकशी केली. तेव्हा एकजण म्हणाले, ''ही खिडकी नव्याने पाडली नव्हे का!''

मुख्य सडकेवरून पालगड गावात वळताना आता एक पाटी लावलेली दिसते.

**पालगड**

**येथेच जन्मले आणि येथेच वाढले प. पू. साने गुरुजी. बालवाङ्मयाचे लेणे.**

तिथेच एक छोटेसे 'साने गुरुजी उद्यान' आहे. पण त्याची काहीच निगा ठेवलेली दिसली नाही.

आज तुमच्या गावात अशी तुमची बरीच स्मारके भेटतात. दिसतात. पण तुम्ही मात्र कुठेच दिसत नाही.....

तुमचा,

१७ एप्रिल १९७५ राजा

■ □ ■

BVBK-0403516
BVBK-0403516

पू. साने गुरुजी जन्मशताब्दिनिमित्त प्रकाशित....

डॉ. राधाकृष्णन् यांचे भारतीय तत्त्वज्ञान आणि साने गुरुजींची
रसाळ व ओघवती भाषा यांचा अनोखा संगम

## संस्कृतीचे भवितव्य

(Kalki or the Future of Civilization)

लेखक : डॉ. राधाकृष्णन्    अनुवाद : साने गुरुजी

पृष्ठे : डेमी, ८०    मूल्य : रु. ५०/-

हरिजनांसाठी पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराची कवाडे उघडी व्हावीत,
यासाठी पू. साने गुरुजींनी केलेल्या उपोषणाचा संपूर्ण इतिहास.
त्या काळात साने गुरुजींसोबत राहिलेले सिद्धहस्त लेखक
श्री. राजा मंगळवेढेकर यांच्या सुबोध शैलीत —

## पंढरीस वाजे घंटा

लेखक : राजा मंगळवेढेकर

पृष्ठे : डेमी, ९२    मूल्य : रु. ५०/-

खास मुलांसाठी... पू. साने गुरुजींचे छोटेखानी चरित्र

## साने गुरुजी

लेखक : राजा मंगळवेढेकर

पृष्ठे : डेमी, २४    मूल्य : रु. १२/-

## श्री. राजा मंगळवेढेकर यांची
## आमच्याकडे उपलब्ध असलेली पुस्तके

- मित्रदेवो भव / रु. ११०
- मित्राय नमो नमो / रु. १४०
- कथा आणि कथाकथन / रु. ७०
- सर्वधर्म प्रेषित कथा / रु. ५५
- पंढरीस वाजे घंटा / रु. ५०
- हिरवे सोबती ( १ व २ ) / रु. १८
- एक होता ढ / रु. ३५
- ठकास महाठक / रु. ३५
- खेळण्यांची राणी / रु. १०
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् / रु. २०
- आनंद गोष्टी / रु. १०
- संतमेळा ( १ व २ ) / रु. ३६
- गांधीजींच्या गोष्टी / रु. २५
- विनोबांच्या गोष्टी ( १-२-३ ) / रु. २९
- नवलकहाणी / रु. १६
- आपले गृहमित्र / रु. ३५
- आपले वनमित्र / रु. ३५
- आपले पुष्पमित्र / रु. ३५
- शहाणे गाढव / रु. २०
- साने गुरुजी / रु. १२